१०४ शतकोत्तर वाटचाल

एकमेव स्वतंत्र दैनिक

# नवाकाळ

NAVAKAL

• मुंबई, रविवार ३ मे, २०२६ • वर्ष-१०४, अंक-५९, पाने-८, किंमत: ₹ ७

• R.N.I.No.1814/57 • Vol.- 104, Issue - 59 Marathi - Daily - Mumbai, 3 May, 2026 Page - 8 Price- Rs. 7/-

• संपादक- रोहित रमाकांत पांडे | 24x7 : www.navakal.in | Email- contact@navakal.in

नवाकाळच्या Digital बातम्या पाहण्यासाठी Scan करा!

Siren मुळे उडाला गोंधळ!

navakal.in

@navakal.news | Navakal Digital Network | @_NDN_Offical | @NavakalNews

# भोरमध्ये ४ वर्षांच्या मुलीवर अत्याचार व हत्या

# संतप्त ग्रामस्थांनी पार्थिव घेऊन महामार्ग अडवला

■ पुणे



**भोर तालुक्यातील नसरापूर गावात एका ४ वर्षांच्या चिमुरडीची काल ६५ वर्षीय नराधमाने लैंगिक अत्याचार करून दगडाने ठेचून हत्या केल्यानंतर मुलीचे नातलग आणि नसरापूरचे ग्रामस्थ आज आक्रमक झाले. दिवसभर ग्रामस्थांनी नसरापूर व परिसरात आंदोलन केल्यानंतर संध्याकाळी ते मुलीचा मृतदेह घेऊन पुण्याच्या नवले पुलावर आले. तिथे त्यांनी पुन्हा आंदोलन करून मुंबई-बंगळूरू मार्ग रोखून धरला. मुख्यमंत्र्यांनी इथे येऊन आरोपीला फाशी देणार असल्याचे लिहून द्यावे, अशी मागणी तिच्या वडिलांनी केली. यावेळी नवले पुलावर मोठा जनसमुदाय जमला होता. यामुळे मुंबई-बंगळूरू महामार्गावरील वाहतूक अनेक तास खोळंबून वाहनांच्या लांबच लांब रांगा लागल्या होत्या. अखेर पोलिसांनी बळाचा वापर करून काही आंदोलकांची धरपकड केली व त्यांना पांगवले. त्यानंतर साडेतीन तासांनी महामार्गावरून वाहतूक पुन्हा सुरू केली. मुलीचा मृतदेह ठेवण्यात आलेली रुग्णवाहिका महामार्गावरून रवाना करण्यात आली.**

**मुलीच्या** वडिलांनी म्हटले की, मुख्यमंत्र्यांनी या ठिकाणी येऊन आरोपीला फाशीची शिक्षा देऊ, असे मला लेटरहेडवर लिहून द्यावे किंवा आरोपीला आमच्या ताब्यात द्यावे. आम्ही त्याचे काय ते करू. त्याशिवाय आम्ही मुलीवर अंत्यसंस्कार करणार नाही. मुख्यमंत्री मिसिंग लिंकच्या उद्घाटनासाठी येऊ शकतात. तर आता इकडे का येऊ शकत नाहीत? आरोपीने यापूर्वी गुन्हा केला होता. मग तो लगेच सुटला कसा? त्यावेळी त्याला कठोर शिक्षा झाली असती, तर माझ्या मुलीच्या बाबतीत असा प्रकार घडला नसता.

संतप्त नातलग आणि ग्रामस्थांना पोलिसांनी समजावण्याचा प्रयत्न केला. परंतु ते ऐकायला तयार नव्हते. पुण्यातील भाजपाचे शहरप्रमुख धीरज घाटेही व इतर काही राजकीय नेतेही तिथे पोहोचले. परंतु नातलग आणि ग्रामस्थांनी आपली मागणी त्यांच्याकडेही कायम ठेवली होती. त्यानंतर पुण्याचे पोलीस आयुक्त अमितेश कुमार » पान २ वर

### चाकणमध्येही ३ वर्षांच्या मुलावर अनैसर्गिक अत्याचार

भोर तालुक्यातील नसरापूर चिमुकलीचे प्रकरण ताजे असतानाच पुण्याच्याच खेड तालुक्यातील चाकणमध्ये ३ वर्षांच्या मुलाची अनैसर्गिक अत्याचार करून चाकूने गळा चिरून हत्या केली. त्याचा मृतदेह बंद खोलीत सुटकेसमध्ये लपवून ठेवला होता. या घटनेनंतर बिहारला पळून जाण्याच्या तयारीत असलेल्या अल्पवयीन आरोपीला दक्षिण म्हाळुंगे पोलिसांनी पुणे रेल्वे स्थानकावरून ताब्यात घेतला आहे. या प्रकरणी मयत मुलाच्या आईने दक्षिण म्हाळुंगे पोलीस ठाण्यात फिर्याद दिली होती. त्यानुसार पोलिसांनी अल्पवयीन मुलाविरोधात गुन्हा दाखल केला.

## थोडक्यात...

### यवतमाळमध्ये ९ वर्षीय मुलीचा उष्माघाताने मृत्यू

**यवतमाळ** - नेर तालुक्यातील अजंती पारधी बेड्यावर ९ वर्षीय चिमुकलीचा उष्माघाताने मृत्यू झाला. अन्वी भोसले असे मृत मुलीचे नाव असून, ती दुपारच्या कडक उन्हात पाणी आणण्यासाठी गेली होती. सायंकाळच्या सुमारास अचानक चक्कर येऊन ती खाली पडली. त्यानंतर तिचा जागीच मृत्यू झाल्याची माहिती स्थानिकांकडून देण्यात येत आहे. या घटनेमुळे परिसरात हळहळ व्यक्त होत आहे.

### गर्भाशयात गाठ आहे या वाक्याने घाबरू नका



प्रसिद्ध स्त्रीरोगतज्ज्ञ रश्मी फडणवीस यांची विशेष मुलाखत

सोमवार ४ मे च्या अंकात **नवाकाळ**मध्ये वाचा

आपला अंक राखून ठेवा

### टीसीएसच्या निदा खानचा जामीन अर्ज फेटाळला

**नाशिक** - नाशिकमधील टाटा कन्सल्टन्सी सर्व्हिसेस (टीसीएस) मधील महिला कर्मचाऱ्यांचे लैंगिक शोषण व बळजबरी धर्मांतर प्रकरणातील मुख्य संशयित निदा खानचा अंतरिम अटकपूर्व जामीन अर्ज आज नाशिक रोड न्यायालयाने फेटाळला. गुन्हा दाखल झाल्यापासून निदा फरार आहे. तिने वकिलांमार्फत अंतरिम अटकपूर्व जामिनासाठी अर्ज केला होता. निदा गर्भवती असल्याचे कारण तिच्या वकिलांनी न्यायालयात दिले होते. मात्र न्यायालयाने तिचा अर्ज फेटाळला. त्यामुळे तिला कोणत्याही क्षणी अटक होण्याची शक्यता आहे.

## बारावीचा निकाल घटला यंदाही मुलींची बाजी

### कोकण पुन्हा अव्वल | लातूरने निराशा केली



**महाराष्ट्र राज्य माध्यमिक आणि उच्च माध्यमिक शिक्षण मंडळामार्फत फेब्रुवारी-मार्च २०२६ मध्ये घेण्यात आलेल्या बारावी परीक्षेचा निकाल आज जाहीर झाला. यंदा ८९.७९ टक्के विद्यार्थी उत्तीर्ण झाले आहेत. नेहमीप्रमाणे कोकण विभागाने सर्वोच्च निकाल देत आपली परंपरा कायम राखली आहे, तर लातूर विभागाचा निकाल सर्वात कमी आहे. महत्त्वाची बाब म्हणजे, मुलींनी यंदाही मुलांपेक्षा चांगला निकाल लावून बाजी मारली आहे. राज्याचे शिक्षण आयुक्त सचिंद्र प्रतापसिंग आणि राज्य मंडळाचे अध्यक्ष त्रिगुण कुलकर्णी यांनी पत्रकार परिषदेत ही माहिती दिली.**

■ मुंबई

**यंदा** राज्याचा निकाल ८९.७९ टक्के लागला. मागील वर्षीच्या ९१.८८

सविस्तर वाचण्यासाठी व शेअर करण्यासाठी हा क्युआर कोड स्कॅन करा

टक्क्यांच्या तुलनेत यंदा २.०९ टक्क्यांची घट झाली आहे. राज्यातील पुणे, नागपूर, छत्रपती संभाजीनगर, मुंबई, कोल्हापूर, अमरावती, नाशिक, लातूर आणि कोकण या नऊ विभागीय मंडळांतून विज्ञान, कला, वाणिज्य, व्यवसाय अभ्यासक्रम आणि आयटीआय शाखांसाठी एकूण १४,४४,७१३ नियमित विद्यार्थ्यांनी नोंदणी केली होती. त्यापैकी १४,३३,०५८ विद्यार्थी परीक्षेला प्रविष्ट झाले आणि त्यातील १२,८६,८४३ विद्यार्थी उत्तीर्ण झाले आहेत. एकूण » पान २ वर

### घरून परीक्षा देणारे ८० टक्के उत्तीर्ण

शाळेत न जाता थेट परिक्षा देणाऱ्या खाजगी विद्यार्थ्यांमध्ये ३७,५५९ जणांनी नोंदणी केली होती. त्यापैकी ३६,९४१ विद्यार्थी परीक्षेला बसले आणि २९,६३४ विद्यार्थी उत्तीर्ण झाले. त्यांची उत्तीर्णतेची टक्केवारी ८०.२१ आहे. अलीकडे पाल्याला शाळेत न पाठवता घरीच त्याचा अभ्यास घेण्याकडे कल वाढतो आहे.

## २०२९मध्ये शिवसेना स्वतंत्र लढणार संजय शिरसाटांच्या वक्तव्याची चर्चा

■ मुंबई

**राज्याचे** सामाजिक न्याय मंत्री संजय शिरसाट यांनी २०२९ निवडणुकीत भाजपा-शिंदे स्वतंत्र लढण्याची शक्यता व्यक्त केली. यामुळे राज्याच्या राजकारणात नव्या चर्चेला उधाण आले आहे. ६ महिन्यांपूर्वी केंद्रीय गृहमंत्री आणि भाजपाचे वरिष्ठ नेते अमित शहा यांनीही मुंबई पालिकेच्या निवडणूक पार्श्वभूमीवर भाजपा कोणाच्या कुबड्या घेऊन चालणारा पक्ष नाही, स्वबळावर चालतो असे विधान केले होते.


संजय शिरसाट म्हणाले की, प्रत्येक पक्षाला आपला विस्तार करण्याचा अधिकार आहे. त्यानुसार पक्ष आपापल्या पद्धतीने तयारी करत असतो. २०२९ मध्ये भाजपा स्वबळावर लढणार का? तर लढू शकते. शिंदेसेना वेगळी लढेल काय? तर लढू शकते. कारण येणारी निवडणूक आपण अशी लढणार आहोत किंवा तशी लढणार आहोत, असा कोणताही बाँड किंवा ग्रीमेंट राजकारणात नसते. एका जागेसाठी शिंदेसेना - भाजपा युती तुटताना पाहिली आहे. यात काहीच गैर नाही.

## देशभरातील कोट्यवधी मोबाईलवर दोनदा सायरन वाजला पूर्वसूचना नसल्याने घबराट! अनेकांनी फोन बंद केले

■ मुंबई

**देशभरातील** कोट्यवधी भारतीयांच्या मोबाईलमध्ये आज सकाळी ११ वाजून ४२ मिनिटांनी एकाचवेळी सायरनचा आवाज ऐकू येऊ लागला. या पाठोपाठ एक आपत्कालीन संदेश झळकला. काय झाले हे उमगण्याआधी पुन्हा सायरन वाजला. यामुळे घबराट पसरली. काहींनी भीतीपायी फोनच बंद केले.

मोबाईलमधून सायरनचा आवाज आला आणि त्यानंतर एक संदेश प्रथम इंग्रजीत, मग तेलगू आणि दुसऱ्या सायरनवेळी इंग्रजी व मराठीत माहिती सांगितली जाऊ लागली. मोबाईलधारक सुरुवातीला पुरते गोंधळून गेले. नेमके काय घडत आहे हे अनेकांना कळले




नाही. मोबाईल हॅक झाला की काय, अशीही भीती त्यांना वाटली. लोक एकमेकांना विचारू लागले. इस्त्रायल इराण युद्धामुळे आधीच तणावाचे वातावरण असताना कोणतीही पूर्वसूचना न देता मोबाईलवर सायरन वाजू लागल्याने घबराट पसरली. सुदैवाने केंद्र सरकारनेच आपत्कालीन स्थितीत नागरिकांना सतर्क करण्यासाठी ही सायरन वाजविण्याची चाचणी केली होती हे कळले आणि सर्वांनी सुटकेचा निःश्वास सोडला.

मात्र, लोकांची भीती गेल्यावर लोकांच्या » पान २ वर

## एअर इंडिया दररोज सरासरी शंभर उड्डाणे कमी करणार

■ नवी दिल्ली

**आधीच** तोट्यात असलेल्या एअर इंडियाने सध्या मध्य पूर्वेतील संघर्षामुळे वाढलेले इंधनाचे दर आणि हवाई क्षेत्रांमधील निर्बंधांमुळे




आगामी जुलै महिन्यापर्यंत आपली देशांतर्गत आणि आंतरराष्ट्रीय अशी मिळून दररोज सुमारे शंभर उड्डाणे कमी करणार आहे. एअर इंडियाचे मुख्य कार्यकारी अधिकारी आणि व्यवस्थापकीय संचालक कॅम्पबेल विल्सन यांनी कर्मचाऱ्यांना एका ईमेल संदेशातून ही माहिती दिली.

मध्य पूर्वेतील युद्धस्थितीच्या पार्श्वभूमीवर आपण एप्रिल आणि मे महिन्यातील काही उड्डाणे रद्द केली होती. मात्र परिस्थिती आणखी चिघळण्याची लक्षणे दिसत असल्याने आता आपण जून आणि जुलै महिन्यांमधीलही काही उड्डाणे रद्द करत आहोत, असे कॅम्पबेल यांनी सांगितले. एअर इंडिया दररोज सुमारे १,१०० उड्डाणे हाताळते. परंतु आता युरोप, उत्तर अमेरिका, ऑस्ट्रेलिया आणि सिंगापूर या ठिकाणी जाणारी नियोजित उड्डाणे रद्द करण्यात आली आहेत.

## पेट्रोल-डिझेलचीही दरवाढ होणार ५-७ दिवसांत सरकारचा निर्णय?

■ नवी दिल्ली

**व्यावसायिक** गॅसचे भाव वाढल्यानंतर आता गेल्या काही काळापासून स्थिर असलेले पेट्रोल, डिझेल आणि घरगुती गॅसच्या दरातही दरवाढ होण्याची शक्यता व्यक्त केली जात आहे. केंद्र सरकारकडून पुढील ५ ते ७ दिवसांत दरवाढीबाबत निर्णय घेतला जाण्याची शक्यता आहे. केंद्रीय पेट्रोलियम आणि नैसर्गिक वायू विभागाचे मंत्री हरदीप पुरी सिंग यांनी गुजरात येथील कार्यक्रमात केलेल्या वक्तव्यामुळे लवकरच पेट्रोल-डिझेल दरवाढ होणार असल्याची चर्चा रंगली आहे.

हरदीप पुरी सिंग यांनी एक्सवर नमूद केले की, ४ वर्षांत आंतरराष्ट्रीय बाजारपेठेत इंधन




तेलात मोठ्या प्रमाणात चढ-उतार झाले. मात्र भारताने कोणतीही दरवाढ केली नाही. परंतु वेळ आल्यास सरकार आवश्यक निर्णय घेऊ शकते.

कालच केंद्र सरकारने व्यावसायिक सिलिंडरची ९९३ रुपयांनी तर ५ किलो सिलिंडरची २६१ रुपयांनी दरवाढ लागू केली. आता पेट्रोल आणि डिझेलच्या दरात प्रति लीटर ४ ते ५ रुपयांपर्यंत वाढ होऊ शकते. तर घरगुती एलपीजी सिलिंडरच्या किमतीत ४० ते ५० रुपयांची वाढ होण्याची शक्यता आहे. २०२२ नंतर प्रथमच इंधन दरवाढ होणार आहे. मागील काही वर्षांत सरकारने किरकोळ इंधन दर मोठ्या प्रमाणात स्थिर ठेवले होते. मात्र सध्या पश्चिम आशियातील युद्धजन्य स्थितीमुळे पुरवठा साखळी मोठ्या प्रमाणात विस्कळीत झाली आहे.

## 'वाढवण'साठी १२४ ग्रामस्थांनी स्वेच्छेने जमिनी सुपूर्द केल्या

■ पालघर

**जिल्ह्यातील** महत्त्वाकांक्षी वाढवण बंदर प्रकल्पासाठी स्थानिक ग्रामस्थांनी एक महत्त्वपूर्ण पाऊल उचलले आहे. डहाणू तालुक्यातील वारोर गावातील १२४ ग्रामस्थांनी सरकारी अटी मान्य करत वाढवण बंदरासाठी आपली जमीन स्वेच्छेने प्रशासनाकडे सुपूर्द केली आहे, अशी माहिती जिल्हाधिकारी इंदू राणी जाखड यांनी दिली.

जिल्हाधिकारी जाखड यांनी सांगितले की, वारोर गावातील सुमारे २.५ हेक्टर क्षेत्रफळाच्या या भूखंडावर ४१ उपविभाग आहेत. बंदराच्या पायाभूत सुविधांसाठी हा कॉरिडॉर अत्यंत महत्त्वाचा असून, गुंतागुंतीच्या सर्वेक्षण वादामुळे याआधी रखडला होता. परंतु आता या ग्रामस्थांनी दाखवलेल्या सहकार्याच्या भूमिकेमुळे पुढील कामाला चालना मिळाली आहे. या प्रकल्पासाठी आपली जमीन दिलेल्या एका ग्रामस्थाने सांगितले की, आम्ही या प्रकल्पाच्या संपूर्ण प्रक्रियेवर अत्यंत समाधानी आहोत. अधिकाऱ्यांनी आमच्या समस्या प्रामाणिकपणे ऐकण्यासाठी वेळ दिला आणि प्रत्येक टप्प्यावर व्यवहार्य उपाययोजना सादर करून, त्यांचे पारदर्शकपणे आणि निष्पक्षपणे निराकरण केले. म्हणूनच आम्ही थेट प्रशासनासोबत हा प्रश्न सोडवण्याचा पर्याय निवडला.

## सख्ख्या बहिणींची कोर्टात मागणी पतींची अदलाबदल करायची आहे

**मध्य प्रदेश उच्च न्यायालयाच्या ग्वाल्हेर खंडपीठासमोर एक अनोखा खटला सुनावणीस आला. यामध्ये दोन सख्ख्या बहिणींनी आपापल्या पतींच्या अदलाबदलीची इच्छा व्यक्त केली. या महिलांनी दिलेल्या जबाबामुळे क्षणभर न्यायालय अचंबित झाले.**

■ ग्वाल्हेर

**एका** व्यक्तीने न्यायालयात हेबियस कॉर्पस याचिका दाखल करून आपली पत्नी आणि मुलीचे आपल्या मेहुण्याने अपहरण केल्याचा दावा केला. आपल्या पत्नीला न्यायालयात हजर करण्यात



यावे अशी विनंती केली होती. ही याचिका हेबियस कॉर्पस याचिका असल्याने याचिकाकर्त्याच्या पत्नीला न्यायालयात हजर करण्यात आले. हा कौटुंबिक वाद वाटत होता. पण पुढे त्या बहिणींचे जबाब ऐकल्यावर न्यायाधीशांना आश्चर्याचा धक्का बसला.

जिचे अपहरण झाल्याची तक्रार केली होती ती महिला आणि ज्या मेहुण्यावर अपहरण करण्याचा आरोप ठेवण्यात आला होता त्या मायारामची पत्नी या दोघी सख्ख्या बहिणी होत्या. मायारामने आपल्या पत्नीच्या सख्ख्या मोठ्या बहिणीचे अपहरण केले होते, असे सुनावणीदरम्यान स्पष्ट झाले. त्यापुढे घडलेले नाट्य अगदी एखाद्या मसाला हिंदी चित्रपटातील कथानकालाही लाजवेल असे होते. अपहरण झालेल्या महिलेने न्यायालयाला सांगितले की, तिचे अपहरण » पान २ वर

## भोंदू अशोक खरात प्रकरणात प्रतिभा चाकणकरांना ईडीचे समन्स

■ मुंबई

**नाशिकच्या** भोंदू अशोक खरात प्रकरणात ईडीने आता राज्य महिला आयोगाच्या माजी अध्यक्षा रुपाली चाकणकर यांची बहीण प्रतिभा चाकणकर आणि त्यांचा मुलगा तन्मय चाकणकर यांना समन्स बजावले. त्यांची पुढील आठवड्यात सखोल चौकशी होण्याची शक्यता आहे.

भोंदू अशोक खरातवर महिला अत्याचार आणि आर्थिक गैरव्यवहाराचे आरोप आहेत. पोलीस तपासात चाकणकर कुटुंबातील काही सदस्यांचे खरातसोबत आर्थिक व्यवहार असल्याची माहिती मिळाली आहे. तपासात प्रतिभा चाकणकर आणि अशोक खरात यांच्यात सुमारे २३६ वेळा फोनवरून संवाद झाल्याचा दावा आहे. त्यांच्यात शेकडो संदेशांची देवाणघेवाणही उघड झाली. खरात प्रकरणात वादात सापडलेल्या समता पतसंस्थेत प्रतिभा चाकणकर यांच्या नावावर एकापेक्षा अधिक खाती



असल्याचे उघड झाले असून, या खात्यांमधून ४० ते ५० कोटी रुपयांपर्यंत संशयास्पद व्यवहार झाल्याचा अंदाज आहे. विशिष्ट खात्यांमधूनच सुमारे २ कोटी ४० लाख रुपयांची उलाढाल झाल्याचेही उघड झाले आहे.

## शिकागोत बेरोजगारीला कंटाळून भारतीय तरुणाची आत्महत्या

■ शिकागो

**अमेरिकेच्या** शिकागोत बेरोजगारीला कंटाळून भारतीय तरुणाने आत्महत्या केली. इरागनाबोयिना चंदू असे या तरुणाचे नाव असून, तो मूळचा आंध्र प्रदेशातील रहिवासी आहे. त्याच्या मृत्यूमुळे कुटुंबावर दुःखाचा डोंगर कोसळला. शिकागो येथील डिपॉल युनिव्हर्सिटीमधून चंदूने पदव्युत्तर शिक्षण पूर्ण केल्यानंतर तो नोकरीच्या शोधात होता. कुटुंबावर अवलंबून राहावे लागत असल्याने तो मानसिक तणावात होता. त्याचे वडील सुरक्षा रक्षक म्हणून काम करतात. शिक्षणासाठी घेतलेले कर्ज आणि कुटुंबावर पडणारा आर्थिक भारामुळे तो विवंचनेत होता. याच नैराश्यातून त्याने आपल्या अमेरिकेतील निवासस्थानी टोकाचे पाऊल उचलले. त्याचा मृतदेह मायदेशी परत आणण्यासाठी मोठ्या निधीची गरज आहे.

नवाकाळ
Email- contact@navakal.in www.navakal.in /navakalofficial


# छोट्या जाहिराती

संपर्क करा
८४२२८१७४४५/८१०८११६४२३

**पाहिजेत**

प्रतिष्ठित कंपनीला आऊटडोअर कामासाठी प्रत्येक झोनवाईज 60 फिल्ड एक्झिक्युटिव्ह पाहिजेत. अनुभवींना आणि बाईकर्सना प्राधान्य. पगार 30,000/-+5,000/- ट्रॅव्हलिंग अलाऊंस, बायोडाटा व्हॉट्सअप पाठवा आणि कॉल करा. प्रिंस कुरीअर **9820385767/ 9029013014** {NC260345}

क्रेडिट सोसायटीच्या कामासाठी मुले-मुली, पुरुष- महिला पाहिजेत. क्लार्क, फील्ड एक्झिक्युटिव्ह, कलेक्शनसाठी पाहिजेत. उत्तम पगार+ TA+ कमिशन मिळेल. संपर्कः **9892035236/ 9004736999** {NC260355}

डोंबिवली (पूर्व) MIDC मध्ये रेडिमेड गारमेन्ट्स कंपनीत हेल्पर (मेल) पाहिजे. तसेच पॅकिंग करता महिला पाहिजे. वय- 19-30 संपर्कः **9004385362** {NC260339}

विरार स्टेशनजवळ (इमीटेशन ज्वेलरीचे काम) स्टोन लावण्यासाठी मुली/ महिला पाहिजेत. **9819892369/ 9820072369** {NC260221}

महाराष्ट्रीयन कुटुंबास घरकामासाठी बाई पाहिजे. ''माहेर'' पोर्तुगीज चर्च, दादर पश्चिम. **9869688244.** {NC260341}

सुरक्षारक्षक, हाऊसकिपींग-दादर, गोवंडी, वरळी, मुंबईसेंट्रल, ठाणे. **8291056761/ 8422880515/7506129517/ 9326200875** {NC260249}

भांडूप येथे सीडी मशीनसाठी फिडरमन, बॉयलर, पंचिंग, फोल्डिंग ऑपरेटर, पाहिजे संपर्कः **9820930362/ 9930589715** {NC260212}

कोपरखैरणे येथे 28x40 कोमोरी ४ कलर मशीनसाठी अनुभवी प्रिंटर व फिडरमन पाहिजे. संपर्क साई आर्टः **9820433552/ 9820542141** {NC260353}

**पाहिजेत**

पेपर लॅमिनेशन फिटर ऑपरेटर मुली, हेल्पर मुलगे पाहिजेत. संपर्कः- **9821882248** {NC260406}

जोगेश्वरी (पश्चिम) फास्ट फुडसाठी महिला व पुरुष कामगार त्वरीत पाहिजेत. मो. नं. **9322797781** {NC260404}

**Situation Vacant**

Require Paper Cutting Machine Operator pollar Time 9am to 7pm. Dee. J International 114/D, 1st floor, Government Industrial Estate, Kandivali (West). Mumbai- 400067. Contact: **9819810320** {NC260347}

**शैक्षणिक**

हमखास पासाची गॅरंटी खर्डीकर क्लासेस. ७वी नापास? डायरेक्ट १०वी. ११वी नापास? डायरेक्ट १२वी. डोंबिवलीः **9820627580 / 9820904646** {NC260031}

**वधू वर मेळावा**

सर्व जाती मेळावा थेट भेट, शिबीर, whatsApp, कल्याण **9869868620** {NC260383}


## जातनिहाय जनगणना का नाही? सपकाळांची टीका

**मुंबई-** मुंबईतील टिळक भवन येथे आयोजित पत्रकार परिषदेत हर्षवर्धन सपकाळ यांनी केंद्र व राज्य सरकारवर जोरदार देशभर जनगणना सुरू झाली असली तरी जातनिहाय जनगणना मात्र होत नाही. पंतप्रधानांनी घोषणा केली होती, पण ती ते करत नाहीत. कारण ही व्यक्ती फेकूच नाही तर अत्यंत खोटारडी आहे. सपकाळ यांनी राज्यातील अत्याचाराच्या घटनेवरूनही महायुती सरकारवर टीका केली.


-: वाचकांना सूचना :-
दैनिक 'नवाकाळ' वर्तमानपत्रात प्रसिद्ध झालेल्या जाहिरातींच्या सत्यतेबाबत दैनिक 'नवाकाळ'ची कोणतीही जबाबदारी नाही. वाचकांनी स्वतः पडताळणी करून स्वतःच्या जबाबदारीने निर्णय घ्यायचा आहे, याची नोंद घ्यावी.
- मॅनेजर, 'नवाकाळ'


# बारावीचा निकाल घटला! मुलींची बाजी

पान १ वरून

उत्तीर्णतेची टक्केवारी ८९.७९ इतकी आहे. पुनर्परीक्षार्थी विद्यार्थ्यांमध्ये ५०,८७६ जणांनी नोंदणी केली होती. त्यापैकी ५०,३४६ विद्यार्थी परीक्षेला प्रविष्ट झाले आणि १८,३४९ विद्यार्थी उत्तीर्ण झाले. ही टक्केवारी ३६.४४ इतकी आहे. दिव्यांग विद्यार्थ्यांमध्ये ८,४४६ जणांनी नोंदणी केली होती. त्यापैकी ८,३६७ विद्यार्थी परीक्षेला बसले आणि ७,५७९ विद्यार्थी उत्तीर्ण झाले. ही टक्केवारी ९०.५८ आहे. विभागनिहाय निकालात कोकण विभागाने ९४.१४ टक्के निकालासह अव्वल स्थान पटकावले आहे, तर लातूर विभागाचा निकाल सर्वात कमी ८४.१४ टक्के लागला आहे. दरवर्षीप्रमाणे यंदाही मुलींनी बाजी मारली आहे. मुलींची उत्तीर्णतेची टक्केवारी ९३.१५ असून, मुलांची ८६.८० टक्के आहे. मुलींचा निकाल मुलांपेक्षा ६.३५ टक्क्यांनी अधिक आहे. यंदा परीक्षेतील १५३ विषयांपैकी २६ विषयांचा निकाल १०० टक्के लागला आहे.

# दहिसर-भाईंदर लिंक रोडच्या कामादरम्यान क्रेन कोसळली

## दोन कामगारांचा मृत्यू

■ भाईंदर

**भाईंदरमध्ये** दहिसर-भाईंदर लिंक रोडच्या कामादरम्यान आज क्रेन कोसळली. यात रघुनाथ दास (३८) आणि काना सिंग (४५) या कामगारांचा दुर्दैवी मृत्यू झाला.

दोघेही प्रकल्पस्थळी क्रेनवर काम करत असताना अचानक क्रेन कोसळली. या दुर्घटनेत ते गंभीर जखमी झाले आणि त्यांचा जागीच मृत्यू झाला. तर इतर काही कामगार जखमी झाल्याची माहिती आहे. दहिसर ते भाईंदर लिंक रोडचे काम सुरू असून, प्रकल्पस्थळी क्रेन उभारण्यात आली होती. मात्र, अचानक घडलेल्या या अपघातामुळे कामगारांमध्ये भीतीचे वातावरण निर्माण झाले आहे. विशेष म्हणजे, दोन दिवसांपूर्वी मानखुर्द येथेही उड्डाणपुलाच्या कामादरम्यान क्रेन कोसळून एका पोलिसाचा मृत्यू झाला होता. या पार्श्वभूमीवर अशा दुर्घटनांमुळे सुरक्षेच्या उपाययोजनांवर पुन्हा प्रश्न उपस्थित होत आहेत.

# जळगाव पालिकेला ४२ कोटींचा गंडा मुंबईतील कंपनीवर गुन्हा दाखल

■ जळगाव

**रस्तेकामाचे** कंत्राट घेऊन ते मुदतीत पूर्ण न करता महानगरपालिकेची तब्बल ४२ कोटी ६० लाख ७६ हजार ५६२ रुपयांची फसवणूक केल्याप्रकरणी मुंबईतील एका कंपनीविरुद्ध जळगाव शहर पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

महानगरपालिकेचे प्रभारी शहर अभियंता योगेश प्रकाश बोरोले यांनी याबाबत फिर्याद दिली आहे. त्यांच्या तक्रारीनुसार, संबंधित कंपनीने नगरपरिषद (सध्याची महानगरपालिका) काळात रस्ते डांबरीकरणाचे कंत्राट घेतले होते. पेव्हर मशीनच्या सहाय्याने काम पूर्ण करण्याची अट असताना कंपनीने



करारातील अटींचे उल्लंघन करत काम वेळेत पूर्ण केले नाही. तसेच, संगनमत करून प्रशासनाचा विश्वास संपादन करत 'मोबिलायझेशन फंड' उचलण्यात आला. या प्रकरणात मूळ रक्कम, त्यावरील व्याज आणि महापालिकेने केलेला खर्च मिळून एकूण ४२.६० कोटी रुपयांचा आर्थिक फटका बसल्याचे समोर आले आहे. हा प्रकार २० मार्च १९९७ ते १ एप्रिल २००६ या कालावधीत घडल्याचे नमूद करण्यात आले आहे. या प्रकरणी कंपनीचे संचालक आणि इतर संबंधितांवर गुन्हा दाखल करण्यात आला आहे. फसवणुकीची व्याप्ती मोठी असल्याने पुढील तपास जिल्हा आर्थिक गुन्हे शाखेकडे वर्ग करण्यात आला आहे.

# कांकेरमध्ये भूसुरुंगाचा स्फोट राखीव दलाचे ३ जवान शहीद

■ जगदलपूर

**छत्तीसगडमधील** कांकेर जिल्ह्यात नक्षलवाद्यांनी पेरलेल्या भूसुरुंगाच्या स्फोटात जिल्हा राखीव रक्षक दलाचे तीन जवान शहीद झाले. एक जवान गंभीर जखमी झाला आहे. कांकेर-नारायणपूर सीमावर्ती भागात 'आयईडी' निकामी करण्याच्या मोहिमेदरम्यान ही दुर्घटना घडली.

सुरक्षा दलांची विशेष तुकडी छोटेबेठिया पोलीस ठाण्याच्या हद्दीत भूसुरूंग शोधमोहीम राबवत होती. जंगलात लपवून ठेवलेले सुरूंग शोधून ती निकामी करण्याचे काम सुरू असतानाच अचानक जिवंत भूसुरुंगाचा जोरदार स्फोट झाला. या स्फोटात चार जवान गंभीर जखमी झाले. जखमींना तातडीने रुग्णालयात हलवण्यात आले. मात्र उपचारादरम्यान प्रभारी सुखराम वट्टी, कृष्णा कोमरा आणि संजय गढपाले यांचा मृत्यू झाला. परमानंद कोमरा हे गंभीर जखमी असून, त्यांच्यावर उपचार सुरू आहेत. दरम्यान, काही महिन्यांपूर्वी अनेक नक्षलवाद्यांनी शरणागती पत्करली होती. त्यांच्या माहितीनुसार जंगलात मोठ्या प्रमाणात सुरूंग पेरून ठेवण्यात आल्याचे उघड झाले होते. त्यानुसारच ही शोधमोहीम राबवली जात होती.

# पायधुनी मृत्यू प्रकरण! अन्नात भेसळ नाही

■ मुंबई



**मुंबईतील** पायधुनी परिसरातील डोकाडिया कुटुंबातील चार सदस्यांच्या मृत्यू प्रकरणाचे गूढ अधिकच वाढत चालले आहे. अन्न व औषध प्रशासन (एफडीए) यांच्या तपासणीत कलिंगड, बिर्याणी किंवा इतर अन्नपदार्थांमध्ये कोणतीही भेसळ आढळून आलेली नसल्याचे स्पष्ट झाले आहे. त्यामुळे त्यांच्या मृत्यूमागील नेमके कारण काय, हा प्रश्न अजूनही अनुत्तरीत आहे.

**तपासणी अहवालातील माहिती**

२३ एप्रिलच्या रात्री डोकाडिया कुटुंबियांनी बिर्याणी खाल्ल्यानंतर कलिंगड खाल्ले. त्यानंतर सर्वजण झोपी गेले. मात्र, रविवारी पहाटेपासून चौघांनाही उलट्या आणि जुलाबाचा त्रास सुरू झाला. सुरुवातीला स्थानिक डॉक्टरांकडे उपचार घेण्यात आले. परंतु प्रकृती गंभीर होत गेल्याने त्यांना तातडीने जे. जे. रुग्णालय येथे दाखल करण्यात आले. उपचारादरम्यान चौघांचाही मृत्यू झाला. घटनेनंतर एफडीएने कलिंगड, भात, मसाले आणि इतर अन्नपदार्थांचे नमुने तपासले. अहवालात कोणतेही कृत्रिम रंग, रासायनिक द्रव्ये किंवा भेसळ आढळली नाही. मात्र, अधिकाऱ्यांनी स्पष्ट केले की, या तपासण्या केवळ भेसळ तपासण्यासाठी असतात. जिवाणूजन्य संसर्ग किंवा इतर विषारी घटकांची शक्यता अद्याप नाकारलेली नाही.

# सख्ख्या बहिणींची कोर्टात मागणी

पान १ वरून

झालेले नाही तर ती स्वेच्छेने मायारामसोबत राहत आहे. तिने आपल्या पतीपासून घटस्फोट घेण्यासाठी अर्जही केला आहे. हे ऐकल्यानंतर न्यायाधीशांना त्यात फार विचित्र असे काही वाटले नाही. पण पुढे जे झाले त्याने न्यायाधीशांसह कोर्टरुममध्ये उपस्थित असलेल्या सार्‍यांनाच आश्चर्याचा धक्का बसला.

मोठ्या बहिणीने आपल्या पतीसोबत राहण्याची इच्छा व्यक्त करताच धाकट्या बहिणीने त्यावर आक्षेप घेणे अपेक्षित होते. पण झाले उलटेच. धाकट्या बहिणीने सांगितले की, माझ्या बहिणीला जर माझ्या पतीसोबत राहायची इच्छा असेल तर माझी काहीच हरकत नाही. मलाही तिच्या पतीसोबत राहण्याची इच्छा आहे. हे सर्व अनपेक्षित असल्याने कोर्टरुममध्ये काही क्षण शांतता पसरली. मात्र न्यायाधीशांनी लगेचच हे प्रकरण अपहरणाचे म्हणजे गुन्हेगारी स्वरुपाचे नाही तर हा कौटुंबिक वाद आहे. तो संबंधितांनी परस्पर सहमतीने सोडवावा असा आदेश दिला.

# संतप्त ग्रामस्थांनी पार्थिव घेऊन रस्ता अडवला

पान १ वरून

आणि जिल्हाधिकारी आंदोलनाच्या ठिकाणी येऊन आंदोलकांशी चर्चा केली. मुख्यमंत्र्यांशी फोनवर बोलणेही करून दिले. आरोपीला शिक्षा केली जाईल, असे मुख्यमंत्र्यांनी त्यांना आश्वस्त केले. तरीही आंदोलक हटायला तयार नव्हते. त्यानंतर पोलिसांनी काही आंदोलकांची धरपकड करून महामार्ग मोकळा केला आणि वाहतूक पुन्हा सुरू केली.

दरम्यान, राजगड पोलिसांनी आरोपीला आज दुपारी न्यायालयात हजर केले. न्यायालयाने त्याला ७ मे पर्यंत पोलीस कोठडी सुनावली. संबंधित मुलगी उन्हाळ्याच्या सुट्टीत आजीकडे आली होती. आरोपीने चिमुकलीला गाईचे वासरू दाखवतो असे सांगून जवळच्या गोठ्यात नेले. तिथे तिच्यावर अमानुषपणे लैंगिक अत्याचार करून दगडाने ठेचून तिची हत्या केली. पुरावा नष्ट करण्याच्या उद्देशाने तिचा मृतदेह शेणाच्या ढिगाऱ्याखाली लपवला. मुलगी घरी न दिसल्याने पालकांनी शोधाशोध सुरू केली. परिसरातील सीसीटीव्ही फुटेज तपासले असता आरोपी चिमुरडीला गोठ्याकडे घेऊन जाताना दिसला. त्यानंतर हे संपूर्ण धक्कादायक प्रकरण उघडकीला आले. या प्रकरणाच्या निषेधार्थ ग्रामस्थांनी पोलीस ठाण्यासमोर आंदोलन करत रास्ता रोको केला. काल मृत चिमुरडीचा मृतदेहही पोलीस ठाण्याबाहेर ठेवला होता. तणावपूर्ण परिस्थिती पाहून पुणे ग्रामीण पोलीस अधीक्षक संदीप सिंग गिल यांनी घटनास्थळी येऊन नागरिकांची समजूत काढली.

पोलीस अधीक्षकांनी समजूत काढूनही आज नसरापूरमध्ये सकाळी पुन्हा आंदोलन सुरू झाले. या घटनेच्या निषेधार्थ पुणे-सातारा मार्गावर मोर्चा काढण्यात आला. त्यानंतर नसरापूरच्या सुपर मार्केटच्या चौकात ठिय्या आंदोलन केले. त्यावेळी पोलीस आणि ग्रामस्थांमध्ये चर्चा सुरू असताना बाचाबाची झाली. ग्रामस्थांनी आरोपी आमच्या ताब्यात द्या, नाहीतर त्याला फाशीची शिक्षा करा, अशी मागणी केली. त्यावर पोलिसांनी तपास करू देण्याचे आव्हान केले. त्यानंतर भोरचे आमदार शंकर मांडेकर यांनी संतप्त ग्रामस्थांची भेट घेऊन चर्चा केली. त्यांनी मुख्यमंत्री आणि गृहमंत्री देवेंद्र फडणवीस, महिला व बालकल्याण मंत्री अदिती तटकरे, पुण्याच्या पालकमंत्री व उपमुख्यमंत्री सुनेत्रा पवार यांच्याशी फोनवरून संवाद साधून या प्रकरणाचा तपास फास्ट ट्रॅकवर करण्याची विनंती केली.

मुख्यमंत्री फडणवीस यांनीही तपास जलदगतीने पूर्ण करून आरोपीला कठोर शिक्षा देण्याचे आश्वासन दिले. ते म्हणाले की, नसरापूर येथील घटना अत्यंत निंदनीय आणि मन हेलावून टाकणारी आहे. आरोपीला शक्य तितक्या लवकर मृत्युदंड देण्याची मागणी सरकार न्यायालयात करणार आहे. सायंकाळी साडेचार वाजताच्या सुमारास उपमुख्यमंत्री सुनेत्रा पवार, खासदार सुप्रिया सुळे यांनी नसरापूरला भेट देऊन पीडित कुटुंब आणि ग्रामस्थांची भेट घेतली. आ. रोहित पवार यांनीही घटनास्थळी भेट देऊन शक्ती कायद्याचा उल्लेख करत अशा घटनासंदर्भात कायद्यात तरतूद करण्याची बाब नमूद केली. माजी गृहमंत्री अनिल देशमुख यांनी एक्सवर लिहिले की, महाराष्ट्र दिनी अशी लाजिरवाणी घटना घडणे राज्याला शोभा देणारे नाही. फास्ट ट्रॅक कोर्टात ही केस चालवून या नराधमाला तत्काळ फाशीचीच शिक्षा झाली पाहिजे. याआधीही या नराधमाने चिमुकल्यांवर अत्याचार केल्याची माहिती आहे. असे गुन्हेगार समाजात मोकाट फिरतात कसे? मविआ सरकारच्या कार्यकाळात मी गृहमंत्री असताना आम्ही मंजूर केलेला शक्ती कायदा केंद्राकडे अंतिम मंजुरीसाठी प्रलंबित आहे. या कायद्याची राज्यात नितांत गरज असताना केंद्र आणि राज्य सरकार एकमेकांकडे टोलवाटोलवी करून हा कायदा लागू करण्याऐवजी वेळ मारून नेत आहे. राज्यात सातत्याने महिलांवर-मुलींवर अत्याचार होत असतानाही शक्ती कायद्यासारखा कठोर कायदा लागू करण्याबाबत सरकार गंभीर नाही. आज राज्यात शक्ती कायदा अस्तित्वात असता तर या नराधमाला १५ दिवसांत फाशीची शिक्षा झाली असती.

**आरोपीचा तिसरा गुन्हा**

ग्रामस्थांनी माहिती दिली की, आरोपीने यापूर्वी लैंगिक अत्याचार प्रकरणात दोन वेळा कारावास भोगला आहे. तो पाच ते सहा वर्षांपूर्वीच तुरुंगातून सुटून आला आहे. या नराधमावर यापूर्वी एका ७५ वर्षीय वृद्ध महिलेवर बलात्कार केल्याचा गुन्हा दाखल आहे. याशिवाय स्वतःच्या पुतणीवरही अत्याचार केल्याचा आरोप आला आहे. यापूर्वीच्या गुन्ह्यात त्याला योग्य आणि कठोर शिक्षा झाली असती तर आज चिमुकलीवर हा प्रसंग ओढवला नसता.

# लॉटरी

**निकाल — महाराष्ट्र राज्य लॉटरी — महाराष्ट्र गजलक्ष्मी — शनि विकली लॉटरी — सोडत संध्या. 4:45 वाजता**

सोडत दर शनिवार • सोडत क्रमांक 18 • तिकीट किं. रु. 20/- • सोडत दिनांक 02/05/2026

पहिले बक्षिस रु. 10,000/- : **GL-04 : 4099**

सर्व मालिकांसाठी • FOLLOWING NO.'S ARE COMMON TO ALL SERIES

| बक्षिस | | | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| दुसरे बक्षिस रु. 5000/- | 3310 | 3521 | 3681 | 4917 | 5923 (किशोर लॉटरी सेंटर, सांगली) | 6177 (सुमित एजन्सी, मुंबई) | 6680 | 7784 | 8359 | 8566 |
| तिसरे बक्षिस रु. 1000/- | 0421 | 2023 | 2380 | 2733 | 3722 | 7290 | 8253 | 8384 | 8448 | 9838 |
| चौथे बक्षिस रु. 500/- | 1507 | 2236 | 4871 | 5015 | 6723 | 6836 | 7275 | 8251 | 8579 | 8927 |
| पाचवे बक्षिस रु. 200/- | 0191 | 1038 | 1898 | 2294 | 2610 | 4383 | 7408 | 8361 | 8460 | 9537 |

सहावे बक्षिस रु. 100/- (सर्व मालिकांसाठी)

| | | | | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | | 1149 | 2067 | 2792 | 3647 | 4588 | 5471 | 6432 | 7557 | 8697 | 9259 |
| | | 1171 | 2079 | 2825 | 3679 | 4602 | 5515 | 6504 | 7672 | 8739 | 9271 |
| 0001 | 0634 | 1174 | 2151 | 2857 | 3693 | 4643 | 5557 | 6653 | 7708 | 8744 | 9287 |
| 0006 | 0660 | 1176 | 2233 | 2975 | 3695 | 4648 | 5571 | 6664 | 7772 | 8767 | 9307 |
| 0020 | 0671 | 1185 | 2252 | 3016 | 3773 | 4792 | 5582 | 6686 | 7794 | 8800 | 9427 |
| 0041 | 0709 | 1201 | 2295 | 3020 | 3803 | 4901 | 5645 | 6715 | 7797 | 8812 | 9474 |
| 0070 | 0783 | 1212 | 2296 | 3021 | 3835 | 4920 | 5696 | 6818 | 7952 | 8845 | 9495 |
| 0081 | 0794 | 1241 | 2320 | 3026 | 3925 | 4960 | 5710 | 6826 | 7977 | 8849 | 9580 |
| 0110 | 0830 | 1246 | 2329 | 3032 | 4064 | 4983 | 5795 | 6943 | 8020 | 8852 | 9592 |
| 0150 | 0890 | 1270 | 2422 | 3129 | 4140 | 5115 | 5830 | 6952 | 8038 | 8856 | 9710 |
| 0246 | 0930 | 1329 | 2427 | 3143 | 4159 | 5165 | 5835 | 6964 | 8082 | 8857 | 9745 |
| 0275 | 0933 | 1348 | 2468 | 3147 | 4243 | 5215 | 5840 | 6979 | 8118 | 8921 | 9787 |
| 0300 | 0945 | 1457 | 2488 | 3215 | 4346 | 5253 | 5845 | 7062 | 8171 | 8992 | 9792 |
| 0302 | 1001 | 1481 | 2521 | 3286 | 4385 | 5260 | 5865 | 7087 | 8189 | 9034 | 9795 |
| 0404 | 1010 | 1544 | 2532 | 3321 | 4401 | 5271 | 5875 | 7147 | 8349 | 9044 | 9824 |
| 0475 | 1013 | 1610 | 2621 | 3335 | 4422 | 5320 | 6029 | 7170 | 8399 | 9087 | 9858 |
| 0483 | 1016 | 1684 | 2637 | 3439 | 4480 | 5330 | 6048 | 7221 | 8471 | 9095 | 9901 |
| 0486 | 1041 | 1817 | 2643 | 3447 | 4514 | 5446 | 6087 | 7230 | 8478 | 9110 | 9927 |
| 0531 | 1116 | 1883 | 2701 | 3450 | 4518 | 5447 | 6097 | 7266 | 8517 | 9120 | 9951 |
| 0545 | 1126 | 1929 | 2722 | 3516 | 4523 | 5451 | 6202 | 7296 | 8580 | 9136 | 9977 |
| 0560 | 1133 | 1989 | 2748 | 3540 | 4565 | 5464 | 6271 | 7449 | 8631 | 9159 | 9980 |
| 0566 | 1144 | 2027 | 2784 | 3607 | 4583 | 5465 | 6350 | 7479 | 8656 | 9169 | 9994 |

छपाईतील कोणत्याही चुकीबद्दल आम्ही जबाबदार नाही. अचुक निकालासाठी अधिकृत गॅझेट पहावे. प्रस्तुतकर्ता: महाराष्ट्र राज्य लॉटरी

**महाराष्ट्रलक्ष्मी विकली लॉटरी — सोडत दर शनिवारी — तिकीट किंमत रु. 50/- — सोडत क्र. 18 — सोडत दिनांक 02/05/2026**

पहिले सामाईक बक्षिस रु. 7 लाख : **ML-04 : 6914**

प्रोत्साहनपर बक्षिस रु. 2500/- — पहिल्या बक्षीसाची विजेता मालिका सोडून इतर सर्व मालिकांसाठी : **6914** — किशोर लॉटरी सेंटर, सांगली / श्री सिद्धि समर्थ एजेंसी, दादर - मुंबई

दुसरे बक्षिस रु. 5000/- : **8055** — जय जलाराम लॉटरीज् - गोरेगाव

सर्व मालिकांसाठी • FOLLOWING NO.'S ARE COMMON TO ALL SERIES • सर्व मालिकांसाठी

| बक्षिस | | | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| तिसरे बक्षिस रु. 2000/- | 0050 | 0082 | 0169 | 3184 | 3304 | 4153 | 4738 | 5043 | 5061 | 8015 |
| चौथे बक्षिस रु. 1000/- | 1613 | 2887 | 2971 | 3935 | 4587 | 4617 | 6390 | 6727 | 7408 | 8603 |
| पाचवे बक्षिस रु. 500/- | 1134 | 1244 | 1401 | 2042 | 4315 | 6923 | 7522 | 8044 | 8263 | 9509 |
| सहावे बक्षिस रु. 200/- | 2167 | 2742 | 3486 | 5396 | 5467 | 5738 | 7658 | 9115 | 9226 | 9290 |

सातवे बक्षीस रु. 100/- (सर्व मालिकांसाठी)

| | | | | | | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | | 1172 | 1921 | 2473 | 3130 | 3722 | 4516 | 5343 | 6087 | 6896 | 7685 | 8538 | 9273 |
| | | 1173 | 1923 | 2490 | 3138 | 3749 | 4533 | 5354 | 6096 | 6902 | 7711 | 8582 | 9278 |
| | | 1193 | 1938 | 2492 | 3180 | 3758 | 4534 | 5358 | 6112 | 6937 | 7723 | 8586 | 9279 |
| | | 1196 | 1939 | 2500 | 3233 | 3768 | 4549 | 5440 | 6149 | 6959 | 7727 | 8592 | 9321 |
| | | 1213 | 1964 | 2525 | 3239 | 3788 | 4563 | 5444 | 6156 | 6961 | 7777 | 8645 | 9339 |
| 0005 | 0501 | 1221 | 1981 | 2527 | 3281 | 3828 | 4564 | 5461 | 6168 | 6968 | 7778 | 8683 | 9349 |
| 0008 | 0511 | 1225 | 2008 | 2542 | 3300 | 3836 | 4624 | 5495 | 6196 | 6974 | 7779 | 8688 | 9367 |
| 0010 | 0513 | 1254 | 2026 | 2552 | 3314 | 3909 | 4687 | 5500 | 6216 | 6994 | 7781 | 8689 | 9380 |
| 0014 | 0520 | 1275 | 2033 | 2566 | 3327 | 3913 | 4717 | 5529 | 6222 | 7024 | 7797 | 8732 | 9406 |
| 0019 | 0545 | 1310 | 2047 | 2651 | 3331 | 3932 | 4721 | 5535 | 6246 | 7060 | 7798 | 8739 | 9455 |
| 0032 | 0609 | 1318 | 2075 | 2672 | 3334 | 3936 | 4738 | 5544 | 6264 | 7078 | 7817 | 8760 | 9464 |
| 0037 | 0610 | 1320 | 2077 | 2682 | 3335 | 3983 | 4743 | 5546 | 6326 | 7157 | 7857 | 8796 | 9467 |
| 0038 | 0626 | 1323 | 2093 | 2684 | 3350 | 4004 | 4792 | 5555 | 6339 | 7167 | 7864 | 8801 | 9487 |
| 0048 | 0632 | 1336 | 2096 | 2714 | 3351 | 4005 | 4795 | 5558 | 6364 | 7172 | 7871 | 8843 | 9494 |
| 0055 | 0658 | 1351 | 2107 | 2720 | 3366 | 4022 | 4810 | 5563 | 6380 | 7177 | 7950 | 8853 | 9503 |
| 0089 | 0666 | 1381 | 2112 | 2724 | 3377 | 4028 | 4837 | 5569 | 6401 | 7193 | 7979 | 8859 | 9522 |
| 0090 | 0689 | 1386 | 2125 | 2732 | 3392 | 4043 | 4841 | 5576 | 6410 | 7203 | 7981 | 8867 | 9579 |
| 0091 | 0694 | 1421 | 2139 | 2739 | 3396 | 4044 | 4842 | 5578 | 6435 | 7207 | 7990 | 8868 | 9595 |
| 0093 | 0700 | 1427 | 2200 | 2742 | 3398 | 4046 | 4900 | 5582 | 6484 | 7277 | 8007 | 8873 | 9607 |
| 0097 | 0706 | 1433 | 2204 | 2746 | 3423 | 4053 | 4933 | 5599 | 6509 | 7305 | 8041 | 8884 | 9609 |
| 0102 | 0715 | 1470 | 2209 | 2772 | 3431 | 4068 | 4944 | 5601 | 6533 | 7317 | 8060 | 8887 | 9614 |
| 0125 | 0716 | 1509 | 2218 | 2789 | 3432 | 4076 | 4961 | 5625 | 6550 | 7319 | 8065 | 8888 | 9643 |
| 0129 | 0720 | 1512 | 2220 | 2802 | 3486 | 4224 | 5054 | 5628 | 6556 | 7360 | 8068 | 8919 | 9690 |
| 0152 | 0796 | 1574 | 2223 | 2812 | 3491 | 4235 | 5055 | 5814 | 6563 | 7370 | 8083 | 8967 | 9709 |
| 0153 | 0902 | 1618 | 2225 | 2823 | 3495 | 4250 | 5056 | 5840 | 6566 | 7429 | 8163 | 8968 | 9719 |
| 0195 | 0903 | 1631 | 2232 | 2826 | 3523 | 4315 | 5081 | 5882 | 6591 | 7439 | 8168 | 8980 | 9756 |
| 0210 | 0987 | 1686 | 2240 | 2832 | 3535 | 4340 | 5085 | 5913 | 6609 | 7454 | 8204 | 8983 | 9820 |
| 0232 | 0994 | 1690 | 2247 | 2926 | 3541 | 4341 | 5123 | 5920 | 6626 | 7464 | 8283 | 8984 | 9849 |
| 0244 | 1014 | 1695 | 2248 | 2956 | 3563 | 4393 | 5125 | 5955 | 6627 | 7487 | 8298 | 9031 | 9850 |
| 0259 | 1018 | 1749 | 2257 | 2992 | 3566 | 4403 | 5128 | 5965 | 6646 | 7517 | 8314 | 9059 | 9851 |
| 0260 | 1039 | 1754 | 2282 | 3002 | 3613 | 4425 | 5147 | 5975 | 6649 | 7519 | 8325 | 9074 | 9902 |
| 0266 | 1053 | 1776 | 2291 | 3023 | 3619 | 4428 | 5156 | 5981 | 6653 | 7529 | 8342 | 9090 | 9910 |
| 0289 | 1100 | 1799 | 2295 | 3056 | 3637 | 4432 | 5168 | 6006 | 6684 | 7531 | 8424 | 9097 | 9929 |
| 0303 | 1114 | 1816 | 2309 | 3062 | 3639 | 4443 | 5171 | 6013 | 6686 | 7567 | 8445 | 9109 | 9931 |
| 0307 | 1131 | 1821 | 2327 | 3073 | 3676 | 4447 | 5185 | 6016 | 6700 | 7575 | 8452 | 9116 | 9937 |
| 0356 | 1135 | 1841 | 2330 | 3075 | 3690 | 4461 | 5203 | 6029 | 6730 | 7578 | 8453 | 9169 | 9953 |
| 0390 | 1144 | 1871 | 2408 | 3108 | 3692 | 4467 | 5227 | 6034 | 6791 | 7592 | 8469 | 9204 | 9956 |
| 0457 | 1148 | 1891 | 2426 | 3117 | 3702 | 4494 | 5264 | 6050 | 6846 | 7605 | 8512 | 9221 | 9975 |
| 0476 | 1156 | 1898 | 2440 | 3120 | 3710 | 4495 | 5280 | 6068 | 6864 | 7646 | 8528 | 9234 | 9989 |
| 0481 | 1164 | 1911 | 2464 | 3126 | 3713 | 4503 | 5285 | 6084 | 6867 | 7670 | 8530 | 9261 | 9995 |

छपाईतील कोणत्याही चुकीबद्दल आम्ही जबाबदार नाही. अचुक निकालासाठी अधिकृत गॅझेट पहावे. प्रस्तुतकर्ता: महाराष्ट्र राज्य लॉटरी

**निकाल — महाराष्ट्र राज्य लॉटरी — महाराष्ट्र सह्याद्री — प्रभालक्ष्मी विकली लॉटरी — सोडत सायं. 4:30 वाजता**

सोडत दर शनिवार • सोडत क्रमांक 18 • तिकीट किं. रु. 15/- • सोडत दिनांक 02/05/2026

पहिले सामायिक बक्षिस रु. 10000/- : **SP-09 : 3443**

सर्व मालिकांसाठी • FOLLOWING NO.'S ARE COMMON TO ALL SERIES • सर्व मालिकांसाठी

| बक्षिस | | | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| दुसरे बक्षिस रु. 2000/- | 2021 | 3394 | 4192 | 4463 | 5390 (डायमंड कॉर्पोरेशन, बोरिवली) | 5605 (त्रिमूर्ती लॉटरी एजन्सी - मुंबई) | 5864 (किशोर लॉटरी सेंटर, सांगली) | 6130 (श्री गणेश एन्टरप्रायझेस, दादर, मुंबई) | 8439 | 8777 |
| तिसरे बक्षिस रु. 1000/- | 0808 | 0821 | 1867 | 2726 | 5130 | 6076 | 6151 | 6466 | 7727 | 8999 |
| चौथे बक्षिस रु. 500/- | 4792 | 5922 | 6401 | 6511 | 7452 | 7597 | 8225 | 8885 | 9172 | 9585 |

पाचवे बक्षीस रु. 300/- (सर्व मालिकांसाठी)

| | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | 0734 | 1739 | 3193 | 3869 | 5104 | 6552 | 7729 | 8898 |
| | 0899 | 1742 | 3258 | 3936 | 5263 | 6632 | 7828 | 8911 |
| 0011 | 0902 | 2058 | 3266 | 3943 | 5313 | 6650 | 7871 | 9129 |
| 0040 | 0970 | 2129 | 3287 | 4067 | 5315 | 6652 | 8087 | 9278 |
| 0058 | 1038 | 2174 | 3309 | 4146 | 5324 | 6698 | 8158 | 9483 |
| 0067 | 1115 | 2282 | 3364 | 4231 | 5532 | 6866 | 8168 | 9524 |
| 0206 | 1291 | 2289 | 3378 | 4431 | 5845 | 6987 | 8287 | 9673 |
| 0288 | 1319 | 2303 | 3403 | 4488 | 6045 | 7070 | 8538 | 9759 |
| 0320 | 1411 | 2327 | 3414 | 4493 | 6099 | 7225 | 8598 | 9836 |
| 0368 | 1415 | 2329 | 3441 | 4604 | 6116 | 7250 | 8651 | 9923 |
| 0480 | 1490 | 3032 | 3488 | 4701 | 6184 | 7303 | 8790 | 9958 |
| 0505 | 1625 | 3134 | 3596 | 4728 | 6446 | 7531 | 8805 | 9959 |
| 0674 | 1630 | 3179 | 3613 | 4922 | 6479 | 7701 | 8834 | 9999 |

छपाईतील कोणत्याही चुकीबद्दल आम्ही जबाबदार नाही. अचुक निकालासाठी अधिकृत गॅझेट पहावे. प्रस्तुतकर्ता: महाराष्ट्र राज्य लॉटरी

**निकाल — गणेशलक्ष्मी समृद्धी विकली लॉटरी — सोडत सायं. 5:00 वाजता**

सोडत दर शनिवार • सोडत क्रमांक 18 • तिकीट किं. रु. 10/- • सोडत दिनांक 02/05/2026

पहिले सामायिक बक्षिस रु. 10000/- : **MG-02 : 9830**

सर्व मालिकांसाठी • FOLLOWING NO.'S ARE COMMON TO ALL SERIES • सर्व मालिकांसाठी

दुसरे बक्षिस रु. 5000/- : **5334**

तिसरे बक्षिस रु. 2000/- : **5557**

| बक्षिस | | | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| चौथे बक्षिस रु. 1000/- | 0356 | 0806 | 4061 | 4340 | 4515 | 4648 | 5107 | 5892 | 8564 | 9241 |
| पाचवे बक्षिस रु. 500/- | 0206 | 3543 | 4679 | 5590 | 6964 | 7962 | 8134 | 8198 | 8510 | 8748 |
| सहावे बक्षिस रु. 200/- | 0398 | 0785 | 1161 | 1440 | 1657 | 3794 | 6078 | 6607 | 8854 | 9894 |

सातवे बक्षीस रु. 100/- (सर्व मालिकांसाठी)

| | | | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | | 1568 | 2382 | 3185 | 4310 | 5500 | 6180 | 7375 | 8690 | 9504 |
| | | 1732 | 2401 | 3206 | 4330 | 5510 | 6293 | 7387 | 8695 | 9529 |
| | | 1763 | 2423 | 3229 | 4395 | 5516 | 6320 | 7397 | 8718 | 9556 |
| 0079 | 0911 | 1811 | 2426 | 3238 | 4427 | 5521 | 6336 | 7432 | 8721 | 9581 |
| 0097 | 1063 | 1827 | 2433 | 3324 | 4460 | 5523 | 6376 | 7444 | 8831 | 9595 |
| 0106 | 1091 | 1835 | 2450 | 3332 | 4495 | 5537 | 6404 | 7507 | 8839 | 9628 |
| 0190 | 1102 | 1843 | 2454 | 3335 | 4578 | 5545 | 6602 | 7572 | 8865 | 9658 |
| 0233 | 1134 | 1991 | 2457 | 3341 | 4625 | 5549 | 6648 | 7874 | 8890 | 9681 |
| 0311 | 1135 | 2021 | 2497 | 3534 | 4662 | 5551 | 6655 | 7889 | 8899 | 9691 |
| 0395 | 1145 | 2025 | 2556 | 3629 | 4666 | 5564 | 6666 | 7891 | 8985 | 9822 |
| 0409 | 1194 | 2027 | 2585 | 3833 | 4679 | 5592 | 6669 | 7971 | 9063 | 9859 |
| 0488 | 1227 | 2042 | 2626 | 3855 | 4693 | 5593 | 6770 | 8003 | 9093 | 9897 |
| 0497 | 1233 | 2074 | 2731 | 3929 | 4698 | 5652 | 6942 | 8186 | 9134 | 9899 |
| 0539 | 1286 | 2168 | 2734 | 3932 | 4746 | 5685 | 6962 | 8285 | 9159 | 9917 |
| 0569 | 1321 | 2191 | 2766 | 3953 | 4933 | 5857 | 6994 | 8294 | 9172 | 9922 |
| 0611 | 1351 | 2204 | 2891 | 4003 | 5021 | 5995 | 7108 | 8389 | 9174 | 9923 |
| 0640 | 1376 | 2226 | 2992 | 4093 | 5159 | 6019 | 7225 | 8480 | 9198 | 9938 |
| 0820 | 1408 | 2239 | 3093 | 4156 | 5336 | 6049 | 7277 | 8623 | 9296 | 9946 |
| 0845 | 1412 | 2266 | 3109 | 4260 | 5337 | 6081 | 7314 | 8652 | 9375 | 9957 |
| 0864 | 1490 | 2272 | 3134 | 4283 | 5351 | 6116 | 7327 | 8655 | 9460 | 9985 |
| 0870 | 1512 | 2282 | 3157 | 4296 | 5404 | 6142 | 7368 | 8669 | 9492 | 9989 |

छपाईतील कोणत्याही चुकीबद्दल आम्ही जबाबदार नाही. अचुक निकालासाठी अधिकृत गॅझेट पहावे. प्रस्तुतकर्ता: महाराष्ट्र राज्य लॉटरी

# देशभरातील कोट्यवधी मोबाईलवर दोनदा सायरन वाजला

पान १ वरून

लक्षात आले की, कोट्यवधी मोबाईलवर केंद्र सरकार हा चाचणी संदेश पाठवू शकले याचा अर्थ सरकारकडे सर्वांच्या मोबाईलधारकांचे क्रमांक आणि त्यातून व्यक्तिगत माहिती सरकार जमा करत आहे. यावरून मग लोक सरकारला सवाल करू लागले? मोबाईल सर्व्हिस देणाऱ्या कंपन्यांनी परवानगी न घेता हे मोबाईल क्रमांक सरकारला दिले का? असा सवाल विचारला जाऊ लागला. यावर अखेर सरकारने स्पष्टीकरण दिले की, फोन टॉवरमधून जिथे नेटवर्क आहे तिथे संदेश पोहोचवता येतो, त्यासाठी फोन नंबरची गरज नाही.

भारत सरकारच्या दूरसंचार विभाग आणि राष्ट्रीय आपत्ती व्यवस्थापन प्राधिकरणाने नागरिकांसाठी तत्काळ आपत्ती सूचना सेवेसाठी, स्वदेशी तंत्रज्ञानाचा वापर करून सेल ब्रॉडकास्ट सुरू केले आहे. आज या सेल ब्रॉडकास्टची चाचणी घेण्यात आली. या चाचणीत मोबाईलधारकांना त्यांच्या मोबाईलवर इंग्रजी आणि स्थानिक भाषेत एक संदेश पाठवण्यात आला. त्यात म्हटले होते की, 'भारताने आपल्या नागरिकांसाठी तत्काळ आपत्ती सूचना सेवेकरिता, स्वदेशी तंत्रज्ञानाचा वापर करून सेल ब्रॉडकास्ट सुरू केले आहे. नागरिकांना सतर्क करा, राष्ट्राला सुरक्षित ठेवा. हा संदेश मिळाल्यावर जनतेकडून कोणतीही कृती करण्याची आवश्यकता नाही. हा एक चाचणी संदेश आहे'.

दिल्लीसह सर्व राज्यांतील मोबाईल फोनवर एकाच वेळी हा चाचणी संदेश पाठवण्यात आला. अनेकांना तो दोनदा पाठवण्यात आला. राष्ट्रीय आपत्ती व्यवस्थापन प्राधिकरणाने मोबाईल एसएमएसला सेल ब्रॉडकास्ट तंत्रज्ञानाशी जोडल्यामुळे निवडलेल्या परिसरात सक्रिय असलेल्या सर्व मोबाईल फोनवर एकाच वेळी हा सायरन वाजला. यामुळे आपत्कालीन परिस्थितीत माहिती त्वरित लोकांपर्यंत पोहोचवता येणार आहे. केंद्र सरकारने ही प्रणाली आपत्ती व्यवस्थापन लक्षात घेऊन विकसित केली आहे. भूकंप, पूर, चक्रीवादळ, दहशतवादी हल्ले किंवा इतर आपत्कालीन परिस्थितीत नागरिकांना काही सेकंदांत सतर्क करणे हा यामागचा उद्देश आहे. अलर्टसोबत सायरनसारखा मोठा आवाज दिला जातो, जेणेकरून नागरिकांचे तत्काळ लक्ष वेधले जाईल.

या चाचणीवेळी अँड्रॉईड मोबाईल धारकांना संदेश वाचून किंवा ऐकून झाल्यानंतर तो बंद करण्यासाठी स्क्रीनवर ओके हा पर्याय उपलब्ध होता. मात्र, हा आपत्कालीन संदेश पूर्णपणे वाचून किंवा ऐकून संपेपर्यंत सायरनसारखा मोठा आवाज सुरूच राहिला. त्यामुळे अनेक आयफोन वापरकर्त्यांना अलार्म थांबवण्यासाठी प्रतीक्षा करावी लागली. तर अनेकांना हा अलर्ट आलाच नाही. यावरून ही समाजमाध्यमांवर अनेक मीम व्हायरल झाले.

हा मेसेज इंग्रजी आणि स्थानिक भाषेत पाठवण्यात आला होता. या संदेशातील मराठी भाषेची गुणवत्ता अत्यंत खराब होती. हिंदी भाषिक महिला मराठी बोलते असे वाटत होते. यावर अनेकांनी नाराजी व्यक्त केली. या मुद्यावर मनसेही एक्स पोस्टमध्ये करून म्हटले की, महाराष्ट्रात सुरुवातीला हा संदेश इंग्रजी आणि इतर भाषांमध्ये (तमिळ/ तेलुगू) पाठवण्यात आला आणि त्यानंतर मराठीत आला. महाराष्ट्रात मराठी ही प्रमुख भाषा असताना, सुरुवातीलाच मराठीत संदेश देणे अपेक्षित होते. आपत्कालीन परिस्थितीत नागरिकांना त्यांच्या स्थानिक भाषेत तत्काळ सूचना मिळणे अत्यावश्यक आहे. त्यामुळे सरकारने याची गंभीर दखल घेऊन प्रत्येक राज्यात त्या-त्या स्थानिक भाषेतच असा संदेश प्रथम पाठवला जावा, याची खात्री करावी. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी या चाचणीबाबत सकारात्मक भूमिका मांडली. त्यांनी सांगितले की, अशा प्रकारचा प्रयोग होणार असल्याची पूर्वकल्पना देण्यात आली होती. ही संपूर्णपणे स्वदेशी तंत्रज्ञानावर आधारित अलर्ट प्रणाली आहे. युद्ध, आपत्ती किंवा आणीबाणीच्या काळात प्रत्येक नागरिकाला त्याच्या भाषेत तत्काळ सूचना देणे शक्य होणार आहे. आजची चाचणी यशस्वी ठरली असून, भारताने आपत्ती व्यवस्थापनाच्या तयारीत मोठे पाऊल टाकले आहे.

हा अलर्ट देताना पुरेशी माहिती दिल्याचा दावा सरकारने केला असला तरी नागरिकांना याबाबत माहितीच नव्हती. केंद्र सरकारच्या दूरसंचार विभागाने ही माहिती ३० एप्रिलला रात्री ८ वाजता त्यांच्या वेबसाईटवर ऑनलाईन दिली होती. मात्र कोणतीही पत्रकार परिषद घेण्यात आली नाही किंवा समाजमाध्यमांवर व्यापक जनजागृतीही करण्यात आली नाही. सत्ताधारी पक्ष भाजपाकडून साध्या निर्णयाचीदेखील माहिती मोठ्या प्रमाणावर समाजमाध्यमांवर प्रसारित केली जाते. पण देशभरातील नागरिकांच्या मोबाईलवर एकाचवेळी अलर्ट येणार असलेल्या या महत्त्वाच्या चाचणीबाबत पूर्वसूचना का दिली नाही, असा प्रश्न विचारला जात आहे. ती मिळाली असती तर लोकांमध्ये संभ्रम आणि घबराट निर्माण झाली होती. ही चाचणी पुन्हा केली जाणार आहे, असे मुंबई महापौर रितू तावडे यांनी सांगितले.

# मुंबईत उकाड्याचा तडाखा दादरमध्ये हिट शेल्टर सुविधा

■ मुंबई

**मुंबई** शहरात गेल्या काही दिवसांपासून उष्णतेचा तडाखा वाढत असून नागरिकांना तीव्र उकाड्याचा सामना करावा लागत आहे. तापमान ३५ अंशांच्या घरात पोहोचल्याने रस्त्यावर काम करणारे आणि सिग्नलवर थांबणारे वाहनचालक त्रस्त झाले आहेत. या पार्श्वभूमीवर दादर टीटी परिसरात नागरिकांना उन्हापासून दिलासा देण्यासाठी 'हिट शेल्टर' सुविधा उभारली आहे. सिग्नलवर थांबताना काही क्षण सावली मिळावी हा या उपक्रमाचा उद्देश आहे. काल शहरात ३४ ते ३५ अंश सेल्सियस तापमानाची नोंद झाली, तर आजही ३५ ते ३६ अंश सेल्सियसपर्यंत पारा राहण्याचा अंदाज हवामान विभागने वर्तवला आहे. मुंबईत वाहतुकीचे नियम पाळताना अनेक वाहनचालकांना सिग्नलवर बराच वेळ थांबावे लागते. अशा वेळी प्रखर उन्हामुळे त्यांना त्रास होतो.

# उल्हासनगरची पॅराडाईज इमारत पाडण्याचे न्यायालयाचे आदेश

**फसव्या पद्धतीने परवानग्या मिळवल्या**

■ उल्हासनगर

**मुंबई** उच्च न्यायालयाने उल्हासनगरमधील 'झलक पॅराडाईज' या १६ मजली इमारतीवर अनधिकृत बांधकाम आणि फसव्या पद्धतीने परवानग्या मिळवल्याप्रकरणी मोठ्या कारवाईचा निर्णय जाहीर केला आहे. ही इमारत जमीनदोस्त करण्याचा आदेश न्यायमूर्ती कमल काथा आणि न्यायमूर्ती एस. गडकरी यांच्या खंडपीठाने पालिकेला देत बिल्डरची याचिका फेटाळून लावली आहे.

या प्रकरणात खंडपीठाने असे निरीक्षण नोंदवले की, विकासकाने केवळ पालिकेची दिशाभूल केली नाही, तर गंभीर विसंगतींनी भरलेली कागदपत्रेही सादर केली आहेत. हे प्रकरण व्यवस्थेला दूषित करणारे आहे. पालिका अधिकाऱ्यांनी इमारत बांधकामाला मंजुरी देताना योग्य ती खबरदारी घेतली नव्हती.उल्हासनगर -५ येथे बांधलेल्या या इमारतीत ६५ फ्लॅट्स आणि चार दुकाने आहेत. या



इमारतीचा जवळपास ८० टक्के भाग डीपी रस्त्यांवर अतिक्रमण करत आहे. ३६ मीटर रिंग रोड आणि २४ मीटर डीपी रोडवर बांधकाम होऊनही या प्रकल्पाने अनिवार्य ९.७ मीटरऐवजी केवळ ३ मीटरचीच जागा मोकळी सोडली आहे. २०२४ मध्ये बांधकामाबाबत तक्रारी आल्यावर हा मुद्दा प्रथम उघडकीस आला. त्यानंतरच्या तपासणीत अनेक अनियमितता आढळून आल्या.

# दिवा-चिपळूण मार्गावर विशेष मेमू रेल्वे सुरू



■ रायगड

**रेल्वे** प्रशासनाने प्रवाशांची वाढती गर्दी लक्षात घेऊन दिवा-चिपळूण-दिवा या मार्गावर विशेष मेमू रेल्वे सुरू करण्याचा निर्णय घेतला आहे. ही रेल्वे काल १ मेपासून सुरू झाली असून ती ७ जूनपर्यंत चालवली जाणार आहे.

ही गाडी दर शुक्रवारी, शनिवारी आणि रविवारी सुरू राहणार असून एकूण ३६ सेवा उपलब्ध करून देण्यात येणार आहेत.

दिवा ते चिपळूण गाडी रात्री ११.२५ वाजता सुटून दुसऱ्या दिवशी सकाळी ६.३० वाजता पोहोचेल, तर चिपळूण ते दिवा गाडी दुपारी ३.३० वाजता सुटून रात्री ११.१० वाजता पोहोचेल. ही गाडी निळजे, तळोजा पंचनंद, कळंबोली, पनवेल, सोमटणे, आपटा, जांभिवली, पेण, नागोठणे, रोहा, कोलाड, इंदापूर, माणगाव, गोरेगाव रोड, वीर, सापे, वांगणी, करंजाडी, विन्हेरे, दिवाणखवटी, कळंबणी बुद्रुक, खेड आणि आंजनी अशा अनेक महत्त्वाच्या स्थानकांवर थांबणार आहे.



शिवडी ते वरळी अटल सेतू जोड मार्गाचे काम सुरू आहे, परळ गाव येथे या मार्गाच्या भल्या मोठ्या गर्डर टाकण्याचे काम झाल्यानंतर मोनोरेलची सध्या ट्रायल रन सुरू आहे. (छायाः दीपक साळवी)

# ठाण्यातील माजिवडा ते वडपे उड्डाणपूल लवकरच खुला

■ ठाणे

**मुंबई-नाशिक** महामार्गावरील ठाण्यातील माजिवडा ते वडपे या प्रकल्पाचे काम ९० टक्के पूर्ण झाले असून येत्या लवकरच या मार्गिकेच्या निर्माणाचे काम पूर्ण होण्याची शक्यता आहे. त्यामुळे मुंबई - नाशिक महामार्ग आणि समृद्धी महामार्गावरून मुंबईच्या दिशेने होणारा प्रवास वेगवान होणार आहे. माजिवडा ते वडपे हा उड्डाणपूल सुरू झाल्यानंतर वाहन चालकांना मात्र टोलचा भुर्दंड सहन करावा लागणार आहे.खारेगाव येथील जुन्या टोलनाका भागात नव्याने ४ पदरी मार्गिकेवर टोलनाका उभारण्याचे काम सुरु झाले आहे. त्यामुळे वेगवान प्रवासासोबतच प्रवाशांच्या खिशाला कात्री बसण्याची शक्यता आहे. हा २३.८० किमी लांबीचा प्रकल्प असून २१.३१ किमीपर्यत म्हणजेच, ९० टक्के प्रकल्प पर्ण झाला आहे. यातील साकेत पूल आणि खारेगाव खाडी पूल हे महत्त्वाचे टप्पे सूरु झाले आहेत. वडपे उड्डाणपूल येत्या आठवडा भरात सुरु होण्याची शक्यता आहे. भुयारी मार्ग पूर्ण झाले आहेत. तर रेल्वे पूलाच काम ७१ टक्के पूर्ण झाले आहे.

# महाराष्ट्र दिन व कामगार दिनानिमित्त गुणवंत कामगार सन्मान

■ मुंबई

**महाराष्ट्र** दिन व कामगार दिनाच्या औचित्य साधून महावितरण भांडुप परिमंडलात दरवर्षी प्रमाणे गुणवंत तांत्रिक कामगार यांचा सन्मान सोहळा यावर्षी सुद्धा १ मे २०२६ रोजी भांडुप परिमंडलातील सभागृहात आयोजित करण्यात आले होते.

यावेळी, कार्यक्रमाचे अध्यक्ष भांडुप परिमंडलाचे मुख्य अभियंता संजय पाटील यांच्या हस्ते ध्वजारोहण करण्यात आले. यावेळी, वाशी मंडळाचे अधीक्षक अभियंता दीपक पाटील, पेण मंडळाचे अधीक्षक अभियंता धनराज बिक्कड, ठाणे मंडळाचे अधीक्षक अभियंता (प्रभारी) भांडुप विभागाचे कार्यकारी अभियंता अप्पासो खांडेकर, वागळे इस्टेट विभागाचे कार्यकारी



माणिक राठोड, भांडुप परिमंडलाचे सहाय्यक महाव्यवस्थापक प्रवीण रहांगदळे, कार्यकारी अभियंता (प्रशा). श्रीनिवास चटलावार, ठाणे १ विभागाचे कार्यकारी अभियंता चंद्रमणी मेश्राम, अभियंता सतीश जाधव, भांडुप परिमंडलाच्या प्रणाली विश्लेषक कीर्ती जोशी, उपमुख्य औद्योगिक संबंध अधिकारी महेंद्र बागुल व इतर वरिष्ठ अधिकारी, कर्मचारी व त्यांचे कुटुंबीय उपस्थित होते.

# महामार्गावर मिनी ट्रॅव्हलरचे टायर फुटल्याने भीषण अपघात

■ १५ प्रवासी जखमी
■ एका महिलेचा मृत्यू

■ पालघर

**मुंबई** अहमदाबाद महामार्गावर पालघर तालुक्यातील चिंचपाडा परिसरात मिनी ट्रॅव्हलरचा टायर फुटल्याने भीषण अपघात झाला. या अपघातात १५ प्रवाशांचा मृत्यू झाला तर एका महिला प्रवाशाचा मृत्यू झाला. शुक्रवारी संध्याकाळी ६ च्या सुमारास हा अपघात घडला. गुजरातमधील बिल्लीमोरा येथील लाड कुटुंबियातील एक मुलगी परदेशी जाणार होती. तिला निरोप देण्यासाठी कुटुंबीय आणि नातेवाईक मुंबई विमानतळावर खासगी मिनी ट्रॅव्हलर वाहनाने येत होते.

शुक्रवारी संध्याकाळी चिंचपाडा परिसरात ट्रॅव्हलरचा टायर अचानक फुटला. त्याचवेळी मागून येणाऱ्या वेगवान वाहनाने मिनी ट्रॅव्हलरला जोरदार धडक दिली. अपघात इतका भीषण होता की अनेक प्रवासी बसमध्ये अडकून पडले होते. स्थानिक नागरिक आणि तरुणांनी तत्काळ मदतकार्य सुरू करत जखमींना बाहेर काढले. जखमींना तात्काळ कासा उपजिल्हा रुग्णालयात दाखल करण्यात आले. त्यानंतर गंभीर जखमी असलेल्या तीन महिलांना धुंडलवाडीच्या वेदांत रुग्णालयात हलविण्यात आले. जखमी पुष्पाबेन लाड (६० ) यांचा उपचारादरम्यान मृत्यू झाला.

# महावितरणच्या गुणवंत जनमित्र, यंत्रचालकांचा सत्कार

■ कल्याण

**कामगार** दिनाचे औचित्य साधून महावितरण कल्याण परीमंडळाने आपल्या कार्यक्षेत्रात येणाऱ्या जनमित्र आणि यंत्र चालकांचा गुणगौरव केला. कल्याणमधील तेजश्री इमारतीत झालेल्या या कार्यक्रमात कल्याण१ आणि २, पालघर आणि वसई मंडळ कार्यालय अंतर्गत येणाऱ्या सर्व उपविभागीय कार्यालयातील प्रत्येकी एक जनमित्र आणि १० विभागीय कार्यालयात अंतर्गत येणाऱ्या प्रत्येकी एका



यंत्रचालकांचा यावेळी गुणगौरव करण्यात आला.

कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी कोकण प्रादेशिक कार्यालयाचे सह व्यवस्थापकीय संचालक दिलीप जगदाळे उपस्थित होते. कल्याण परिमंडळाचे मुख्य अभियंता चंद्रमणी मिश्रा, अधीक्षक अभियंता अनिल थोरात, विजय फुंडे, मंदार अत्रे, मोहन काळोखे, सहाय्यक महाव्यवस्थापक (मानव संसाधन) सुशील पावसकर उपस्थित होते.

# आज तुमच्यासोबत आहे उद्याचे सांगता येत नाही

**खासदार संजय जाधवांचे विधान**

■ परभणी

**परभणीचे** उबाठा खासदार संजय जाधव यांच्या एका सूचक वक्तव्याने राज्याच्या राजकीय वर्तुळात चर्चांना उधाण आले आहे. मी आज तुमच्यासोबत आहे, पण उद्याचे सांगता येणार नाही असे विधान करत त्यांनी भविष्यातील राजकीय भूमिकेबाबत अनिश्चितता व्यक्त केली. त्यांच्या या वक्तव्यामुळे ते शिंदे गटात जाणार असल्याच्या चर्चांना अधिक बळ मिळाले आहे.परभणी येथील एका खाजगी रुग्णालयाच्या उद्घाटन कार्यक्रमात बोलताना जाधव यांनी आपली भूमिका स्पष्ट केली. ते म्हणाले की, ज्या पक्षाने मला मोठे केले त्या पक्षाचा मी आजही आदर करतो आणि पुढेही करत राहीन. ज्यांनी मला संधी दिली, त्यांच्याशी प्रतारणा करण्याची माझी मानसिकता नाही. बदलत्या राजकीय परिस्थितीत भविष्यात काय घडेल ? याबाबत ठामपणे काही सांगता येत नाही. राजकारणातील बदलत्या प्रवाहांवर भाष्य करताना जाधव यांनी आर्थिक घटकांच्या वाढत्या प्रभावाकडेही लक्ष वेधले. ते म्हणाले की , आज राजकारणात आर्थिक निकषांना मोठे महत्त्व आले आहे.

भारत की जनगणना 2027 CENSUS OF INDIA
गृह मंत्रालय भारत सरकार

**आमची जनगणना आमचा विकास**

(जनगणना २०२७ चा पहिला टप्पा)
स्व-गणना (Self-Enumeration) वर सामान्य प्रश्न आणि त्यांची उत्तरे (भाग-१)

**स्व-गणना काय आहे?**
स्व-गणना एक ऑनलाईन प्रक्रिया आहे, ज्यामध्ये तुम्ही प्रगणकाची वाट न बघता स्वतः एसई पोर्टल (se.census.gov.in) वर आपल्या परिवाराची माहिती भरू आणि सादर करू शकता



- **स्व-गणना अनिवार्य आहे का?**
  नाही, ही एक अतिरिक्त सुविधा आहे. जर तुम्ही स्व-गणना न केल्यास, प्रगणक तुमच्या घरी येऊन माहिती मिळवतील
- **मी कोणत्याही भाषेमध्ये स्व-गणना करू शकतो/शकते का?**
  ही सुविधा हिंदी, इंग्रजी आणि १४ भारतीय भाषांमध्ये उपलब्ध आहे
- **स्व-गणनेकरिता इंटरनेट आवश्यक आहे का?**
  हो, पोर्टलवर जाण्याकरिता इंटरनेट आवश्यक आहे.
- **माझी माहिती सुरक्षित आहे का?**
  हो, सर्व डेटा सुरक्षित, एन्क्रिप्टेड आणि शासकीय सर्व्हर्समध्ये साठवण्यात आला आहे.
- **एसई आयडी काय आहे आणि त्याचा वापर काय आहे?**
  माहिती सादर केल्यानंतर, तुम्हाला विशिष्ट ११ अंकी एसई आयडी (एसएमएस/ईमेल द्वारे) प्राप्त होईल, जो प्रगणकास तो/ती तुमच्या घरी भेट देईल तेव्हा दाखवावा.
- **एसई आयडी विसरल्यास काय करावे?**
  पोर्टलवर नोंदणीकृत मोबाईल क्रमांकाचा वापर करून एसई आयडी पुन्हा प्राप्त करता येईल.
- **स्व-गणना केल्यानंतरही प्रगणक येतील?**
  हो, प्रगणक तुमच्या घरी भेट देतील आणि एसई आयडीचा वापर करून तुमच्या तपशिलाची पुष्टी करतील.
- **मला कोणतेही दस्तऐवज अपलोड करण्याची गरज आहे का?**
  कोणतेही दस्तऐवज अपलोड करण्याची आवश्यकता नाही आहे.
- **पोर्टलवर मदत उपलब्ध आहे का?**
  पोर्टलवर युजर गाईड, फ्लोचार्ट्स, शिकवणी व्हिडियो, एफएक्यूज आणि टूलटीप्सच्या स्वरुपात मदत उपलब्ध आहे.

टोल फ्री - 1855

CBC 19108/13/0063/2627

चला आपली जबाबदारी पार पाडुया, जनगणनेमध्ये सहभागी होऊया CensusIndia2027



संस्थापक-नाट्याचार्य कृष्णाजी प्रभाकर खाडिलकर

संपादकीय

नवाकाळ

।। न मे भक्त प्रणश्यति ।।

# जनगणना हादेखील राष्ट्रीय उत्सवच

**राज्यभरात** जनगणनेला सुरुवात झाली आहे. महाराष्ट्र दिनाच्या मुहूर्तावर सुरू झालेली ही जनगणना दोन टप्प्यांमध्ये पार पाडली जाणार आहे. भारताच्या संसदीय लोकशाही व्यवस्थेत निवडणुकीला लोकशाहीचा उत्सव म्हटले जाते. परंतु संपूर्ण राष्ट्राच्या हिताचा राष्ट्राच्या सामाजिक एकतेचा भौगोलिक अखंडतेचा आणि खऱ्या अर्थाने आपण या देशाचे नागरीक आहोत याचा अभिमान बाळगून जनगणनेच्या कार्यक्रमात सहभागी होण्याचा उपक्रम म्हणजे सर्वात मोठा राष्ट्रीय उत्सव म्हटला पाहिजे. आपल्याकडे १५ ऑगस्ट, २६ जानेवारी यांना राष्ट्रीय उत्सव म्हटले जाते. १५ ऑगस्टला स्वातंत्र्य मिळाले म्हणजेच ब्रिटिशाच्या गुलामीतून स्वतंत्र भारत असा एक भारताचा नवा प्रवास या दिवशी सुरू झाला. आता हेच स्वतंत्र भारताचे भवितव्य संवर्धित करण्यासाठी म्हणजेच टिकवून ठेवण्यासाठी भारताने स्वतःचे स्वतंत्र संविधान तयार केले. आणि या संविधानाला स्विकृती देऊन २६ जानेवारीला भारत हे प्रजासत्ताक राष्ट्र म्हणून घोषित झाले. प्रजासत्ताक राष्ट्र म्हणजेच संविधानाच्या माध्यमातून भारतीय प्रजेला मिळालेले अधिकार, कर्तव्य आणि जबाबदारीचा तो सर्वात मोठा दस्तावेज ठरतो. परंतु केवळ प्रजासत्ताक राष्ट्र घोषित करून भागणारे नव्हते. म्हणून स्वतंत्र भारतात लोकसंख्येची रचना आणि गणना होणे तितकेच आवश्यक होते. ब्रिटीश काळातही जनगणना होत होती. अगदी १८७२ मध्ये पहिली जनगणना झाली होती. तर स्वतंत्र भारतामध्ये अगदी पहिल्या लोकसभा निवडणूकीपूर्वी १९५१ ला पहिली जनगणना झाली. साधारणपणे दर दहा वर्षांनी होणारी ही जनगणना म्हणजे केवळ लोकसंख्या मोजण्याचा उपक्रम नसतो. तर देशाची आर्थिक, सामाजिक, सांस्कृतिक स्थिती काय आहे याचीही खूप मोठी माहिती संकलित होत राहते. आज जगातला सर्वाधिक लोकसंख्या असलेला देश अनेक प्रकारच्या विविधता घेऊन आपला यशस्वी प्रवास करतो आहे. स्वातंत्र्याच्या ७७ वर्षांत भारताने केलेली प्रगती निश्चितच महत्त्वपूर्ण ठरते. आणि आता पुढच्या पंचवीस वर्षांत भारत हा जगातील विकसित देश म्हणून आपले स्थान निर्माण करतो आहे.

**तंत्रज्ञानाचा प्रभाव**

अशा अनेक अर्थांनी जनगणनेचा विचार केला तर ते संपूर्ण राष्ट्राचे एक प्रतिबिंब ठरते. त्यासाठीच प्रत्येक नागरीकाचा या जनगणनेतला सहभाग म्हणजे आपल्याच देशाच्या भवितव्याविषयीचा तो नवा संकल्प किंवा निर्धारही ठरतो. या दृष्टीकोनातूनच सर्वांनी देशासाठी उत्साहाने सहभागी होण्याचा हा राष्ट्रीय उत्सवच म्हणावा लागतो. केवळ काही कर्मचारी, अधिकारी आपल्या घरी माहिती गोळा करायला आले आहेत. आणि ती माहिती देऊन केवळ एक सोपस्कार पार पाडायचा आहे असा त्यातला भाग नाही. तर त्यावेळी विचारली जाणारी माहिती ही प्रत्येकाच्या माहितीतही भर घालणारी ठरेल. आपली भाषा, आपला धर्म, आपली जात, आपल्या रोजगाराचे स्वरूप, आपल्या घराची मालकी किंवा घर भाड्याचे असेल तर त्याविषयीची माहिती, घरातील एकूण सदस्य त्यांच्या रोजगाराविषयीची माहिती त्यातही तरुण महिला, बाल, वृद्ध याचीदेखील वयोमानाप्रमाणे माहिती गोळा होत असते. यावेळच्या जनगणनेची दोन प्रमुख वैशिष्ट्ये अशी आहेत की, यंदा जातनिहाय जनगणना तर होते आहेच. शिवाय स्वतंत्र भारतातील ही पहिली डिजिटल जनगणना आहे. सर्व माहिती तातडीने संगणकावर संकलित होते आहे. त्याचे लागलीच वर्गीकरण करून अनेक प्रकारची माहिती स्वतंत्रपणे पुढच्या दोन चार महिन्यांमध्ये उपलब्ध होऊ शकणार आहे. म्हणजे जातगणना आणि डिजिटल गणना ही ती दोन वैशिष्ट्ये म्हणता येतात. यावेळच्या माहिती संकलनात एक नवा मुद्दाही सहभागी करून घेण्यात आलेला आहे. तो म्हणजे आपापल्या घरामध्ये प्रामुख्याने सेवन केलं जाणारं अन्नधान्य कोणत्या प्रकारचं आहे याचीदेखील नोंद होणार आहे. या माहितीतून देशाच्या कोणत्या भागामध्ये कोणत्या पद्धतीचे अन्नधान्य सेवन केले जाते याची माहिती संकलिक होईल आणि त्या त्या भागातल्या अन्नधान्याच्या उत्पादनाशी त्याचा संबंध आहे की, नाही याचेदेखील विश्लेषण होऊ शकेल. त्यातूनच सामाजिक, आर्थिक आणि सांस्कृतिक परिस्थितीचे आकलन होऊ शकणार आहे.

**जगातली सर्वात मोठी जनगणना प्रक्रिया**

जगातल्या सर्वात मोठ्या प्रजासत्ताकात होणारी ही जनगणना प्रक्रिया हीसुद्धा जगातली सर्वात मोठी प्रक्रिया ठरते. खरे तर तिचीसुद्धा गिनीज बुकामध्ये नोंद व्हायला हवी. या जनगणनेसाठी संपूर्ण देशभरात तीस लाख कर्मचारी पुढच्या महिना-दोन महिनाभर परिश्रम घेणार आहेत. या सगळ्या उपक्रमासाठी जवळपास बारा हजार कोटींचा खर्च गृहित धरण्यात आलेला आहे. काम करणाऱ्या या कर्मचाऱ्यांना साधारणपणे सरासरी पंचवीस हजारांपर्यंतचे मानधनही दिले जाते. परंतु या मानधनापेक्षाही त्यांच्याकडून होत असलेली ही सेवा अधिक महत्त्वपूर्ण मानली पाहिजे. यापूर्वी २०११ ला जनगणना झाली. ती २०२१ मध्ये होणे अपेक्षित होते. परंतु कोरोनामुळे ती होऊ शकली नाही. २०११ मध्ये १२१ कोटी ८ लाख ५४ हजार ९७७ एवढी भारताची लोकसंख्या होती. आज जवळपास ती १४० कोटीच्यावर गेली असण्याची शक्यता आहे. गेल्या दहा वर्षांत भारत हा जगातील सर्वाधिक डिजिटल भारताचा व्यवहार करणारा देश ठरला आहे. म्हणूनच यावेळच्या जनगणनेत अनेकांना घरबसल्या ऑनलाईन स्वतःची नोंदणी करता येणे शक्य होणार आहे. हादेखील यावेळच्या जनगणनेचा पहिला आगळावेगळा प्रकार ठरणार आहे. विकसित भारतासाठी देशाचे हे मनुष्यबळ अधिक सकारात्मकरीतीने उपयोगात आणण्यासाठी यावेळची जनगणना अतिशय मूलभूत स्वरूपाची ठरू शकते. तंत्रज्ञानाचा प्रचंड प्रभाव निर्माण झाला असल्याने त्याचे राष्ट्रीय स्तरावरचे परिणामही खूप वेगळ्या पद्धतीने देशासमोर येणार आहेत. सुरक्षितता आणि देशाच्या आत्मनिर्भरतेसाठी संकलित होणारी ही माहिती संपूर्ण देशाला आणि देशातल्या प्रत्येक नागरीकालाही एक वेगळा आत्मविश्वास देणारी ठरेल.


## सुविचार

**विलास कोळेकर**
खंडाळा, रत्नागिरी. मोबा.९४२२४२०६११

कठीण रस्तेच अनेकदा सुंदर ध्येयाकडे घेऊन जातात. फक्त चालण्याची जिद्द सोडू नका.

## पंचांग

**रविवार, ३ मे २०२६**
**शक १९४८ पराभवनामसंवत्सर**



* वैशाख कृष्ण द्वितीया
* नक्षत्र विशाखा

रवी उदय- ०६-११
रवी अस्त- १९-००

-: जन्मराशी :-
००-०१ ते ००-२९ तूळ
००-३० ते २४-०० वृश्चिक

**श्री उपासनी महाराज जयंती; वृत्तपत्र स्वातंत्र्य दिन**

मुद्रक, प्रकाशक **सौ. जयश्री रमाकांत खाडिलकर-पांडे** यांनी हे दैनिक नवाकाळ ऑफीस आणि नवाकाळ प्रेस करिता दांगट मीडिया प्रा.लि., पत्ताः प्लॉट नं. २२, दिघा एमआयडीसी, टीटीसी इंडस्ट्रीयल एरीया, विष्णू नगर, दिघा, नवी मुंबई -४००७०८ येथे छापून घेतले व नवाकाळ बिल्डिंग, १३ नवाकाळ पथ, खाडीलकर रोड, गिरगांव, मुंबई -४००००४ येथे प्रसिद्ध केले.
संपादक : **रोहित रमाकांत पांडे** • कार्यकारी संपादकः **समीर करंबे** (*पी.आर.बी. कायद्यानुसार संपादकीय जबाबदारी कार्यकारी संपादक यांच्यावर आहे.)

संपर्क : संपादक विभागः ८६५२२०१४४०,
जाहिरात विभाग : ८१०८११६४२३, ८१०८११६४२९,
छोट्या जाहिरातीः ८४२२८१७४४५. वितरण विभाग : ९५९४९३६४४१
ई-मेलः contact@navakal.in
'नवाकाळ ऑफिस व नवाकाळ प्रेस'चे प्रकाशन दैनिक
'नवाकाळ' आर.एन.आय.क्र.१८१४/५७
स्थापना ७ मार्च १९२३/ फाल्गुन वद्य ५ शके १८४४

Printed and Published by **Jayshree Ramakant Khadilkar-Pande** On behalf of Navakal Office And Navakal Press. Printed at Dangat Media Pvt. Ltd., Address : Plot No.22, Digha M.I.D.C., TTC Industrial Area, Vishnu Nagar, Digha, Navi Mumbai - 400 708. Published at Navakal Building, 13 Navakal Path, Khadilkar Road, Girgaum, Mumbai - 400 004.
Editor - **Rohit Ramakant Pande** • Executive Editor - **Sameer Karambe** (*As per P.R.B. law Executive Editor will be responsible for all the content in Daily Navakal)

## पाककृती




### कोलंबीच्या वड्या



**साहित्य :** ४ सर्व्हिंग्ज
१ कोलंबीचा वाटा, १ मोठा कांदा, २ हिरव्या मिरच्या, थोडी कोथिंबीर, १ चमचा मसाला, १/२ चमचा हळद, ३ चमचे बेसन, १ चमचा तांदळाचे पीठ, चवीप्रमाणे मीठ, तवा फ्रायसाठी तेल, अर्ध्या लिंबाचा रस

**कृती-** प्रथम कोलंबी स्वच्छ करून त्याचे कव्हर काढून घेणे व ते धुऊन एका भांड्यात घेणे. त्यात बेसन, तांदळाचे पीठ, कांदा, मिरची, कोथिंबीर, मसाला, हळद, मीठ व अर्धा लिंबूचा रस घालून एकजीव करून घेणे.
कोलंबीच्या वड्या एकत्र केलेल्या मिश्रणातून एक छोटा गोळा बनवून तो हातावर गोल पसरवून घ्यावा. गॅसवर तवा ठेवून तो गरम झाल्यानंतर त्यात थोडे तेल घालून तयार केलेली वडी तव्यात घालून गोल्ड कलर येईपर्यंत दोन्ही साईट शिजवून घेणे. व शिजल्यावर सर्व्ह करावे.





# मुंबई प्लेऑफमधून बाहेर पडण्याच्या मार्गावर
## चेन्नईचा ८ विकेट राखून दणदणीत विजय

**चेन्नईच्या एम. ए. चिदंबरम स्टेडियमवर आज झालेल्या ४४ व्या सामन्यात चेन्नई सुपर किंग्सने मुंबई इंडियन्सला ८ विकेट आणि १० चेंडू राखून पराभूत केले. या सातव्या पराभवासह मुंबईचा संघ आता आयपीएलच्या प्लेऑफच्या शर्यतीतून बाहेर पडण्याच्या मार्गावर आला आहे. या सामन्यात मुंबईने चेन्नईपुढे विजयासाठी १५९ धावांचे आव्हान दिले होते. ते कर्णधार ऋतुराज गायकवाड आणि कार्तिक यांच्या अर्धशतकी खेळीच्या जोरावर चेन्नईने २ गडी गमावून १८.१ षटकांत सहज पूर्ण केले. या विजयासह चेन्नईचा संघ ८ गुणांसह सहाव्या स्थानावर पोहोचला.**



■ चेन्नई

**प्रथम** फलंदाजी करणारा मुंबईचा सलामीवीर विल जॅक्सला फक्त १ धावेवर अंशुल कंबोजने तंबूत धाडले. मग रायन रिकेल्टन आणि नमन धीर या जोडीने संघाचा काहीसा डाव सावरला. मात्र मुंबईची धावसंख्या ६.४ षटकांत १-५९ वर पोहोचताच रिकेल्टन २४ चेंडूंत ३७ धावांवर नूर अहमदच्या गोलंदाजीवर बाद झाला. सूर्यकुमार यादवने नमन धीरच्या साथीत संघाचा डाव पुढे नेण्याचा प्रयत्न केला. सूर्यकुमार स्थिरावल्यानंतर रामकृष्ण घोषच्या गोलंदाजीवर खराब फटका मारून झेलबाद झाला. त्यापाठोपाठ तिलक वर्माही ५ धावांवर माघारी परतला. नमन धीरने ३४ चेंडूंत अर्धशतक पूर्ण केले. जेमी ओव्हरटनने नमन धीरला ३७ चेंडूंत ५७ धावांवर बाद केले. त्यानंतर हार्दिक पंड्याला मोठे फटके मारण्यात अपयश आले. तो २३ चेंडूंत १८ धावा करून बाद झाला. रॉबिन मिन्झलाही फक्त ३ धावा करता आल्या. कृश भगत नाबाद ३ आणि ट्रेंट बोल्टने नाबाद ७ धावा केल्या. त्यामुळे मुंबईला निर्धारित षटकांत ७ बाद १५९ धावा करता आल्या. या धावसंख्येचा पाठलाग करताना चेन्नईचा सलामीवीर संजू सॅमसनला मोठी खेळी करता आली नाही. त्याला ११ धावांवर जसप्रीत बुमराहने बाद केले. उर्विल पटेल आणि ऋतुराज यांनी मुंबईच्या गोलंदाजांचा समाचार घेऊन चौकार आणि षटकार ठोकले. या जोडीने संघाची धावसंख्या ५.३ षटकांत १ बाद ६२ वर पोहोचवली. ऋतुराज आणि कार्तिक शर्मा यांची जोडी जमली. त्यांनी धावांची गती कमी होऊ दिली नाही आणि विजयाचा पाय रचला. ऋतुराज ६७ धावांवर आणि कार्तिक ५४ धावांवर नाबाद राहून संघाला १८.१ षटकांत विजय मिळवून दिला.

## महाराष्ट्र टेनिस क्रिकेट चॅम्पियन्स लीगची घोषणा

■ मुंबई

**मुंबईच्या** बीकेसीतील एमसीए क्लब येथे महाराष्ट्र टेनिस क्रिकेट चॅम्पियन्स लीगचा शुभारंभ पार पडला. या सोहळ्याला माजी क्रिकेटपटू सुनील गावस्कर, करसन घावरी आणि अमोल मुजूमदार यासारख्या मान्यवरांची उपस्थिती लाभली.एकनाथ सोलकर फाऊंडेशन आणि रोज मर्क लिमिटेड यांच्या विद्यमाने आयोजित करण्यात आलेल्या या लीगमध्ये महाराष्ट्रातील पहिल्या प्रीमियर टेनिस क्रिकेट लीग अंतर्गत ८ संघांचा समावेश असणार आहे. आतापर्यंत या संघांचे ८ कर्णधार निश्चित झाले. उर्वरित खेळाडूंची निवड आगामी दिवसांत लिलाव पद्धतीद्वारे करण्यात येणार आहे.

## महिला टी-२० विश्वचषक! भारतीय संघ जाहीर
## अमनजोत कौरला वगळले! नंदिनीची निवड

■ मुंबई

**इंग्लंडमध्ये** १४ जूनपासून सुरू होणाऱ्या आयसीसी महिला टी-२० विश्वचषक क्रिकेट स्पर्धेसाठी बीसीसीआयच्या निवड समितीने आज १५ सदस्यीय भारतीय महिला संघाची घोषणा केली. या संघाच्या कर्णधारपदी हरमनप्रीत कौरला आणि उपकर्णधारपदी स्मृती मानधनाला कायम ठेवण्यात आले आहे. दुखापतग्रस्त अमनजोत कौरला संघातून वगळण्यात आले. नंदिनीची पहिल्यांदाच भारतीय संघात निवड झाली.

यस्तिका भाटियाची प्रतिका रावलच्या जागी निवड करण्यात आली. एकदिवसीय विश्वचषकामध्ये संघाची मॅचविनर ठरलेल्या अमनजोत कौरला दुखापत झाल्यामुळे संघाला मोठा फटका बसला. अष्टपैलू राधा यादवची संघात निवड करण्यात आली.

**भारतीय महिला संघ**

हरमनप्रीत कौर (कर्णधार), स्मृती मनधाना (उपकर्णधार), शफाली वर्मा, जेमिमा रॉड्रीग्ज, ऋचा घोष (यष्टीरक्षक), भारती फुलमाली, दीप्ती शर्मा, यस्तिका भाटिया (यष्टीरक्षक), श्री चरणी, नंदिनी शर्मा, अरूंधती रेड्डी, रेणुका ठाकूर, क्रांती गौड, श्रेयंका पाटील, राधा यादव

## युवा पलटन, युनियन बँक, भारतीय नौदल, युपी योद्धा संघ उपांत्य फेरीत

■ मुंबई

**मुंबईतील** युवा पलटन (इंशोअरकोट प्रा. लि.), युनियन बँक संघांसह भारतीय नौदल, यु. पी. योद्धा यांनी बंड्या मारूती सेवा मंडळाने आयोजित केलेल्या अखिल भारतीय पुरुष व्यावसायिक कबड्डी स्पर्धेची उपांत्य फेरी गाठली. बंड्या मारूती संघाने आपल्या अमृत महोत्सवी वर्ष आणि हिंदुहृदयसम्राट बाळासाहेब ठाकरे यांच्या जन्मशताब्दी वर्षाचे औचित्य साधून या स्पर्धेचे आयोजन केले आहे.

मुंबईतील ना. म. जोशी मार्ग येथील श्रमिक जिमखाना येथे मॅटच्या एका क्रीडांगणावर चौथ्या दिवशी झालेल्या सामन्यात भारतीय नौदलने पूर्वार्धातील १६-२३ अशा पिछाडीवरून दक्षिण मध्य रेल्वेचा प्रतिकार ४४-४३ असा परतवून लावत रसिकांना आश्चर्याचा धक्का दिला. सुरुवातीला २ गुण घेऊन नौदलाने सुरुवात झोकात केली. पहिला लोण देऊन रेल्वेने डाव पलटवत आघाडी घेतली. शेवटची ३ मिनिटे असेपर्यंत ४१-३५ अशी आघाडी टिकविण्यात रेल्वेला यश आले होते. शेवटच्या क्षणी दुसरा लोण देऊन नौदलाने आपली पिछाडी ४०-४१ अशी कमी केली. त्यानंतर भरतने चढाईत १ गुण घेत बरोबरी साधली आणि दुसऱ्या चढाईत २ गुण घेत आघाडी घेतली. रेल्वेला शेवटच्या चढाईत सुरजितने एक गुण त्यांना बहाल करीत संघाचा विजय साजरा केला. भरत खत्रीने चढाईत १७ गुण घेत, तर सुरजितने ५ पकडी करीत या विजयात सिंहाचा वाटा उचलला. त्यांना रोहित टोमरने चढाईत ५ गुण, तर रिंकूने ३ पकडी करीत उत्तम साथ दिली. रेल्वेच्या आर्यन लोचनने चढाईत १३ गुण घेऊन तर हरदीपने ५ आणि नितेशने ३ पकडी घेत सामन्यातील उत्कंठा शेवटच्या क्षणापर्यंत कायम राखली. युवा पलटनने पहिल्या डावातील १८-२३ अशा पिछाडीवरून जयपूर पिंक क्लबचे आव्हान ४३-४१ असे मोडून काढले. पहिला लोण देत जयपूरने सुरुवात शानदार केली. विश्रांतीनंतर आणखी एक लोण देत युवाच्या गोटात खळबळ निर्माण केली.



## बॉईज क्रिकेट क्लबची आगेकूच
## अनिशची ३६ चेंडूंत शतकी खेळी

■ ठाणे

**अनिश** चौधरीची ३६ चेंडूंतील शतकी खेळी आणि सृजन आठवलेच्या अर्धशतकाच्या जोरावर बॉईज क्रिकेट क्लबने ठाणे जीएसटी एकादश संघाचा ५५ धावांनी पराभव करत महाराष्ट्र माझा सेवा संस्थेने युनियन क्रिकेट क्लबच्या सहकार्याने आयोजित केलेल्या १४ व्या उपमुख्यमंत्री चषक ठाणे प्रीमियर लीगच्या दुसऱ्या फेरीत स्थान मिळवले. २६२ धावांचा पाठलाग करणाऱ्या ठाणे जीएसटी एकादश संघाला २०७ धावांवर रोखत बॉईज क्रिकेट क्लबने आगेकूच केली.

नाणेफेक जिंकून प्रथम फलंदाजी करताना अनिश आणि सृजनने पहिल्या गड्यासाठी १४८ धावांची भागीदारी करत संघाच्या अडीच शतकी धावसंख्येचा पाया रचला. अनिशने ३६ चेंडूंत १६ षटकार आणि ४ चौकार मारत १०३ धावांची खेळी केली. तर अनिशला तेवढीच मोलाची साथ देताना सृजनने ६१ धावांचे योगदान दिले. विश्वजित जगदाळेने ३४ धावा केल्या. या डावात वसिम अश्रफने ३ आणि यश चव्हाणने २ बळी मिळवले.

## एलआयसी कल्पेश कोळी स्मृती
## क्रिकेट स्पर्धेत राजवीरचे ९ बळी

■ मुंबई

**न्यू** हिंद स्पोर्टिंग क्लबतर्फे मुंबई क्रिकेट असोसिएशनच्या मान्यतेने सुरू झालेल्या ३४व्या एलआयसी कल्पेश कोळी स्मृती क्रिकेट स्पर्धेच्या सलामीच्या सामन्यात पहिल्याच दिवशी लेगस्पिनर राजवीर लाडने सर्वांचे लक्ष वेधून घेतले. एमसीए अकादमी केंद्राच्या राजवीरने ९ बळी टिपत घाटकोपर केंद्राचा डाव १०८ धावांवर संपुष्टात आणला.
चेंबूर येथील आरसीएफ मैदानावर झालेल्या या सामन्यात प्रथम फलंदाजी करताना घाटकोपर केंद्राचा डाव राजवीर लाडच्या गोलंदाजीसमोर गडगडला. सलामीवीर विकास साराफ याने उत्कृष्ट फलंदाजी करत ३९ धावा केल्या. मात्र इतर फलंदाजांकडून त्याला अपेक्षित साथ मिळाली नाही. तत्पूर्वी, भारतीय महिला संघाची क्रिकेटपटू सायली सातघरे, एलआयसीचे प्रशासकीय अधिकारी योगेंद्र वैती, न्यू हिंद स्पोर्टिंग क्लबचे सचिव भास्कर अय्यर, मुंबई क्रिकेट असोसिएशनचे निवड समिती सदस्यांच्या उपस्थितीत माटुंगा येथील रमेश दडकर मैदानात या स्पर्धेचा उद्घाटन सोहळा पार पडला. कलिना येथील एअर इंडिया स्पोर्ट्स क्लबच्या मैदानावर झालेल्या दुसऱ्या सामन्यात चर्चगेट सेंटरचा डावखुरा फिरकी गोलंदाज जय म्हात्रेने अवघ्या २६ धावांत ५ बळी घेत कलिना केंद्राचा डाव अवघ्या ९० धावांवर गारद केला.

## कॅरम स्पर्धेत एनकेजीएसबी, कोकण बँकेची उपांत्य फेरीत धडक

■ मुंबई

**लाईफ** इन्शुरन्स कॉर्पोरेशन ऑफ इंडिया पुरस्कृत एलआयसी आनंदराव अडसूळ ट्रस्ट ट्रॉफी आंतर सहकारी बँक सांघिक कॅरम स्पर्धेत कोकण बँक, एनकेजीएसबी, अपना बँक, म्युनिसिपल बँक संघांनी उपांत्य फेरीत प्रवेश केला. कोकण बँकेला बाद फेरीतील प्रवेशासाठी ग्रेटर बॉम्बे बँकेने शेवटपर्यंत झुंजाविले. गसुद्दीन नाईक आणि सोहेल मुकादम यांच्या विजयी खेळामुळे कोकण बँकेने ग्रेटर बॉम्बे बँकेचे आव्हान २-१ असे संपुष्टात आणले.



आनंदराव अडसूळ चॅरिटेबल ट्रस्ट, को-ऑपरेटिव्ह बँक एम्प्लॉईज युनियन आणि आयडियल स्पोर्ट्स अकॅडमीतर्फे महाराष्ट्र दिन व कामगार दिनानिमित्त सांघिक कॅरम स्पर्धेत प्रियेश पाठक, गीतेश कोरगावकर, महादेव जवीर यांच्या निर्विवाद विजयामुळे अपना बँकेने म्युनिसिपल बँकेला ३-० असे नमविले आणि साखळी 'अ' गटात प्रथम स्थानावर झेप घेतली. परिणामी म्युनिसिपल बँकेला बाद फेरीसाठी द्वितीय स्थानावर समाधान मानावे लागले.

राज्यस्तरीय शालेय सांघिक कॅरम स्पर्धेमधील तिसऱ्या साखळी सामन्यात आनंदसागर फिनिशर्सने सीबीईयु वॉरियर्सचा २-१ असा तर कॅप्टन अभिजित चॅम्पियन संघाने आनंदराव अडसूळ प्लॅटीनमचा २-१ असा पराभव करून बाद फेरीच्या दिशेने कूच केली.

# नोएडा इंटरनॅशनल एअरपोर्टवरून १५ जूनपासून उड्डाणे सुरू

■ नोएडा

**नोएडा** इंटरनॅशनल एअरपोर्टवरून हवाई प्रवासाचे स्वप्न १५ जून रोजी पूर्ण होणार आहे. दिल्ली-एनसीआरसह संपूर्ण उत्तर भारतातील प्रवाशांना नोएडा एअरपोर्टवरून प्रवासी सेवांसोबतच कार्गो सुविधाही उपलब्ध होणार आहेत. नोएडा इंटरनॅशनल एअरपोर्टवरून १५ जून रोजी इंडिगो एअरलाईन्सची पहिली फ्लाइट उड्डाण करणार आहे.

इंडिगो एअरलाईन्सची पहिली फ्लाइट कुठे जाणार आणि कोणत्या वेळेला उड्डाण करणार याबाबत एअरपोर्ट प्राधिकरण आणि एअरलाईन लवकरच घोषणा करणार आहेत.

पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी २८ मार्च रोजी नोएडा इंटरनॅशनल एअरपोर्टचे उद्घाटन केले होते. त्यानंतर येथे




लवकरच देशांतर्गत आणि कार्गो सेवा सुरू होण्याची शक्यता व्यक्त केली जात होती. नागरी विमान सुरक्षा ब्युरोकडून एअरपोर्ट सिक्युरिटी प्रोग्रामला मंजुरी मिळाल्यानंतर या इंटरनॅशनल एअरपोर्टने १५ जूनपासून उड्डाण संचालनाची घोषणा केली आहे.

देश विदेश

# इजिप्तमध्ये सापडले २०२२ वर्षापूर्वीचे गोलाकार मंदिर

■ कैरो



**पिरॅमिड्सचा** देश अशी ओळख असलेल्या इजिप्तमध्ये सर्वांना थक्क करुन सोडणारी एक २२०० वर्षांपूर्वीची प्राचीन वास्तू उत्खननादरम्यान सापडली आहे. उत्तर सिनाई येथील तेल-अल-फरामा म्हणजेच प्राचीन पेलुसियम शहराजवळ एक गोलाकार मंदिर सापडले असून नुकतीच यासंदर्भातील घोषणा करण्यात आली आहे. मंदिर नाईल नदीच्या पूर्वेकडील भागात आहे. हे मंदिर रोम कालावधीच्या सुरुवातीच्या काळातील म्हणजेच साधारण २२०० वर्षांपूर्वीचे असल्याचे सांगितले जाते.

या मंदिराचे वैशिष्ट्य म्हणजे ते पूर्णपणे वर्तुळाकार आहे.सामान्यपणे त्रिकोणी किंवा शार्प एजेट असलेल्या आकारांमध्ये प्राचीन वास्तू सापडणाऱ्या इजिप्तमध्ये अशा गोलाकार वास्तू सापडणे फारच दुर्मीळ मानले जाते. या मंदिराच्या भिंती विटांपासून बनवलेल्या आहेत. या मंदिराचा संबंध 'गॉड ऑफ मड' म्हणजेच चिखलाच्या देवाशी जोडला जात आहे. यापूर्वी अशाप्रकारे चिखलाच्या देवाचे एवढे मोठे मंदिर जगात कुठेही सापडलेले नाही.

# अमेरिकेने काँगोचे माजी अध्यक्ष काबिला यांच्यावर निर्बंध लादले

■ किंशासा

**एम**-२३ बंडखोर गटाला पाठिंबा दिल्याचा आरोप करुन अमेरिकेने डेमोक्रॅटिक रिपब्लिक ऑफ काँगोचे माजी अध्यक्ष जोसेफ काबिला यांच्यावर निर्बंध लादले. त्यांची अमेरिकेतील सर्व मालमत्ता गोठवण्यात आली. अमेरिकन नागरिक आणि कंपन्यांना त्यांच्यासोबत व्यवसाय करण्यास मनाई करण्यात आली. बँका आणि परदेशी भागीदारांना त्यांच्यासोबत अप्रत्यक्ष व्यवहार न करण्याचा इशारा देण्यात आला असून, याचे उल्लंघन केल्यास कठोर दिवाणी किंवा फौजदारी दंड आकारला जाईल.

जोसेफ डेमोक्रॅटिक रिपब्लिक ऑफ काँगोतील एक अत्यंत प्रभावशाली राजकीय व्यक्तिमत्व आहेत. २०२५ मध्ये त्यांच्यावर देशद्रोह आणि एम-२३ बंडखोरांना पाठिंबा दिल्याचा आरोप ठेवून लष्करी न्यायालयाने त्यांना अनुपस्थितीत फाशीची शिक्षा सुनावली होती.

वडील लॉरेंट-डेसिरे काबिला यांच्या हत्येनंतर जानेवारी २००१ मध्ये ते २९ व्या वर्षी अध्यक्ष बनले. ते १८ वर्षे सत्तेत होते. आणि २०१९ मध्ये त्यांनी शांततापूर्ण मार्गाने सत्ता हस्तांतरित केली.२०२५ च्या उत्तरार्धात, एम२३ बंडखोरांशी संबंध असल्याच्या आरोपांवरून त्यांची सिनेटमधील प्रतिकारशक्ती काढून घेण्यात आली.

# मलकुंती पुलाजवळ गंगा नदीत दिल्लीच्या मुलाचा बुडून मृत्यू

■ ऋषिकेश

**उत्तराखंड** येथील लक्ष्मणझुला पोलीस ठाण्याच्या हद्दीतील मलकुंती पुलाजवळ गंगा नदीत दिल्लीच्या मुलाचा बुडून मृत्यू झाला. दिल्लीतील निझामपूर येथे राहणारा मुलगा वंश (१८) आपल्या कुटुंबासोबत ऋषिकेशला आला होता. सकाळी ११ वाजण्याच्या सुमारास तो मलकुंती पुलाजवळ गंगेत स्नान करत होता. त्यावेळी अचानक त्याचा तोल जाऊन तो खोल पाण्यात पडला.

एसडीआरएफचे निरीक्षक कविंदर सजवान यांनी सांगितले की, माहिती मिळताच राज्य एसडीआरएफचे डीप डायव्हिंग पथक आणि बायसी पथक घटनास्थळी दाखल झाले. या पथकाने तरुणाला शोधण्यासाठी शोधमोहिम सुरू केली. त्याचा मृतदेह बाहेर काढण्यात आला.

दरम्यान, २४ एप्रिल रोजी मुनी की रेती दर्शन कॉलेजजवळील वाल्मिकी वस्तीत राहणारे राम बिलास यांचे पुत्र गौरव कुमार (४८) हे गंगेत स्नान करत असताना पाण्याच्या जोरदार प्रवाहात वाहून गेले. एसडीआरएफ गंगेत शोधमोहिम राबवत होते. कविंदर सजवान यांनी सांगितले की, गौरव कुमार यांचा मृतदेह पशुलोक बॅरेजमधून बाहेर काढण्यात आला.

# एप्रिलमध्ये जीएसटीचे विक्रमी संकलन २.४३ लाख कोटी रुपयांवर पोहोचले

■ नवी दिल्ली




**भारताच्या** जीएसटी म्हणजे वस्तू आणि सेवा कर संकलनाने एप्रिल २०२६ मध्ये आतापर्यंतचा सर्वाधिक उच्चांक गाठला असून, ते सुमारे २.४३ लाख कोटी रुपयांवर पोहोचले आहे. हे संकलन वर्षभराच्या तुलनेत ८.७ टक्क्यांनी वाढले आहे.

आयातीमधून मिळालेल्या मजबूत महसुलामुळे आणि सुधारलेल्या करप्रणालीमुळे ही वाढ झाली असून, एप्रिल २०२५ मधील २.२३ लाख कोटी रुपयांच्या आधीच्या विक्रमालाही मागे टाकण्यात आले आहे. आर्थिक वर्षाच्या अखेरीस वाढलेली आर्थिक हालचाल आणि नव्या आर्थिक वर्षाच्या सुरुवातीला सुधारलेले करप्रणाली यामुळे जीएसटी संकलनाने हा विक्रमी टप्पा गाठल्याचे मानले जात आहे.

# नेपाळमध्ये सर्व नेत्यांच्या संपत्तीची चौकशी ! बालेन शाह आक्रमक

■ काठमांडू



**नेपाळमध्ये** सत्तांतरानंतर पंतप्रधान बालेन शाह यांनी भ्रष्टाचाराविरोधात आक्रमक पवित्रा घेत एक मोठा निर्णय जाहीर केला आहे. देशातील विद्यमान व माजी पंतप्रधान, खासदार, सरकारी अधिकारी तसेच सार्वजनिक पदांवर राहिलेल्या सर्व व्यक्तींच्या मालमत्तेची चौकशी करण्यासाठी स्वतंत्र संपत्ती तपासणी आयोग स्थापन करण्यास सरकारने मंजुरी दिली आहे.

सरकारच्या या निर्णयानुसार, नव्याने स्थापन झालेल्या आयोगाने आजपासून कामकाज सुरू केले आहे. दोन आठवड्यांपूर्वी या आयोगाची स्थापना करण्यात आली होती. या आयोगाच्या अध्यक्षपदी नेपाळच्या सर्वोच्च न्यायालयाचे निवृत्त न्यायमूर्ती राजेंद्र कुमार भंडारी यांची नियुक्ती करण्यात आली आहे. पाच सदस्यीय या समितीत माजी मुख्य न्यायाधीश पुरुषोत्तम पराजुली, माजी न्यायमूर्ती चंडिराज ढकाल, माजी डीआयजी गणेश केसी आणि चार्टर्ड अकाउंटंट प्रकाश लम्साल यांचा समावेश आहे.

सरकारी आदेशानुसार, सध्याचे आणि माजी पदाधिकारी तसेच त्यांच्या कुटुंबियांच्या नावावर देशांतर्गत आणि परदेशात असलेल्या मालमत्तेची सखोल चौकशी केली जाणार आहे. लोकशाही स्थापनेनंतरचे सर्व माजी पंतप्रधान, सहाय्यक मंत्री, संविधानसभेचे सदस्य आणि सर्व खासदार यांचाही या चौकशीच्या कक्षेत समावेश असेल. या निर्णयामुळे नेपाळमध्ये भ्रष्टाचाराविरोधात मोठी कारवाई होण्याची शक्यता व्यक्त केली जात आहे.

सविस्तर वाचण्यासाठी व शेअर करण्यासाठी हा क्युआर कोड स्कॅन करा

# 'मी संविधान मानत नाही' स्टेटस ठेवणाऱ्या फळविक्रेत्याला अटक

■ कल्याण

**कल्याणमध्ये** सोशल मीडियावर मी संविधान मानत नाही असा आक्षेपार्ह मजकूर पोस्ट करणाऱ्या फळ विक्रेत्याला पोलिसांनी अटक केली. या कारवाईमुळे परिसरात खळबळ उडाली. अटक करण्यात आलेल्या व्यक्तीचे नाव विनीत सिंग असे आहे. तो कल्याणमधील चिकनघर परिसरात वास्तव्यास असून फळविक्रीचा व्यवसाय करतो. तो मूळचा प्रयागराज येथील रहिवासी असल्याची माहिती आहे. पोलिसांच्या तपासात समोर आले की, विनीत सिंग हा गेल्या काही दिवसांपासून सोशल मीडियावर सातत्याने संविधानाविरोधात आक्षेपार्ह पोस्ट करत होता. त्याच्या या पोस्टमुळे सामाजिक सलोखा बिघडण्याची शक्यता निर्माण झाली होती. काही जागरूक नागरिकांनी त्याला समज देण्याचा प्रयत्न केला, मात्र त्याने भूमिका बदलण्यास नकार देत वाद घातला. यामुळे संबंधित नागरिकांनी महात्मा फुले चौक पोलीस ठाण्यात तक्रार दाखल केली.

# जातीची गोष्ट केली, तर जोरात लाथ घालेन! गडकरींचे विधान



■ नागपूर

**केंद्रीय** मंत्री नितीन गडकरी यांनी जातीपातीचे राजकारण करणाऱ्यांवर जोरदार टीका केली आहे. देशात हिंदू आणि मुस्लीम नागरिकांना गॅस, पेट्रोल व डिझेल एकाच दरात मिळते. त्यामुळे विकास आणि मूलभूत सुविधांच्या बाबतीत कोणताही भेदभाव होत नाही. या प्रकरणी कोणी माझ्यासमोर जातीचा विषय काढला, तर मी त्याला लाथ घालेन, असे त्यांनी म्हटले. त्यांच्या या वक्तव्यामुळे राजकीय वर्तुळात चर्चांना उधाण आले आहे.

नितीन गडकरी म्हणाले, आजकाल अनेक लोक जात आणि धर्माच्या नावावर समाजात फूट पाडण्याचा प्रयत्न करतात. परंतु अशा प्रकारच्या राजकारणावर माझा विश्वास नाही. जात आधारित राजकारणामुळे राष्ट्राचे कल्याण होऊ शकत नाही. एखाद्या हिंदूला ज्या दरात गॅस, पेट्रोल आणि डिझेल मिळते, अगदी त्याच दरात ते एखाद्या मुस्लीमालाही मिळते. यावरून हे स्पष्ट होते की, विकास आणि सार्वजनिक सोयी-सुविधांच्या बाबतीत कोणत्याही प्रकारचा भेदभाव अजिबात केला जात नाही. जातीचा पाढा वाचत बसण्यात काहीच अर्थ नाही. मी असे अनेक नेते पाहिले आहेत, जे सार्वजनिक व्यासपीठांवरून जातीबद्दल बोलतात आणि घोषणा देतात. पण जेव्हा ते खाजगीत भेटतात.

# सोलापुरात आई आणि २ मुलांची हत्या

■ सोलापूर

**दक्षिण** सोलापूर तालुक्यातील बोरामणीत संपत्तीच्या वादातून मध्यरात्री एकाच कुटुंबातील आई आणि तिच्या दोन मुलांची धारदार शस्त्राने हत्या झाल्याने एकच खळबळ उडाली. ही घटना आज पहाटे उघडकीस आल्यानंतर पोलिसांनी याप्रकरणी आरोपी दिराला शोधण्याचे काम सुरू केले आहे. गायत्री सुधाकर मस्के (आई), प्रिया (मुलगी) आणि शिवराज (मुलगा) अशी मृतांची नावे आहेत. गायत्री यांच्या नवऱ्याचे काही वर्षांपूर्वी निधन झाले होते. दीर आणि त्यांच्यात संपत्तीवरून अनेक वेळा वाद झाला होता. त्यांच्या घरांना एकाच गच्चीवर जाण्याचा मार्ग सामायिक आहे. हे तिघेही गच्चीवर झोपले होते. दीराने मध्यरात्री धारदार शस्त्राने त्यांच्यावर हल्ला करून त्यांची हत्या केली. गायत्री आणि प्रिया यांचे मृतदेह घराच्या गच्चीवर रक्ताच्या थारोळ्यात आढळले. तर शिवराजचा मृतदेह खोलीत सापडला. प्रिया ही बारावीची विद्यार्थिनी होती.




# पनवेल महापालिकेत 'स्व-गणना' उपक्रमाची महापौरांच्या हस्ते सुरुवात

■ पनवेल

**पनवेल** महानगरपालिका मुख्यालयात आज भारत सरकारच्या आगामी जनगणना २०२७ अंतर्गत 'स्व-गणना' उपक्रमाचा शुभारंभ महापौर नितीन पाटील तसेच लोकप्रतिनिधी यांच्या हस्ते करण्यात आला.

महापौर आणि उपस्थित लोकप्रतिनिधी तसेच अधिकाऱ्यांनी यावेळी स्वतः ऑनलाईन माध्यमातून 'स्व-गणना' पूर्ण करून नागरिकांसाठी आदर्श निर्माण केला. या उपक्रमाद्वारे नागरिकांनी स्वतःची व कुटुंबाची माहिती डिजिटल पद्धतीने नोंदविण्याचे आवाहन पालिकेच्या वतीने करण्यात येत आहे.

महापौरांनी आपल्या संदेशात नमूद केले की, जनगणना ही देशाच्या विकास आराखड्याचा पाया असून, प्रत्येक नागरिकाने अचूक माहिती देणे अत्यंत आवश्यक आहे. 'स्व-गणना'मुळे प्रक्रिया अधिक सुलभ, पारदर्शक व वेळेची बचत करणारी ठरणार आहे.

# म्हाडाच्या विक्रोळीतील घरांच्या किमतीत ७.५ टक्क्यांची कपात

■ मुंबई

**म्हाडाच्या** लॉटरीमधील घरांच्या किमती अव्वाच्या सव्वा असल्याने या घरांना अर्जदारांकडून प्रतिसाद मिळत नव्हता. त्यामुळे म्हाडाने विक्रोळी (पूर्व) येथील कन्नमवार नगर प्रकल्पातील १ हजार २२१ घरांच्या किमती ७.५ टक्क्यांनी कमी केल्या आहेत. विशेष म्हणजे येथील प्रत्येक घरासाठी एक पार्किंग विनामूल्य दिले जाणार आहे.

**प्रत्येक घरामागे एक पार्किंग मोफत देणार**

मुंबईतील विविध गृहनिर्माण प्रकल्पांमधील जाहीर संगणकीय सोडत प्रणालीमधील विक्रोळी (पूर्व) येथील कन्नमवार नगर प्रकल्पातील १,२२१ घरांच्या किमतीत ५ टक्के कपात केली आहे. या प्रकल्पातील घरांना प्रति घर १ पार्किंग विनामूल्य उपलब्ध करून देण्यात येणार आहे. या घरांसाठी १४ मेपर्यंत अर्ज करता येणार असून ५ जून रोजी घरांची लॉटरी काढली जाईल. मुंबई मंडळातर्फे ३० मार्च रोजी जाहीर करण्यात आलेल्या लॉटरीमध्ये संकेत क्रमांक ५३८, बिल्डिंग नं. २ अ, ब पॉकेट-२, कन्नमवार नगर, विक्रोळी येथील ४८० घरांची विक्री किंमत १ कोटी ४५ लाख ५८ हजार ३०७ रुपये ते १ कोटी ४७ लाख ९७ हजार ९९२ रुपये व संकेत क्रमांक ५३९ बिल्डिंग नं. ३ अ, ब, क पॉकेट क्र. २ कन्नमवार नगर, विक्रोळी, येथील ७४१ घरांची विक्री किंमत १ कोटी ४५ लाख ७४ हजार ९४२ रुपये ते १ कोटी ४८ लाख १४ हजार ९०१ रुपये अशी असणार आहे.

# गटार साफ करताना अंगावर टेम्पो गेल्याने ३ कामगार गंभीर

■ मुंबई

पवई परिसरात काल कामगार दिनादिवशीच धक्कादायक घटना घडली. मुंबई पालिकेच्या तीन कर्मचाऱ्यांकडून गटार साफसफाईचे काम सुरू असताना त्यांच्या अंगावर टेम्पो गेल्यामुळे हे तिघेजण जण गंभीर जखमी झाले. पालिकेच्या कॉन्ट्रॅक्टरकडून कामगार दिन असताना गटार साफसफाई करण्याचे काम सुरू करण्यात आले होते. यावेळी गटारावरून टेम्पो गेल्यामुळे तीन कामगार गंभीर जखमी झाले. पालिकेच्या कॉन्ट्रॅक्टरकडून रस्त्यावर सुरक्षारक्षक उभा केला नसल्यामुळे ही धक्कादायक घटना घडली आहे. काल कामगार दिवस होता आणि कामगारांना सुट्टी होती. मात्र पवई परिसरात पालिकेकडून तबरेज सय्यद अली या व्यक्तीच्या कॉन्ट्रॅक्टच्या माध्यमातून रस्त्यावर असलेल्या गटाराची साफसफाई सुरू होती.

NATIONAL LOK ADALAT
राष्ट्रीय लोक अदालत

सामंजस्य आणि तडजोडीने जीवन सुखी बनवूया, चला आपण लोक न्यायालयाच्या मार्गाने जाऊया.

दुरावलेले संबंध व प्रलंबित असलेली प्रकरणे तसेच दाखलपूर्व प्रकरणे सामंजस्याने मिटविण्याकरीता महाराष्ट्रातील उच्च न्यायालय व खंडपीठे, सर्व जिल्हा न्यायालये, तालुका न्यायालये, कौटुंबिक न्यायालये, इतर न्यायालये व न्यायाधिकरणे येथे राष्ट्रीय विधी सेवा प्राधिकरण, नवी दिल्ली (National Legal Services Authority) यांच्या आदेशान्वये दिनांक **९ मे, २०२६ व ११ सप्टेंबर, २०२६** रोजी **"राष्ट्रीय लोक अदालत"** आयोजित करण्यात येत आहे.

तरी महाराष्ट्र राज्य विधी सेवा प्राधिकरणातर्फे आवाहन करण्यात येते की, न्यायालयात दाखल झालेली प्रकरणे राष्ट्रीय लोक अदालतीमध्ये ठेवण्याकरीता संबंधितांनी आपली प्रकरणे ज्या न्यायालयात प्रलंबित असतील त्या न्यायालयात अर्ज करावा. तसेच दाखलपूर्व प्रकरणाबाबत नजीकच्या जिल्हा विधी सेवा प्राधिकरण किंवा तालुका विधी सेवा समितीकडे अर्ज करावा व दि. ९ मे, २०२६ व ११ सप्टेंबर, २०२६ रोजी आयोजित केलेल्या राष्ट्रीय लोक अदालतीमध्ये आपली प्रकरणे सामंजस्याने व तडजोडीने मिटवावीत.

९ मे २०२६
११ सप्टेंबर २०२६

**खालील प्रकारची प्रकरणे राष्ट्रीय लोक अदालतीमध्ये ठेवता येतील.**

**दाखलपूर्व प्रकरणे :**
अ. निगोशिएबल इन्स्ट्रुमेन्ट्स् ॲक्ट च्या कलम-१३८ खाली दाखल होण्यापूर्वीची प्रकरणे (N.I.Act Cases u/s 138)
ब. बँक वसुली प्रकरणे (Bank Recovery Cases)
क. कामगार वाद प्रकरणे (Labour Dispute Cases)
ड. वीज व पाणी यांच्या देयकाबाबतची प्रकरणे (तडजोडीस अपात्र प्रकरणे वगळून) (Electricity & Water Bills (Excluding Non-Compoundable)
इ. इतर (फौजदारी तडजोडपात्र, वैवाहिक व इतर दिवाणी प्रकरणे) (Criminal Compoundable, Matrimonial & Other Civil Disputes)

**न्यायालयात प्रलंबित असलेली खालील प्रकरणे :**
१. फौजदारी तडजोडपात्र प्रकरणे (Criminal Compoundable Offence)
२. निगोशिएबल इन्स्ट्रुमेन्ट्स् ॲक्ट च्या कलम-१३८ खाली दाखल झालेली प्रकरणे (N.I.Act Cases u/s 138)
३. पैसे वसुलीची प्रकरणे (Money Recovery Cases)
४. अपघात न्यायाधिकरणाबाबतची प्रकरणे (MACT Cases)
५. कामगार वाद प्रकरणे (Labour Disputes Cases)
६. वीज व पाणी यांच्या देयकाबाबतची प्रकरणे (तडजोडीस अपात्र प्रकरणे वगळून) (Electricity & Water Bills [Excluding Non-compoundable])
७. वैवाहिक वादाबाबतची प्रकरणे (Matrimonial Disputes Cases)
८. भूसंपादन बाबतची प्रकरणे (Land Acquisition Cases)
९. नोकरी बाबतची प्रकरणे ज्यात पगार, इतर भत्ते व निवृत्तीबाबतचे फायदे (Service Matters relating to pay and allowances and retiral benefits)
१०. महसूल बाबतची प्रकरणे (जिल्हा न्यायालय व उच्च न्यायालयात प्रलंबित असलेली प्रकरणे) (Revenue Cases [Pending in District Court & High Court only])
११. इतर दिवाणी प्रकरणे (भाडे, सुविधाधिकार बाबतचे, हक्क, हुकूमाबाबतची प्रकरणे, विनिर्दिष्ट पालन प्रकरणे) इत्यादी (Other Civil Cases [Rent, Easementary rights, Injunction Suits, Specific Performance Suits etc.)
१२. बौध्दिक मालमत्ता अधिकार प्रकरणे (आयपीआर) /ग्राहक प्रकरणे / इतर कोणत्याही अर्ध-न्यायिक प्राधिकरणासमोर प्रलंबित प्रकरणे. (IPR matters / Consumer matters / also other matters pending before any other quasi-judicial authority)

**ठळक वैशिष्ट्ये :**
- न्यायाधीश, तज्ञ वकील व सामाजिक कार्यकर्ते यांचे मंडळ आपणास मदत करेल.
- कोणत्याही प्रकारची कोर्ट फी भरावी लागणार नाही.
- लोक न्यायालयाच्या निवाड्याविरुध्द अपील नाही.
- न्यायालयाच्या हुकूमनाम्याप्रमाणे लोक न्यायालयात होणाऱ्या निवाड्याची अंमलबजावणी कोर्टामार्फत करता येते.
- खटल्यांमध्ये साक्षी-पुरावा, उलटतपासणी, दिर्घ युक्तिवाद या बाबी टाळल्या जातात.
- लोक न्यायालयात निकाली निघणाऱ्या प्रकरणामध्ये कायद्यानुसार कोर्ट फी ची रक्कम परत मिळते.

सन २०२४ पासून राष्ट्रीय लोक अदालतीमध्ये एकूण ८०,३८,३३४ प्रकरणे निकाली काढण्यात आलेली आहेत.

मग वाट कसली पाहताय? चालून आलेल्या संधीचा त्वरीत लाभ घ्या आणि परस्परातील वादांना पूर्णविराम द्या.

महाराष्ट्र राज्य विधी सेवा प्राधिकरण, मुंबई

३रा मजला, एमटीएनएल फाऊंटन टेलिकॉम बिल्डींग नं.१, फोर्ट, मुंबई - ४००००१. ● वेबसाईट : legalservices.maharashtra.gov.in ● ई-मेल : mslsa-bhc@nic.in ● फोन : (022) 22691395 / 20825999 ● टोल फ्री : 15100

उच्च न्यायालय विधी सेवा समिती : मुंबई : 8591903603 / नागपूर : 8591903938 / औरंगाबाद : 8591903617 / मुंबई जिल्हा : 8591903601 / मुंबई उप नगर : 8591903602

संपर्क

| | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|
| अहमदनगर | 8591903616 | धुळे | 8591903618 | नांदेड | 8591903626 | सांगली | 8591903610 |
| अकोला | 8591903930 | गडचिरोली | 8591903933 | नंदूरबार | 8591903939 | सातारा | 8591903611 |
| अमरावती | 8591903627 | गोंदिया | 8591903935 | नाशिक | 8591903615 | सोलापूर | 8591903613 |
| औरंगाबाद | 8591903620 | जळगांव | 8591903619 | उस्मानाबाद | 8591903625 | सिंधुदूर्ग | 8591903607 |
| बीड | 8591903623 | जालना | 8591903621 | परभणी | 8591903622 | ठाणे | 8591903604 |
| भंडारा | 8591903936 | कोल्हापूर | 8591903609 | पुणे | 8591903612 | वर्धा | 8591903932 |
| बुलढाणा | 8591903628 | लातूर | 8591903624 | रायगड | 8591903606 | वाशिम | 8591903937 |
| चंद्रपूर | 8591903934 | नागपूर | 8591903931 | रत्नागिरी | 8591903608 | यवतमाळ | 8591903629 |

क्रमांक: आरओसी-२०२६-२७/क्र.५/सी ५९८

# एसटीच्या ताब्यातील शौचालय १ जूनपासून प्रवाशांना मोफत

**मुंबई-** १ जूनपासून एसटी स्थानकांवरील सर्व शौचालये प्रवाशांसाठी पूर्णपणे मोफत उपलब्ध केली जाणार आहेत. तसेच प्रत्येक बसस्थानकाची दर चार तासांनी स्वच्छता करणे बंधनकारक असेल. परिवहन मंत्री प्रताप सरनाईक यांनी एसटीच्या कायापालटाचा आराखडा जाहीर केला असून, त्यानुसार प्रत्येक तिकिटावर प्रति प्रवास २ रुपयांचा स्वच्छता अधिभार आकारला जाणार आहे. त्यामुळे प्रवाशांच्या खिशावर अतिरिक्त भार पडणार आहे. गेल्या काही वर्षांपासून एसटी स्थानकांवरील अस्वच्छता आणि अपुऱ्या सुविधांबाबत सातत्याने तक्रारी येत होत्या. प्रवाशांकडून 'पैसे घ्या पण चांगल्या सुविधा द्या' अशी मागणी होत असल्याने महामंडळाने हा निर्णय घेतला आहे. या अधिभारातून जमा होणारा निधी थेट स्वच्छतेसाठी वापरला जाणार आहे.

PUBLIC NOTICE

**Mr. Vasant Dhudidas Makwana,** a member of Flat No. 8, Bldg No. 11, 2nd Floor Gagangiri C.H.S.L, Model Town Society Mahakali Caves Road, Andheri (East) Mumbai - 400093, Maharashtra, died on **26.04.2021**. My Client Kanku Vasant Makwana hereby state that She is the wife, Class I legal heir of the said deceased member and she is entitled to be the member of the society as she is 100% nominated by her husband, and hence She have made an application for membership of the society and for transfer of the undivided shares and interest of the deceased member **Mr. Vasant Dhudidas Makwana** in the capital / property of the society to her name. My Clients hereby invites claims or objections through me from the heirs or other claimants / objectors or objections to the transfer of shares and interest of the deceased member in the capital / property of the society within a period of **15 days** from the publication of this notice, with the copies of such documents and other proofs of support of his / her / their claims / objections for transfer of shares and interest of deceased member in the capital / property of the society. If no claims / objections are received by undersigned within period prescribed above, the society shall be free to deal with the shares and interest of the deceased member in the capital / property of the society in such manner as is provided under the bye laws of the society.

Sd/-

**Date : 03.05.2026** **PARAG S. MISHRA (Advocate High Court)**
503, Vaishali Shopping Center, S. V. Road Malad (West), Mumbai - 64
Mobile No. 9869126163.

नेपाळमध्ये नुकत्याच पार पडलेल्या निवडणुकांनंतर तरुण पिढीचे प्रतिनिधित्व करणारे बालेन शाह सत्तेवर आल्याने संपूर्ण दक्षिण आशियासह पश्चिमी जगाचेही लक्ष या हिमालयीन देशाकडे लागले होते. जेन-झेड आंदोलनाच्या लाटेवर स्वार होऊन सत्तेत आलेल्या या तरुण नेतृत्वाकडून नेपाळच्या जनतेलाही मोठ्या अपेक्षा होत्या. मात्र, सत्तास्थापनेला महिना उलटत नाही तोच बालेन शाह यांच्या मंत्रिमंडळातील दोन महत्त्वाच्या मंत्र्यांचे राजीनामे आणि वाढता जनक्षोभ पाहता, नेपाळ पुन्हा एकदा जुन्याच अस्थिरतेच्या गर्तेत अडकणार का, असा प्रश्न उपस्थित होत आहे.

# नेपाळ पुन्हा अस्थिरतेकडे...?



भारताचा शेजारी देश असणाऱ्या नेपाळमध्ये मध्यंतरी झालेल्या सार्वत्रिक निवडणुकांनंतर सत्तापरिवर्तन झाले. यामुळे तेथील सामान्य जनतेमध्ये विकासाच्या नव्या वाटा खुल्या होतील आणि पारदर्शक कारभाराचे नवे पर्व सुरू होईल अशी मोठी अपेक्षा होती. विशेषतः बालेंद्र शाह यांच्यासारख्या तरुण आणि आक्रमक नेतृत्वाकडे देश सोपवल्यानंतर जनकल्याणाच्या धोरणांना वेग येईल असे वाटत होते. परंतु महिना उलटण्यापूर्वीच या सरकारला मोठ्या राजकीय संकटाचा सामना करावा लागत आहे. नेपाळच्या राजकारणातील सध्याची परिस्थिती अत्यंत अस्थिर आणि अनिश्चिततेच्या वळणावर येऊन ठेपली आहे. नेपाळमध्ये ज्या वेगाने राजकीय समीकरणे बदलत आहेत, ते पाहता सुशासनाचा दावा करणाऱ्या पक्षांसमोर आता जनतेच्या विश्वासाला तडा जाऊ न देण्याचे मोठे आव्हान निर्माण झाले आहे.

सद्यस्थितीत गृहमंत्री सुदन गुरुंग यांचा राजीनामा हे या राजकीय अस्थिरतेचे सर्वात ताजे आणि खळबळजनक उदाहरण ठरले आहे. त्यांच्या राजीनाम्याची पार्श्वभूमी अत्यंत नाट्यमय आहे. हवाला व्यवसायातील कुख्यात नाव असलेल्या दीपक भट्ट याच्यासोबत गुरुंग यांचे कथित व्यावसायिक संबंध असल्याची चर्चा सुरू झाली आणि त्यानंतर नेपाळमधील राजकीय वातावरण तापले. तपास यंत्रणा या प्रकरणाची चौकशी करत असतानाच पक्षांतर्गत गटबाजीने देखील उचल खाल्ली होती. गुरुंग यांनी आपल्या पदाचा राजीनामा देताना नैतिकतेचा मुद्दा समोर केला असला, तरी यामागे मोठे राजकीय दडपण होते हे लपून राहिलेले नाही. त्यांनी स्पष्ट केले की, आपल्यावरील आरोपांची निष्पक्ष चौकशी व्हावी आणि पदावर राहून तपासावर कोणताही प्रभाव पडू नये यासाठी आपण पायउतार होत आहोत.

नेपाळमधील तरुण पिढी सध्या पारदर्शकता आणि उत्तरदायित्वासाठी मोठे आंदोलन करत आहे. सार्वजनिक जीवनात काम करणाऱ्या नेतृत्वाचे चारित्र्य निष्कलंक असावे, असा या आंदोलनाचा स्पष्ट संदेश आहे. गुरुंग यांनी राजीनामा देताना याच तरुण पिढीच्या बलिदानाचा आणि त्यांच्या अपेक्षांचा दाखला दिला असला तरी, त्यांच्यावरील आरोपांनी सरकारची प्रतिमा काही प्रमाणात डागाळली आहे.

बालेंद्र शाह यांच्या मंत्रिमंडळातील हा दुसरा मोठा राजीनामा आहे. यापूर्वी नऊ एप्रिल रोजी कामगार आणि सामाजिक सुरक्षा मंत्री दीपक कुमार साह यांना पदावरून हटवण्यात आले होते. साह यांच्यावर आपल्या पदाचा गैरवापर करून पत्नीला आरोग्य विमा बोर्डाचे सदस्य बनवल्याचा ठपका ठेवण्यात आला होता. विशेष म्हणजे साह यांचा पूर्वेतिहास देखील वादातीत नव्हता. त्यांच्यावर वैद्यकीय प्रवेश प्रक्रियेत फसवणूक केल्याचे आरोप होते आणि हे प्रकरण न्यायालयात प्रलंबित असतानाही त्यांना मंत्रिपद देण्यात आले होते. अशा डागाळलेल्या व्यक्तींना मंत्रिमंडळात स्थान दिल्यामुळे पंतप्रधान बालेंद्र शाह यांच्यावर आधीच टीका होत होती. त्यातच आता गृहमंत्र्यांचे नाव हवाला व्यवसायाशी जोडले गेल्याने सरकारची अडचण अधिकच वाढली आहे.

बालेन शाह यांचे सरकार प्रामुख्याने तरुण, तंत्रज्ञ आणि नागरी समाजातील लोकांपासून बनलेले आहे. लोकप्रियतेच्या लाटेवर स्वार होऊन हे तरुण सत्तेत तर आले. मात्र प्रशासन चालवणे हे सोशल मीडियावरील पोस्ट व्हायरल करण्याइतके सोपे नसते, हे आता स्पष्ट होऊ लागले आहे. या तरुण नेत्यांना नेपाळची घटना, परराष्ट्र धोरण आणि सरकारी कामकाज याबद्दल पुरेशी जाण नसल्याचे दिसून येते. सत्तेत आल्यावर २४ तासांच्या आत माजी पंतप्रधानांना अटक करण्यासारखे टोकाचे निर्णय घेण्यात आले, जे कायदेशीर प्रक्रियेअभावी न्यायालयात टिकू शकले नाहीत. अशा अपरिपक्व निर्णयांनी सरकारची प्रतिमा मलिन झाली आहे.



ब्रिगेडियर हेमंत महाजन

राष्ट्रीय स्वतंत्र पक्ष हा स्वच्छ राजकारणाचा संदेश देऊन सत्तेत आल्याने जनतेला या पक्षाकडून मोठ्या अपेक्षा होत्या. मात्र एकामागून एक मंत्र्यांवर होणारे भ्रष्टाचाराचे आरोप पाहता या पक्षाच्या विश्वासार्हतेवर प्रश्नचिन्ह उपस्थित होत आहे. सुदन गुरुंग यांनी ज्या कंपन्यांमध्ये गुंतवणूक केली होती, त्या गुंतवणुकीची माहिती त्यांनी आपल्या मालमत्ता घोषणापत्रात दिली नव्हती, असा दावा तपास यंत्रणा करत आहेत. या प्रकरणाच्या मुळाशी जाताना धनशोधन आणि संपत्ती शुद्धीकरण विभागाला काही महत्त्वाचे दस्तऐवज मिळाले आहेत. त्यावरून गृहमंत्री संशयाच्या घेऱ्यात आले आहेत. पक्षाच्या आतूनच गृहमंत्र्यांच्या विरोधात आवाज उठू लागला, तेव्हा राजीनामा देणे हाच एकमेव पर्याय उरला होता.

राष्ट्रीय स्वतंत्र पक्षाचे प्रमुख आणि माजी उपपंतप्रधान रबी लामिछाने यांच्यावर देखील कोट्यवधी रुपयांच्या बेकायदेशीर व्यवहारांचे आरोप आहेत. सहकारी संस्थांमधील पैशांची अफरातफर आणि नागरिकत्वाचा वाद यामुळे ते यापूर्वीच वादात सापडले होते. अन्यथा तेच नेपाळचे पंतप्रधान झाले असते, असे राजकीय जाणकारांचे मत आहे. आता सरकारसमोर सर्वात मोठी अडचण ही आहे की, आपल्याच पक्षाच्या सर्वोच्च नेतृत्वाला या आरोपांतून मुक्त कसे करावे? सत्तेच्या शीर्षस्थानी बसलेली व्यक्तीच संशयास्पद असते, तेव्हा मंत्रिमंडळातील इतर मंत्र्यांवर कारवाई करताना नैतिक अधिष्ठान उरत नाही.

या सर्व राजकीय धामधुमीत पंतप्रधान बालेंद्र शाह यांनी काही धाडसी आणि अभिनव निर्णय घेऊन जनतेचे लक्ष वेधून घेण्याचा प्रयत्न केला आहे. त्यापैकी एक महत्त्वाचा निर्णय म्हणजे सरकारी कर्मचाऱ्यांना महिन्यातून दोनदा पगार देण्याचा आदेश. तथापि, केवळ पगार देण्याची पद्धत बदलून अर्थव्यवस्थेतील सर्व प्रश्न सुटतील असे नाही. नेपाळमधील भ्रष्टाचार आणि राजकीय अस्थिरता हे मूळ रोग आहेत. नेपाळच्या राजकारणात सध्या ज्या प्रकारे अंतर्गत गटबाजी आणि आरोप-प्रत्यारोपांचे सत्र सुरू आहे, त्यावरून असे दिसते की जनतेने ज्या अपेक्षेने या नवीन नेतृत्वाला निवडले होते, त्या अपेक्षा पूर्ण करणे आता बालेंद्र शाह यांच्यासाठी कठीण जात आहे.

नेपाळची आर्थिक स्थिती सध्या अत्यंत नाजूक आहे. कोविड नंतरच्या काळात श्रीलंका किंवा भूतानप्रमाणे नेपाळची अर्थव्यवस्थाही कोलमडली आहे. मात्र, परदेशात राहणाऱ्या नेपाळी तरुणांच्या अपेक्षा गगनाला भिडल्या आहेत. विकसित देशांतील प्रगती पाहून ते नेपाळमध्ये तशाच बदलाची मागणी करत आहेत, परंतु नेपाळमधील संसाधनांची कमतरता आणि जमिनीवरची वास्तविकता यात मोठी दरी आहे. जनतेच्या अफाट अपेक्षा, प्रशासकीय अनुभवाचा अभाव आणि अंतर्गत भ्रष्टाचाराचे मुद्दे यामुळे सरकार स्थिर राहणे कठीण झाले आहे. केवळ तरुण असणे किंवा लोकप्रिय असणे हे देश चालवण्यासाठी पुरेसे नसते, तर त्यासाठी धोरणात्मक समज आणि राजकीय परिपक्वता आवश्यक असते, हे नेपाळच्या या ताज्या राजकीय घडामोडींमधून अधोरेखित होत आहे. येणारा काळ या 'जेन झेड' सरकारसाठी अग्निपरीक्षा ठरणार आहे.

नेपाळला खऱ्या अर्थाने विकासाच्या दिशेने जायचे असेल, तर केवळ प्रशासकीय बदल करून चालणार नाही, तर राजकीय नेतृत्वाला आपल्या वैयक्तिक हितापेक्षा देशाचे हित आणि पारदर्शकता यांना सर्वोच्च प्राधान्य द्यावे लागेल.

भारतीय चित्रपटसृष्टीत पौराणिक कथांवर आधारीत कलाकृतींना केवळ मनोरंजनाचे साधन म्हणून कधीही पाहिले गेले नाही. त्या नेहमीच समाजाच्या श्रद्धा, परंपरा आणि सांस्कृतिक ओळखीचे प्रतिबिंब ठरल्या आहेत. 'रामायण'सारखे महाकाव्य छोट्या अथवा मोठ्या पडद्यावर उभे करताना त्याभोवती अपेक्षा, भावना याबरोबरीने वादांचेही वर्तुळ आपोआप तयार होते. गेल्या काही वर्षांत तर ऐतिहासिक-पौराणिक कलाकृतींवरून होणाऱ्या वादंगांचे प्रमाण लक्षणीय वाढले आहे. अशा वातावरणात दिग्दर्शक नितेश तिवारी 'रामायण' हा चित्रपट घेऊन प्रेक्षकांसमोर येणार आहेत. सध्या भारतीय चित्रपटसृष्टीतील सर्वात चर्चेत असलेला प्रकल्प म्हणून याकडे पाहिले जात आहे. हा चित्रपट दोन भागांत प्रदर्शित होणार असून, पहिला भाग दिवाळीमध्ये, तर दुसरा भाग पुढील वर्षीच्या दिवाळीमध्ये प्रदर्शित करण्याचे नियोजन आहे. या चित्रपटात रणबीर कपूर, दाक्षिणात्य सुपरस्टार यश, साई पल्लवी (सीता), सनी देओल (हनुमान) आणि रवी दुबे (लक्ष्मण) अशी तगडी स्टारकास्ट पाहायला मिळणार आहे.

# रामायण, राम, रणबीर आणि वाद



सोनम परब

या दोन्ही भागांचा एकत्रित खर्च अंदाजे ५०० दशलक्ष डॉलर्स म्हणजेच सुमारे ४,००० कोटी रुपये इतका आहे. केवळ पहिल्या भागासाठी जवळपास ८३५ ते १,६०० कोटी रुपयांपर्यंतचा खर्च अपेक्षित असल्याचे समोर आले आहे. ही गुंतवणूक हॉलिवूडमधील 'ब्लॅक पँथर' किंवा 'गार्डियन्स ऑफ द गॅलेक्सी' सारख्या मोठ्या चित्रपटांच्या बरोबरीची आहे. ऑस्कर विजेते संगीतकार ए. आर. रहमान आणि हँस झिमर पहिल्यांदाच या चित्रपटासाठी एकत्र काम करत आहेत. अलीकडेच प्रसिद्ध झालेल्या काही छायाचित्रांमुळे प्रेक्षकांमध्ये 'रामायण' विषयीची उत्सुकता कमालीची वाढली आहे. त्याचबरोबर वादालाही तोंड फुटले आहे. या चित्रपटामध्ये रणबीर कपूर प्रभू श्रीरामचंद्रांची व्यक्तिरेखा साकारत असून, त्याच्या भूमिकेवर अनेकांनी आक्षेप घेतला आहे.

भारतीय चित्रपटसृष्टीचा इतिहास पाहिल्यास राम, कृष्ण किंवा इतर कोणतेही पौराणिक पात्र साकारणे ही अभिनय कौशल्याचे दर्शन घडवण्याची संधी असली तरी ती एक सांस्कृतिक जबाबदारी स्वीकारणेही असते. याचे मुख्य कारण म्हणजे प्रेक्षक अशा कलाकारांकडे केवळ अभिनेता म्हणून पाहत नाहीत, तर आदर्श व्यक्तिमत्त्वाच्या रुपात त्यांची प्रतिमा निर्माण करतात. या अवास्तव अपेक्षा आणि वास्तव यातील हे अंतरच अनेकदा वादाचे कारण ठरते, असे भूतकाळात डोकावल्यास लक्षात येते. 'राम राज्य' हा त्याचा ठळक नमुना. या चित्रपटातील प्रेम अदीब (राम) आणि शोभना समर्थ (सीता) यांची जोडी इतकी लोकप्रिय झाली होती की, त्या काळात घराघरांतील देव्हाऱ्यांत आणि कॅलेंडर्सवर या दोघांचे फोटो देवाच्या रूपात लावले जात असत. अनेकांनी त्यांना प्रत्यक्ष परमेश्वर मानून त्यांचे चरणपूजन केले. महात्मा गांधी यांनी त्यांच्या आयुष्यात पाहिलेला हा एकमेव हिंदी चित्रपट होता. मात्र, कलाकारांच्या वैयक्तिक आयुष्यातील वादग्रस्त बाबी समोर आल्या की, त्याचा थेट परिणाम त्यांच्या पडद्यावरील पवित्र प्रतिमेवर होत असे. देवतेची भूमिका साकारणाऱ्या व्यक्तीमध्ये 'देवत्व' असलेच पाहिजे का हा प्रश्न यानिमित्ताने चर्चिला गेला.

पुढील काळात दूरदर्शनवर प्रसारित होणाऱ्या 'रामायण' या मालिकेने प्रेक्षकांच्या श्रद्धाळूपणाला आणखी उधाण आले. या मालिकेत अरुण गोविल यांनी साकारलेला राम इतका लोकप्रिय झाला की, लोक त्यांना प्रत्यक्ष जीवनातही ईश्वर मानू लागले. या मालिकेने रामाचे रूप, वर्तन आणि व्यक्तिमत्त्व कसे असावे याची स्पष्ट चौकट निर्माण झाली. ती वर्षानुवर्षे कायम राहिली. 'रामायण' मालिकेनंतर या महाकाव्यावर झालेल्या प्रत्येक प्रयोगांचे मूल्यमापन करताना प्रेक्षक मूळ मालिकेशी, त्यातील कलाकारांशी तुलना करत असत. आज रणबीर कपूरच्या बाबतही हेच घडताना दिसत आहे. त्याच्या बाबतीतील वाद अभिनयक्षमतेपेक्षा त्याच्या आधीच्या प्रतिमेशी अधिक जोडलेला आहे.


रणबीरने अलीकडे 'ॲनिमल'सारख्या चित्रपटात अतिशय आक्रमक, हिंसक आणि नैतिकदृष्ट्या गुंतागुंतीची भूमिका साकारली होती. त्या भूमिकेचा प्रभाव अजूनही प्रेक्षकांच्या मनात ताजा आहे. 'मर्यादा पुरुषोत्तम' राम हे संयम, शांतता आणि आदर्श यांचे प्रतीक मानले जातात. त्यामुळे या दोन टोकाच्या प्रतिमांमध्ये मोठी तफावत आहे आणि नेमकी तीच प्रेक्षकांना स्वीकारणे कठीण ठरत आहे.

दुसरा महत्त्वाचा मुद्दा म्हणजे रणबीर यांच्या काही जुन्या विधानांचा. एका मुलाखतीत त्याने स्वतःला बीफ लव्हर म्हटले होते. 'रामायण'ची चर्चा सुरू झाल्यानंतर हा भाग सोशल मीडियावर पुन्हा व्हायरल झाला. भारतात राम हे केवळ धार्मिक नव्हे तर सांस्कृतिक श्रद्धेचे केंद्र असल्यामुळे, अशा विधानांची जोड देत त्याच्या भूमिकेवर मोठ्या प्रमाणात आक्षेप घेतले जाऊ लागले. अयोध्यापती रामचंद्रांची व्यक्तिरेखा साकारणाऱ्या व्यक्तीचे वैयक्तिक आचरणही त्या प्रतिमेशी सुसंगत असायला हवे, असा आग्रही युक्तिवाद याबाबत केला गेला. जुन्या मालिकेत लक्ष्मणाची व्यक्तिरेखा साकारणाऱ्या सुनील लहरी यांनीही प्रतिक्रिया देत रणबीरमध्ये 'रामाची निरागसता' दिसत नाही, असे मत व्यक्त केले. वास्तविक, या चित्रपटात प्रभू श्रीरामांची भूमिका साकारण्यासाठी रणबीर कपूरने मद्यपान, धूम्रपान आणि मांसाहार सोडल्याच्या बातम्या प्रसिद्ध झाल्या होत्या. मात्र, राज कपूर यांच्या जन्मशताब्दीनिमित्त नेटफ्लिक्सवर प्रदर्शित झालेल्या एका कार्यक्रमात रणबीर मासे आणि मटण खाताना दिसल्याने सोशल मीडियावर संताप व्यक्त झाला. अनेकांनी याला केवळ 'पीआर स्टंट' संबोधून लोकांच्या भावनांशी खेळल्याचा आरोप केला. आणखी एक मुद्दा म्हणजे चित्रपटाचा लुक आणि सादरीकरण. नितेश तिवारी यांच्या 'रामायण'चा टीजर आणि त्यातील व्हिज्युअल स्टाईल अनेकांना पारंपरिक वाटला नाही.

अर्थात, कलाकार विविध रूपांमध्ये स्वतःला सादर करू शकतो, हीच अभिनयाची खरी ताकद असते. तसेच पडद्यावरील व्यक्तिरेखांकडे पाहताना कलाकाराने तिला किती न्याय दिला हे महत्त्वाचे असते. कलाकाराचे पडद्याबाहेरील आयुष्य, त्याचे व्यक्तिगत जीवन याकडे पाहणे हे कलेच्या तत्वात न बसणारे आहे. मराठी-हिंदीसह मनोरंजनविश्वात असंख्य कलाकारांनी साकारलेल्या व्यक्तिरेखा या त्यांच्या वैयक्तिक आयुष्याशी, स्वभावाशी, वर्तणुकीशी, सवयींशी पूर्णतः विसंगत असल्याचे आपण पाहिले आहे. किंबहुना, अशा व्यक्तिरेखा समर्पकपणाने सादर करणे हे त्या कलाकारासाठी मोठे आव्हान असते आणि सशक्त अभिनयाने हे आव्हान ताकदीने पेलण्याची क्षमता असणाऱ्यालाच खरा कलावंत म्हटले जाते.

कलाकाराने केवळ स्वतःच्या स्वभावाशी जुळणाऱ्याच भूमिका केल्या, तर त्यातील सृजनशीलता संपून जाईल. कलाकार हा एक आरसा असतो. त्याचे काम समाजातील विविध छटा जशाच्या तशी प्रतिबिंबित करणे हे असते; मग त्या छटा त्याच्या वैयक्तिक विचारसरणीशी जुळणाऱ्या असोत वा नसोत. मराठी रंगभूमीवरील नटसम्राट डॉ. श्रीराम लागू हे कट्टर नास्तिक आणि बुद्धिवादी होते. परंतु त्यांनी अनेक नाटकांतून आस्तिक किंवा धार्मिक प्रवृत्तीच्या भूमिकाही तितक्याच प्रभावीपणे साकारल्या. डॉ. लागू नेहमी म्हणायचे की, रंगभूमीवर मी कोण आहे, हे महत्त्वाचे नाही; तर माझे पात्र काय विचार करते, हे महत्त्वाचे आहे. हिंदीमध्ये प्राण किंवा अमरीश पुरी यांचे उदाहरण घेता येईल. पडद्यावर अत्यंत क्रूर खलनायक साकारणारे हे कलाकार वैयक्तिक आयुष्यात अत्यंत सुसंस्कृत, शिस्तप्रिय आणि मृदू स्वभावाचे होते. नवाजुद्दीन सिद्दीकीसारखा शांत आणि अंतर्मुख कलाकार 'रमण राघव' सारखी हिंसक भूमिका करतो, तेव्हा तो त्याच्यातील उपजत गुणांच्या नव्हे, तर त्याच्या निरीक्षणाच्या आणि तंत्राच्या जोरावर प्रेक्षकांना खिळवून ठेवतो. त्यामुळे आहार, व्यसने किंवा राजकीय मते हे कलाकाराचे वैयक्तिक आचरण त्याच्या भूमिकेशी सुसंगत असायला हवे, हा विचार लोकअपेक्षा म्हणून योग्य असला तरी या दोन्ही गोष्टींची गल्लत केली जाता कामा नये. कारण त्यामुळे कलाकाराला सदोदित नैतिक जबाबदारीचे अनामिक ओझे वाहावे लागू शकते.

संचालक, भारतीय हवामान विभाग हवामान बदलामुळे गेल्या काही वर्षांमध्ये उष्णता पूर्वीच्या तुलनेत लक्षणीय प्रमाणात वाढली आहे. दरवर्षी उन्हाचा कडाका नवनवे विक्रम मोडत आहे. विशेषतः सन २००० नंतर 'ग्लोबल वॉर्मिंग'मुळे दरवर्षी अधिक उष्णतेची जाणीव होऊ लागली आहे. भूजलाचा अतिवापर या तापमानात अधिकच भर घालत आहे, ही बाब अनेकांना माहीत नसते; पण आपण जमिनीतून पाणी उपसतो आणि ती जागा रिकामी होते, तेव्हा ती जमीन तुलनेने अधिक तापू लागते. त्याचप्रमाणे, जमिनीचा वापर बदलून केली जाणारी विकासकामेही तापमान वाढवतात. उद्यानांची कमतरता हे देखील उष्णता वाढण्याचे एक प्रमुख कारण आहे. देशाची राजधानी दिल्लीचे उदाहरण घेतल्यास नेहरू प्लेस आणि धौलाकुआं या भागातील तापमानात सुमारे दोन अंशांचा फरक आढळतो. यावरून तापमानवाढीसंदर्भात उद्यानांचे महत्त्व लक्षात येते.



# उष्णतेच्या लाटांचा सामना

एप्रिल महिन्यातच आभाळातून जणू आगीच्या ज्वाळा बरसत आहेत. उत्तर प्रदेश, मध्य प्रदेश, राजस्थान, महाराष्ट्र, पंजाब, हरियाणा, दिल्ली आणि आसपासच्या परिसरात तापमानाचा पारा सातत्याने चढताच आहे. इतकेच नव्हे तर रात्रीच्या वेळीही उष्णतेने नवे विक्रम प्रस्थापित करण्यास सुरुवात केली आहे. हवामान विभागाने अनेक भागांसाठी सतर्कतेचा इशारा जारी केला आहे. मात्र, ईशान्य भारत आणि त्याला लागून असलेल्या प्रांतांमध्ये पावसाचा अंदाज वर्तवण्यात आला आहे. या विरोधाभासाचे नेमके कारण काय? वास्तविक, निसर्ग स्वतःचे उपचार स्वतःच करत असतो. उन्हाळ्यात जेव्हा तापमान वाढते, तेव्हा एका ठराविक पातळीवर पोहोचल्यानंतर त्यात घट होणे अनिवार्य असते. या प्रक्रियेत जर आर्द्रता आणि बाष्पाची साथ मिळाली, तर वादळी पाऊस पडतो आणि जर ही साथ मिळाली नाही, तर धुळीची वादळे येऊन वातावरण काही प्रमाणात थंड करतात. आता कोणत्या भागात वादळ येईल आणि कुठे पाऊस पडेल, हे स्थानिक घटकांवर अवलंबून असते. तापमान संतुलित राखण्याचे हे एक नैसर्गिक चक्र आहे.

सध्या पाऊस पडण्याचे कारण म्हणजे एकामागून एक येणारे 'पश्चिमी विक्षोभ' (वेस्टर्न डिस्टर्बन्स) हे आहे. याच कारणामुळे गेल्या काही दिवसांत जम्मू-काश्मीरचे काही भाग, उत्तराखंड आणि अगदी नेपाळपर्यंत हिमवृष्टी झाली आहे. येथील बदलत्या हवामानाचा प्रभाव उत्तर-पश्चिम क्षेत्रांवर पडतो. ज्यामध्ये पंजाब, हरियाणा, दिल्लीच नव्हे तर पाकिस्तानच्या काही भागांचाही समावेश आहे. भारताच्या पूर्व भागाचा विचार केला तर, या दिवसांत आंध्र प्रदेशच्या उत्तर भागापासून ओडिशा, बिहार, बंगाल, झारखंड आणि सिक्कीमपर्यंत पाऊस होतो. कारण बंगालच्या उपसागरातून या भागाला आर्द्रता मिळते. पश्चिमी विक्षोभ पश्चिमेकडून पूर्वेकडे सरकत असल्याने देशाच्या या भागांत पावसाची हजेरी लागते.



के. जे. रमेश
माजी संचालक, भारतीय हवामान विभाग


मात्र, जूनमध्ये जेव्हा मान्सून केरळच्या किनारपट्टीवर धडकेल, तेव्हा पुन्हा एकदा देशभर पावसाला सुरुवात होईल. पण यंदा मान्सून कमकुवत राहण्याचा आणि ९२ टक्के पाऊस पडण्याचा प्राथमिक अंदाज वर्तवण्यात आला आहे. मे महिन्याच्या अखेरीस हवामानाचे पुन्हा एकदा आकलन केले जाईल आणि त्यानंतर मान्सूनचे मासिक अंदाज जाहीर होतील. याशिवाय 'इंडियन ओशन डायपोल'ची देखील चर्चा होत आहे, जे प्रत्यक्षात हिंदी महासागराच्या पश्चिम आणि पूर्व भागातील तापमानातील तफावत असते. हे सकारात्मक राहिल्यास भारतात चांगला मान्सून होतो, तर नकारात्मक असल्यास पाऊस कमी होतो. अलीकडच्या वर्षात पावसाचे प्रमाण वाढण्याचे एक कारण हवामान बदल हे देखील आहे. आता बिकानेर, बाडमेर, जोधपूर सारख्या भागांतही पूर येऊ लागला आहे. कारण तिथे पावसाचे स्वरूप बदलले आहे. मग तिथे 'एल निनो'चा प्रभाव असो वा नसो. हवामान बदलामुळे गेल्या काही वर्षांमध्ये उष्णता पूर्वीच्या तुलनेत लक्षणीय प्रमाणात वाढली आहे. दरवर्षी उन्हाचा कडाका नवनवे विक्रम मोडत आहे. विशेषतः सन २००० नंतर 'ग्लोबल वॉर्मिंग'मुळे दरवर्षी अधिक उष्णतेची जाणीव होऊ लागली आहे. भूजलाचा अतिवापर या तापमानात अधिकच भर घालत आहे, ही बाब अनेकांना माहीत नसते; पण आपण जमिनीतून पाणी उपसतो आणि ती जागा रिकामी होते, तेव्हा ती जमीन तुलनेने अधिक तापू लागते. त्याचप्रमाणे, जमिनीचा वापर बदलून केली जाणारी विकासकामेही तापमान वाढवतात. विकासासाठी ज्या प्रमाणात झाडे तोडली जातात, त्या प्रमाणात ती लावली जात नाहीत, हे वास्तव आहे. त्यामुळे विकासकामे झालेल्या क्षेत्रांत उष्णता अधिक काळ टिकून राहते. उद्यानांची कमतरता हे देखील उष्णता वाढण्याचे एक प्रमुख कारण आहे. देशाची राजधानी दिल्लीचे उदाहरण घेतल्यास नेहरू प्लेस आणि धौलाकुआं या भागातील तापमानात सुमारे दोन अंशांचा फरक आढळतो. यावरून तापमानवाढीसंदर्भात उद्यानांचे महत्त्व लक्षात येते.

मानवी हस्तक्षेपही तापमान वाढीस मोठ्या प्रमाणावर कारणीभूत आहे. वातानुकूलित यंत्रणेचे (एसी) साधे उदाहरण घ्या. आता प्रत्येक घरात याचा वापर होऊ लागला आहे. परंतु एसी मशीन खोली थंड करण्यासाठी बाहेर मोठ्या प्रमाणावर गरम हवा सोडतात. आपल्या जीवनशैलीत झालेला हा बदल आता आपल्यावरच उलटवू लागला आहे.

अशा परिस्थितीत सामान्य माणसाने काहीच करू नये का? 'ग्लोबल वॉर्मिंग'शी लढण्यासाठी जागतिक स्तरावर धोरणे आखली जात आहेत आणि प्रत्येक सरकार आपल्या स्तरावर त्यांची अंमलबजावणी करत आहे. परंतु सामान्य माणसानेही स्वतःहून प्रयत्न केले तर परिस्थिती काही प्रमाणात सुधारू शकते. उदाहरणार्थ, एस्बेस्टोस किंवा पत्रा शेडची घरे बांधणे टाळावे. महानगरांमधील झोपडपट्ट्यांमध्ये सामान्यतः यांचाच वापर केला जातो. परंतु अशी घरे उष्णता शोषून घेतात. सिमेंट-काँक्रीटच्या छतांवरही 'रिफ्लेक्टिव्ह पेंट'चा वापर करावा, ज्यामुळे किमान दीड अंशांपर्यंत थंडावा मिळू शकतो. इतकेच नव्हे तर घरांमध्ये पावसाच्या पाणी साठवणुकीची (रेन वॉटर हार्वेस्टिंग) विशेष व्यवस्था असायला हवी. यासाठी छतावरील पाणी पाईपद्वारे जमिनीत जिरवणे पुरेसे असते. भूजल पातळी टिकवून ठेवण्यासाठी ही पद्धत अत्यंत गुणकारी आहे. परंतु अद्याप ती आपल्या सवयीचा भाग बनलेली नाही. पावसाच्या पाण्याचा एक थेंबही नाल्यात वाहून जाऊ न देणे ही आपली जबाबदारी आहे. अशा प्रकारचे प्रयत्न विशेषतः ग्रामीण उपजीविकेसाठी अत्यंत महत्त्वाचे आहेत.

३८ अंश सेल्सिअसपेक्षा जास्त तापमान मानवांसाठी 'उष्माघात' (हीटवेव्ह) ठरू शकते, तर जनावरांसाठी ही मर्यादा २८ अंश सेल्सिअस इतकीच आहे. जर आपली गुरे उन्हाने त्रस्त झाली, तर त्यांच्या खाण्यापिण्यावर परिणाम होतो. पर्यायाने दूध किंवा अंडी उत्पादनात घट होऊ शकते. यामुळे आधीच संकटात असलेल्या ग्रामीण अर्थव्यवस्थेवर अधिक ताण वाढू शकतो. दुर्दैवाने या विषयावर फारशी चर्चा होत नाही. मात्र कृषी हवामान शास्त्र सेवेच्या मदतीने आपण याचे व्यवस्थापन सहज करू शकतो. येत्या दहा दिवसांत तामिळनाडूपासून बंगालपर्यंतच्या पूर्व भागात उष्णतेपासून थोडा दिलासा मिळू शकतो. मात्र उत्तर कर्नाटक, महाराष्ट्र, मध्य प्रदेश, पूर्व राजस्थान आणि उत्तर प्रदेश सारख्या भागांत पश्चिमी विक्षोभाचा प्रभाव ओसरताच उष्णता पुन्हा त्रास देऊ लागेल. आपण याच परिस्थितीनुसार स्वतःची तयारी करणे आवश्यक आहे.

# नवाकाळ शब्दकोडे-१५९४



**आडवे शब्द –**

३. गलोल ५. आकाश ७. एकाकी, हतबल १०. आई १२. सफल, यशस्वी १४. गुजराण, पोट भरणे १५. दिमाख, शान १६. एकाएकी, अचानक, सूचना न देता १७. अर्जुन १८. लहान १९. सामूहिक आक्रोश, विलाप २१. वेगळी चूल मांडणे २३. क्रीडांगण २४. चिखल, धुडगूस २५. गडद लाल गराचा कंद २६. तऱ्हा २८. सरहद्द २९. अकरावा मराठी महिना ३०. कळस, माथा ३२. कयास, तर्क ३५. पूर्व दिशा ३७. सरपटणारे धोकादायक जनावर ३८. पराक्रमी स्त्री ३९. दैत्य ४१. निवडणूक प्रक्रियेचे नियंत्रण करणारी स्वायत्त यंत्रणा ४३. वर्ष (ग्रामीण) ४५. प्रिय व्यक्तीच्या सर्व इच्छा पूर्ण करणे ४६. प्रहर ४९. निरागस, सरळमार्गी ५१. खांद्याचा सांधा ५३. काळिमा ५५. नाट्यदेवता ५८. विशाल ६०. असंमती, अस्वीकार ६१. नियंत्रण ६४. बंदी ६६. गुलामी ६७. सुंदर, चांगले ६८. दूध, केळी, साखर एकत्र करून तयार होणारे ६९. गाढव ७१. आंबा ७२. गुणग्राहकता ७३. दखल घेण्याजोगे ७४. वेळकाढूपणा ७६. पृथ्वी ७७. कंत्राटदार ७९. माशाच्या पाठीवरील खडबडीत भाग ८०. आवेश ८२. गाढा अभ्यास ८४. उद्यान ८५. शुभारंभ ८७. भार, ओझे ८८. क्षुद्र वृत्तीचा, दात कोरून पोट भरणारा ९०. रोटीचा प्रकार ९२. वैशिष्ट्य ९३. असमानता ९४. वाऱ्याच्या मदतीने वीजनिर्मिती करणारे उपकरण

**उभे शब्द –**

१. 'ऊस डोंगा परि रस नोहे डोंगा....' संत चोखामेळा यांचा अभंग २. सजीव, प्राण असलेला ४. मनाविरुद्ध एखाद्याच्या मागे जावे लागणे ५. मोठी नदी ६. पुरेपूर ७. चारचौघात बोलू नये असे, अश्लील, असभ्य ८. बरोबर, सोबत, संगे ९. सत्यता, विश्वासार्हता १०. 'ताकापुरती आजी आणि कामापुरता xx' ११. फुलझाडांचा वाफा १३. धडाडीने कामे करणारा, उत्साही १४. कचरा साठलेली मोकळी जागा १७. एक चतुर्थांश, चतकोर २०. राजाचा लेखनिक, एक आडनाव २२. महाग, उच्च दर्जाचे २४. लाडूंचा शाही प्रकार २७. अस्वस्थता, उलघाल २९. वस्त्र विणण्याचे साधन, एखाद्याचा खाणाखुणांवरून शोध घेणे- xxकाढणे ३१. नाउमेद ३२. महाकाय ३३. कोलाहल, अनेक आवाज एकत्र ३४. रुष्ट ३५. कमतरता ३६. दत्ताची मुखे ३७. नौका ४०. गर्दी ४१. मोठा आवाज ४२. विहीर ४४. शिकेकाईत फेसासाठी घातले जाणारे फळ ४७. नंतर ४८. भाग्य ४९. संचय ५०. धान्य पाखडण्याचे साधन, भूक वाढवणारे जेवणाआधी घेण्याचे गरम पेय ५२. अडथळा ५३. दरोडा ५४. खड्या मसाल्यातील जिन्नस ५६. पाळत ठेवणे, निगराणी ५७. ज्वर ५८. अंकुर, सुटे पैसे, चिल्लर ५९. लाज ६०. नाकात औषध टाकणे ६२. मजबूत ६३. सगळे एकाच ठिकाणी! ६४. पाठीतल्या माळेतील हाड ६५. विष्णूच्या दशावतारातील तिसरा अवतार ६६. मोठी सुई ६७. देव ६८. सैनिक ७०. घोरपडीच्या जातीतील लहान प्राणी ७१. वृक्ष, बाग, अरण्य ७२. निभाव ७३. कमतरता, चणचण ७५. लुब्ध ७८. सार्वत्रिक नाराजी ७९. पक्षी ८०. येणे, आरंभ ८१. चांदी ८३. अगोदर ८४. पायऱ्या असलेली विहीर ८६. फांदी ८७. उमर ८८. काळजी ८९. मारहाण ९०. नृत्य ९१. खात्रीने, हमखास •

**नवाकाळ कोडे क्रमांक १५९३ चे उत्तर**

**आडवे शब्द** : १. कर्ण ३. आफत ५. पडझड ७. भिस्त ९. आसरा ११. गोंद १२. शिक्षा १३. वेचा १४. डगला १५. मरगळ १६. पथ १८. शिष्य १९. ढ २०. कथकली २१. वृथा २२. दत्त २३. मती २४. जावळ २५. थट्टा २६. वृत्ती २७. भरारी २९. हक्क ३१. अक्ष ३२. माय ३३. भूतदया ३४. दिल्ली ३५. कळकट ३७. कंठ ३८. साफ ३९. दान ४१. भवन ४२. काजळ ४३. डर ४५. क्रमप्राप्त ४६. वळीव ४८. अग्रक्रम ५०. पाचुंदा ५१. धूप ५३. सिंचन ५४. माणिक ५५. नवे ५७. विवर्ण ५९. वल्ली ६०. चुणूक ६१. चकली ६३. खंत ६४. जहर ६५. कणीस ६६. बाब ६७. पकड ६९. वरई ७१. तरट ७३. कीस काढणे ७५. जाच ७६. गच्ची ७८. तबक ७९. पाला ८२. फायदेशीर ८७. खोपा ८९. नीरवता ९१. नाव ९२. हाताबाहेर गेलेले ९६. यार ९७. मटकी ९८. रीम ९९. करूणा

**उभे शब्द** : १. करि डळमळ भूमंडळ सिंधुजळ गगनी २. ढास ४. फसगत ४. पदपथ ६. झरा ७. भिक्षा ८. पाचा उत्तरी सुफल संपूर्ण ९. आलाप १०. रामनवमी १२. शिष्यवृत्ती १७. थकवा २०. कट्टा २२. दरा २५. थक्क २६. वृक्ष २७. भय २८. कोंदण २९. हल्ली ३०. मळभ ३१. अटन ३२. माठ ३४. दिनक्रम ३६. कवडीचुंबक ३७. कंठाळी ३८. साज ४०. अप्रामाणिक ४४. व्यग्र ४७. वधू ४८. अनवरत ४९. क्रय ५२. पवि ५४. माणूसकी ५६. वेखंड ५८. वखार ६०. चुणी ६१. चबढब ६२. लीप ६५. कट ६६. बाका ६८. कर्तबगार ६९. वचपा ७०. ईद ७२. रघु ७४. सरशी ७७. नायनाट ८०. लाखो ८१. आवर ८३. देवकी ८४. रहाट ८५. अंबारी ८६. ओले ८८. पाळणा ९०. रया ९३. हेम ९५. लेक




## ● मेष

**हा आठवडा** संयम ठेवून पुढे जायचे आहे. आठवड्याच्या अखेरीला तुमचे उद्दिष्ट पूर्ण झालेले असेल. आत्मविश्वास चांगला राहील. कामामध्ये सातत्य ठेवण्याचा कसोशीने प्रयत्न करा. अति धाडस नको. मनात आलेल्या कल्पना नियोजनपूर्वक प्रत्यक्षात आणा. आर्थिक स्थिती चांगली राहणार आहे. खर्चावर मात्र नियंत्रण हवे. शेअरमार्केटमध्ये अत्यंत सावधगिरीने गुंतवणूक करा. साठवलेला पैसा शक्यतो वापरावा लागणार नाही यासाठी प्रयत्न करा.

कुटुंबामध्ये तुमच्यावर आलेली जबाबदारी पूर्ण करता येईल. जोडीदाराशी विनाकारण मतभेद होऊ शकतात. अहंकार बाजूला ठेवा. संततीच्या इच्छा पूर्ण कराल. भावंडांचे सौख्य राहील. धार्मिक यात्रा कराल. मित्रपरिवारावर अवलंबून राहू नका.

कार्यक्षेत्रामध्ये सुरुवातीला अडचणी जाणवतील. आधी न मिळालेली संधी पुन्हा समोर येईल. त्याचा लाभ घ्या. नियोजन करताना पर्याय याचा विचार करून ठेवावा. प्रवासाचे योग आहेत. कुठल्याही आमिषाला बळी पडू नका. नोकरदारांनी चतुराईने स्पर्धकांना तोंड द्यावे.

आरोग्याच्या तक्रारींकडे वेळीच लक्ष द्या.

**शुभ दिनांक** : ८, १०.

## ● वृषभ

**या आठवड्यात** महत्त्वाची कामे सुरुवातीलाच करून घ्या. आळशीपणा न करता कृतीला महत्त्व द्या. काही नवीन कल्पना सुचतील. मात्र इतरांना त्या पटतीलच असे नाही. आत्मविश्वास कायम ठेवा. अहंकार मात्र त्रासदायक ठरेल. आर्थिक स्थिती सर्वसाधारण चांगली राहील. मौजमजेकडे कल राहील. खर्चावर नियंत्रण ठेवा. बंडखोरपणा वाढेल.

कुटुंबामध्ये पुढाकार घेऊन, सर्वांना बरोबर घेऊन काही निर्णय घ्यावे लागतील. तुमचे म्हणणे, विचार इतरांना समजावून सांगा. आवश्यक तिथे दोन पावले माघार घ्यावी. कौटुंबिक हिताच्या दृष्टीने अलिप्त धोरण ठेवून महत्त्वाचे निर्णय घ्यावे लागतील. संततीसाठी खर्चाची तरतूद करावी. जोडीदाराचा सल्ला, मत फायदा करून देईल. मित्रांशी मतभेद संभवतात.

कार्यक्षेत्रामध्ये कोणावरही अवलंबून न राहता कामाचे नियोजन करा. स्वबळावर जमतील त्या कार्यावरच लक्ष केंद्रित करा. नोकरदारांनी वरिष्ठांचा तुमच्याबद्दल गैरसमज होणार नाही याची काळजी घ्यावी. तुमचे महत्त्व पटवून द्यावे लागेल. व्यावसायिकांनी नवीन संधीचा लाभ घेताना सावध राहावे.

**शुभ दिनांक** : ३, ४, ५.

## ● मिथुन

**एकंदरीत** आठवडा तुमच्यासाठी चांगला ठरेल. आजूबाजूच्या परिस्थितीचे योग्य आकलन करून निर्णय घ्यावेत. स्वतःविषयी मनात शंका बाळगू नका. संयमी धाडस उपयोगी पडेल. घाईगडबडीत घेतलेले निर्णय त्रासदायक ठरतील. आर्थिक स्थिती चांगली राहील. जुनी येणी वसूल करता येतील. झटपट यश मिळवण्यासाठी चुकीचा मार्ग निवडू नये. नियमांचे कटाक्षाने पालन करावे. चैनीकडे कल राहील. त्याबाबत सावधगिरी बाळगा.

घरातील समस्या चतुराईने सोडवता येतील. भावंडांचे सौख्य राहील. मात्र त्यांचे वर्चस्व मान्य करावे लागेल. कुठेही चांगुलपणा दाखवताना व्यवहारी बाजू विसरू नये. कामानिमित्त, सहलीनिमित्त घरापासून लांब जावे लागेल. संततीकडे पूर्ण लक्ष द्या. जोडीदाराशी दुरावा येणार नाही याकडे लक्ष द्यावे.

कार्यक्षेत्रांमध्ये विरोधकांचे डावपेच ओळखून तुमचे आखलेले लवचिक धोरण उपयोगी पडेल. नोकरदारांना स्वतःची क्षमता सिद्ध करावी लागेल. आर्थिक नियोजन योग्य रीतीने केल्यामुळे फायदा होईल. संचित धन वाढेल. भागीदारीतील व्यवसाय यशस्वी ठरेल. मात्र व्यवहारात पारदर्शकता ठेवा. आरोग्याच्या तक्रारींकडे दुर्लक्ष करू नका.

**शुभ दिनांक** : ३, ६, ७.

## ● कर्क

**आठवड्याची** सुरुवात मनासारखी झाली नाही तरी नंतरचा काळ चांगला आहे. त्यामुळे उत्तम नियोजन करावे लागेल. अनपेक्षित व अचानक येणाऱ्या अडचणींसाठी मात्र तयार राहा. विनाकारण भावनाशील न होता व्यवहाराचाही विचार करावा. लाभाचे प्रमाण वाढेल. तुमच्या कष्टाचा, हक्काचा पैसाही मिळेल. तुमच्या बोलण्यामुळे समोरचा दुखावणार नाही यासाठी काळजी घ्या. तुमचे विचार स्पष्ट परंतु सौम्य शब्दांत मांडा.

कुटुंबामध्ये गृहसजावटीचे बेत ठरतील. तुम्हाला पुढाकार घेऊन जबाबदाऱ्या पूर्ण कराव्या लागतील. घरातील ज्येष्ठांच्या आरोग्याकडे लक्ष द्यावे लागेल. जोडीदार व संततीच्या प्रगतीमुळे समाधानी असाल. मित्रमैत्रिणींबरोबर आनंदात वेळ घालवा. प्रेमीजनांची विवाहाची बोलणी पुढे सरकतील.

कार्यक्षेत्रामध्ये नवीन संधीचा लाभ घेताना नियम व अटी तपासून घ्याव्यात. जबाबदारी वाढणार आहे. त्याचबरोबर मानसन्मानही मिळेल. कार्यक्षेत्रामध्ये काही बदल होऊ शकतात. आरोग्य चांगले राखण्यासाठी खाण्यावर नियंत्रण ठेवा.

**शुभ दिनांक** : ६, ७, ९.

## ● सिंह

**आठवड्याच्या** अखेरीला तुम्हाला तुमच्या कष्टाचे फळ मिळेल. विरोधक प्रबळ होतील. परंतु तुम्हीही बलवान स्थितीत असल्यामुळे परिस्थितीचा सामना करू शकाल. चतुराईने समस्या हाताळाव्यात. आर्थिक स्थिती चांगली राहील. कामाचे व लाभाचे प्रमाण वाढणार आहे. मन उत्साही ठेवणे आवश्यक आहे. मनाप्रमाणे घटना घडवून आणू शकाल. मनामध्ये विनाकारण भीती, शंका-कुशंका राहतील.

कौटुंबिक आघाडीवर तणावाचे वातावरण राहील. घरातील ज्येष्ठ व जोडीदार यांच्या आरोग्याकडे लक्ष द्यावे लागेल. तुमचे बोलणे संयमित ठेवा. अहंकार त्रासदायक ठरेल. कुटुंबामधील मतभेद वाढणार नाही यासाठी सुसंवाद महत्त्वाचा राहील. संततीच्या दृष्टीने चांगला काळ आहे. मित्रांमुळे फायदा होईल.

उद्योग-व्यवसायात नवीन संधी फायद्याची ठरेल. कामामध्ये सातत्य व धडाडी, आत्मविश्वास आवश्यक आहे. स्पर्धकांना तोंड देण्यासाठी परिस्थितीचा अभ्यास करणे व त्याप्रमाणे तुमच्या कार्यशैलीत बदल करणे उपयोगी ठरेल. नोकरदारांनी स्वतःचे वेगळेपण सिद्ध करावे. वरिष्ठांची साथ मिळेल. भागीदारीमध्ये पारदर्शक व्यवहार ठेवावे. कामानिमित्त प्रवास करावा लागेल. वाहन चालवताना काळजी घ्यावी.

**शुभ दिनांक** : ८, ९.

## ● कन्या

**महत्त्वाची** कामे आठवड्याच्या सुरुवातीला करून घ्या. स्वतःवरचा विश्वास कायम ठेवा. निर्णय घेताना मनात शंका-कुशंका येऊ देऊ नका. मानसिक अस्वस्थता नियंत्रणात ठेवावी. योग्य वेळी कृती करणे महत्त्वाचे आहे. संचित धन जपावे. लाभाचे प्रमाण सर्वसाधारण राहील. आर्थिक गुंतवणूक अनुभवी तज्ज्ञांच्या सल्ल्याने करू शकता. श्रमाला भाग्याची साथ मिळणार आहे. स्वभाव जिद्दी होईल. याचा सकारात्मक उपयोग करून घ्या. घरामध्ये चांगले वातावरण राहील. तुमचा अहंकार, वाणी मात्र नियंत्रणात ठेवा. वडिलोपार्जित संपत्तीचा लाभ मिळू शकेल. जोडीदाराचा तुमच्या कामांमध्ये सहभाग उपयुक्त ठरेल. संततीकडे विशेष लक्ष द्यावे. मित्र, भावंडांशी मतभेद टाळा नाहीतर दुरावा निर्माण होईल. आईच्या आरोग्याकडे लक्ष द्यावे. उद्योगव्यवसायात नवीन संधी मिळतील. छुपे हितशत्रू, स्पर्धक कार्यरत होणार आहे. तुम्हालाही परिस्थितीप्रमाणे तुमचे धोरण, कार्यशैली बदलावी लागेल. तुमच्या योजना उघड करू नका. नोकरदारांना अडथळ्याची शर्यत पार पाडावी लागेल.

**शुभ दिनांक** : ३, ४, ५.

## ● तूळ

**या आठवड्यात** तुम्हाला परिस्थितीमध्ये चढ-उतार जाणवतील. योग्य नियोजन व धडाडी यामुळे येणाऱ्या अडथळ्यांना तोंड देऊ शकाल. शनि मंगळाचा विरोध जाणवला तरी गुरुमहाराजांचे पाठबळ आहे. आर्थिक लाभ होणार आहे. खर्चावर मात्र नियंत्रण ठेवावे लागेल. कुठल्याही नियमाचे, कायद्याचे उल्लंघन झाल्यास त्रासदायक ठरेल. कौटुंबिक जबाबदारीला न्याय देताना संयम ठेवावा लागेल. आप्तस्वकीयांसाठी खर्चाची तयारी ठेवा. भावंडांचे सहकार्य मिळेल. धार्मिक यात्रा कराल. जोडीदार व संततीशी सुसंवाद ठेवा. मित्रांबरोबर थोडा दुरावा जाणवला तरी त्यांचे मत विचारात घ्यावे. वारसाहक्काने काही लाभ होतील. कार्यक्षेत्रात योग्य व नवीन संधीची वाट पाहावी. त्यासाठीचे प्रयत्न वाढवावे. पुढाकार घेऊन जबाबदाऱ्या पूर्ण कराव्या लागतील. त्याचे योग्य ते फळ तुम्हाला मिळेल. प्रवासातून फायदा आहे. येणाऱ्या अडथळ्यांवर चतुराईने मात करू शकाल. नोकरदारांना संयम ठेवावा लागेल. वरिष्ठांची साधारण साथ मिळेल. त्यांच्याशी मतभेद टाळा.

**शुभ दिनांक** : ६, ७.

## ● वृश्चिक

**कार्यक्षेत्र** व कुटुंब दोन्हीकडे लक्ष द्यावे लागल्यामुळे एकंदरीत हा आठवडा धावपळीचा जाईल. नवीन संधी, व्यवहार यशस्वीपणे पार पाडू शकाल. आठवड्याची सुरुवात नवीन खरेदीने होईल. आर्थिक व्यवहार करताना सावधगिरी बाळगा. शेअर बाजारात गुंतवणूक सध्या टाळा. वाढलेल्या जबाबदाऱ्या पूर्ण करण्यासाठी संयमाची गरज राहील. वेळप्रसंगी मनाविरुद्ध गोष्टी कराव्या लागतील. बोलण्यावर नियंत्रण ठेवा.

घरामध्ये गैरसमज झाल्यामुळे ताणतणाव जाणवू शकतो. वेळीच उपाय योजना करावी. आईचा, घरातील ज्येष्ठांचा सल्ला, अनुभव उपयोगी राहील. भावना व व्यवहार यामध्ये गल्लत करू नये. जोडीदाराचे वर्चस्व राहील. मुलांशी वागताना लवचिक धोरण ठेवावे.

उद्योग व्यवसायात कुठल्याही आमिषाला बळी पडू नका. नवीन व्यवहार करताना कायदेशीर बाबी तपासा. नोकरीत बदल करायचा असल्यास योग्य काळ आहे. व्यावसायिकांनी सहकारी वर्गाला चतुराईने हाताळावे. नियमांचे काटेकोर पालन आवश्यक आहे. उष्णतेच्या आजारासंबंधी काळजी घ्या.

**शुभ दिनांक** : ३, ८, ९.

## ● धनु रास

**या आठवड्यातील** घडामोडी तुम्हाला विचार करायला भाग पाडतील. संमिश्र फळे देणारा हा कालावधी विचारपूर्वक कृती करण्याचा आहे. तुमच्या कामाचे कौतुक होईल. त्याचबरोबर जबाबदारीही वाढणार आहे. राशीस्वामी गुरू पाठबळ देत आहे. कुठल्याही परिस्थितीत तुम्हाला नैराश्य येणार नाही याची काळजी घ्या. आर्थिक आवक व जावक सारखी राहील. अनपेक्षित व अचानक खर्च निघू शकतात. दीर्घ मुदतीसाठी गुंतवणूक करणे योग्य ठरेल.

कुटुंबामध्ये शांतता राहण्यासाठी वादाचे मुद्दे टाळावेत. काही बाबतीत तडजोड करणे गरजेचे राहील. घराचा अनुभव, सल्ला उपयोगी ठरेल. मुलांच्या दृष्टीने काही ठोस निर्णय घ्यावे लागतील. भावंडांशी सुसंवाद व पारदर्शक व्यवहार ठेवा. मित्रपरिवार सध्या फारशी मदत करू शकणार नाही.

उद्योग व्यवसायात तुमच्या योजना, नवीन कल्पना प्रत्यक्षात उतरवता येतील. त्याचे श्रेयही तुम्हाला मिळेल. मात्र जबाबदारी व कष्ट वाढतील. नोकरदारांनी सामंजस्याने व चतुराईने हितशत्रूंना तोंड द्यावे. वरिष्ठांवर फार अवलंबून राहू नका. सध्या तुमचा प्रगतीचा काळ आहे. श्रमाला भाग्याची साथ मिळेल. आरोग्याच्या तक्रारींकडे दुर्लक्ष करू नका.

**शुभ दिनांक** : ६, ७.

## ● मकर

**एकंदरीत** हा आठवडा उत्साहवर्धक आहे. सुरुवातीलाच धनलाभाचे योग आहेत. कुठल्याही परिस्थितीत नियमभंग करू नका. बोलण्यामुळे गैरसमज होऊ शकतात. अभ्यासपूर्ण आर्थिक गुंतवणूक फायदेशीर ठरेल. मात्र जास्त आर्थिक जोखीम घेऊ नका. तुमच्या कर्तृत्वाला, प्रयत्नांना संयमाची जोड दिल्यास फायदा दिसून येईल.

घरामध्ये वातावरण दूषित होणार नाही याची काळजी घ्या. कुटुंबासाठी आवर्जून वेळ काढावा लागेल. अहंकार बाजूला ठेवून पुढाकार घ्यावा. सर्वांना एकत्र घेऊन जाताना चतुराईने परिस्थिती सांभाळावी लागेल. संततीची प्रगती आनंद देईल. चैनीच्या वस्तू खरेदी कराल. जोडीदाराशी नाते चांगले राहील. कुटुंबाबरोबर सहलीचे आयोजन कराल.

उद्योग व्यवसायात चिकाटी ठेवा. सकारात्मक मनोवृत्ती उत्साह वाढवेल. हाताखालील नोकरवर्गाकडे बारकाईने लक्ष ठेवावे. त्यांना सांभाळून घ्यावे लागेल. नोकरवर्गाने प्रगतीसाठी नवीन कला कौशल्य आत्मसात करावे. व्यावसायिकांनी व्यवहारिकता प्राधान्यक्रमावर ठेवावी. नवीन व्यवहारात कायदेशीर बाजू विसरू नका. श्वसनविकार त्रासदायक ठरू शकतात.

**शुभ दिनांक** : ३, ४, ९.

## ● कुंभ

**आठवड्याचा** पूर्वार्ध महत्त्वाच्या कामासाठी योग्य आहे. आठवड्याच्या अखेरीला थोडा मनस्ताप होऊ शकतो. कुठलाही व्यवहार करताना, निर्णय घेताना मन स्थिर ठेवा. आवश्यक तिथे विश्वासू व अनुभवी व्यक्तीचा सल्ला घ्यावा. लाभाचे प्रमाण चांगले असले तरीही खर्च व फसवणूक टाळण्यासाठी सावध राहावे. कामानिमित्त प्रवासाचे योग आहे. सकारात्मक दृष्टिकोन हितावह ठरेल.

घरातील वातावरण चांगले राहील. छोटे समारंभ आयोजित केले जातील. बोलताना मात्र काळजी घ्यावी. मित्रपरिवार व भावंडांचे सौख्य राहील. मनामध्ये विनाकारण शंका बाळगू नका. जोडीदार व मुलांची प्रगती उत्साह वाढवेल. परंतु मतभेद टाळावेत.

कार्यक्षेत्रामध्ये आजूबाजूची परिस्थिती ओळखून त्याप्रमाणे तुमचे धोरण ठेवावे लागेल. तुमचे मनोबल चांगले ठेवा. भांडवल उभे करताना त्रास होऊ शकतो. पण तुमचे काम अडणार नाही. व्यवसायातील तुमचे अंदाज बरोबर आहे याची खात्री करून घ्या. योग्य नियोजन व व्यावहारिक दृष्टिकोन यामुळे यश मिळेल. मानसिक आरोग्य सांभाळण्याला प्राधान्य द्यावे.

**शुभ दिनांक** : ३, ६, ७.

## ● मीन

**साडेसाती** चालू असताना मंगळासारख्या ग्रहाचे तुमच्या राशीतून भ्रमण होत आहे. त्यामुळे मनावर नियंत्रण ठेवणे सर्वात महत्त्वाचे आहे. अति भावनाशील होऊ नये. आर्थिक बाजू चांगली राहील. आक्रमकता, धडाडी व नेतृत्वकौशल्य याला संयमाची जोड द्यावी. बोलताना सौम्य शब्द वापरा. मनामधील चलबिचल निर्णय घेण्यास त्रासदायक ठरू शकते. कामाची गती कमी असली तरी कार्यसिद्धी होणार आहे.

कुटुंबामध्ये धार्मिक कार्य होईल. कुटुंबामध्ये मतभेदाला वाव देऊ नका. मोठेपणा घेऊन सर्वांना सांभाळून घ्यावे लागणार आहे. जोडीदार व तुमच्यामध्ये अहंकाराला थारा देऊ नका. भावंडांचे सौख्य राहील. कौटुंबिक व्यवसायात यश मिळेल. मुलांच्या प्रगतीसाठी काही कठोर पावले उचलावी लागतील. सहलीचे आयोजन होईल.

कार्यक्षेत्रामध्ये तात्पुरत्या फायद्यापेक्षा दीर्घकालीन परिणामांचा विचार करावा. नवीन संधी नफा मिळवून देतील. अनावश्यक तडजोड टाळावी. नोकरदारांनी स्वतःच्या कामावरच लक्ष केंद्रित करावे. वरिष्ठांचे सहकार्य मिळेल. व्यावसायिकांना कार्यशैलीत धोरणात्मक बदल करावा लागेल. सहकारी वर्गाची नव्याने पारख करावी. वाहन चालवताना काळजी घ्या.

**शुभ दिनांक** : ६, ७, ९.


- ज्योतिषपंडित-प्रज्ञा धनंजय, पुणे

# नवाकाळ

• मुंबई | रविवार ३ मे, २०२६ • पान -८


## राज्यात ७ मे पासून सावली 'गायब' होणार

**मुंबई -** मुंबईसह राज्यभरात ७ ते २६ मे पर्यंत दुपारी १२ वाजता आपली सावली गायब होण्याचा अनुभव घेता येणार आहे. ही अनोखी घटना राज्यात विविध ठिकाणी वेगवेगळ्या तारखांना घडणार आहे. ७ मे कोल्हापूर, मिरज, सांगली, १० मे सातारा, अक्कलकोट, ११ मे वाई, महाबळेश्वर, १२ मे बारामती, बार्शी, १३ मे लातूर,१४ मे अलिबाग, दौंड, पुणे, १५ मे मुंबई, १६ मे नगर, कल्याण, नादेड, ठाणे, १८ मे पैठण, १९ मे जालना, २० मे संभाजी नगर, नाशिक, २१ मे मनमाड, २२ मे यवतमाळ, २३ मे बुलडाणा, मालेगाव, २४ मे अकोला, २५ मे अमरावती, २६ मे जळगाव, भुसावळ आणि नागपूर या सर्व ठिकाणी ठिक दुपारी १२ वाजता सूर्य अगदी डोक्यावर येईल. त्यावेळी सर्व खगोलप्रेमींनी आपापल्या शहरात शून्य सावलीचा अनुभव घ्यावा, असे आवाहन मराठी विज्ञान परिषद, अमरावती विभागाचे हौशी खगोल अभ्यासक विजय गिरुळकर व प्रवीण गुल्हाने यांनी केले आहे.





## दानवेंच्या पत्नीच्या नावे मर्सिडीज गोऱ्हेंच्या संपत्तीत १० पट वाढ

■ मुंबई

**राज्यातील** विधान परिषद निवडणुकीसाठी उमेदवारांनी सादर केलेल्या प्रतिज्ञापत्रांमधून त्यांच्या संपत्तीचे तपशील उघड झाले आहेत. त्यावरून राजकीय वर्तुळात जोरदार चर्चा रंगली आहे. अनेक नेत्यांच्या मालमत्तेत गेल्या काही वर्षांत लक्षणीय वाढ झाली आहे. उबाठाचे उमेदवार अंबादास दानवे यांच्या पत्नीच्या नावावर आलिशान मर्सिडीज कार आहे तर नीलम गोऱ्हे यांच्या संपत्तीत १० पट वाढ झाली आहे.

उबाठाचे उमेदवार अंबादास दानवे यांची २०१९ मध्ये कुटुंबाची एकूण जंगम मालमत्ता ६३.७८ लाख रुपये होती. तर स्थावर मालमत्ता ४६.२४ लाख रुपयांची होती. २०२६ मध्ये ती वाढून जंगम मालमत्ता २.३६ कोटी रुपये आणि स्थावर मालमत्ता ५.०६ कोटी रुपये झाली आहे. तर त्यांच्या कुटुंबावर एकूण ८.९६ कोटी रुपयांचे कर्ज आहे. विशेष म्हणजे, त्यांच्या पत्नी अनुराधा यांच्या नावावर मर्सिडीज बेन्झ ही आलिशान गाडी आहे. विधान परिषदेच्या उपसभापती शिंदे सेनेच्या उमेदवार नीलम गोऱ्हे यांच्या संपत्तीतही गेल्या सहा वर्षांत मोठी वाढ झाली आहे. २०२० मध्ये त्यांची जंगम मालमत्ता १.५७ कोटी रुपये होती. तर स्थावर मालमत्ता सुमारे ६ कोटी रुपयांच्या घरात होती. मात्र २०२६ मध्ये ही जंगम मालमत्ता ११.६६ कोटी रुपयांवर पोहोचली. त्यांनी ७.६९ कोटी रुपयांची स्वअर्जित आणि १२.७६ कोटी रुपयांची वडिलोपार्जित स्थावर मालमत्ता जाहीर केली आहे. त्यांच्या नावावर टोयोटा इनोव्हा हायक्रॉस ही सुमारे ३४.६९ लाख रुपयांची गाडीदेखील आहे.

राष्ट्रवादी काँग्रेस अजित पवार गटाचे उमेदवार झिशान सिद्दीकी यांच्या संपत्तीत सर्वाधिक वाढ झाली आहे.

## सिंहगड परिसरात बेपत्ता तरुणीचा मृतदेह २ दिवसांनी सापडला

■ पुणे

**पुण्यातील** सिंहगड किल्ला परिसरातून बेपत्ता झालेल्या तरुणीचा मृतदेह खोल दरीत आढळून आल्याने परिसरात खळबळ उडाली आहे. दोन दिवस चाललेल्या अथक शोधमोहिमेनंतर हवेली पोलीस, वनविभाग, अग्निशमन दल आणि आपत्ती व्यवस्थापन पथकाच्या संयुक्त प्रयत्नांना अखेर यश आले. मनीषा धर्मदास गायकवाड (२८) अशी मृत तरुणीची ओळख पटली आहे. ती २८ एप्रिल २०२६ पासून बेपत्ता होती. तिचा मोबाईल, बॅग आणि इतर साहित्य सिंहगड परिसरात आढळून आल्यानंतर कुटुंबियांनी हवेली पोलीस ठाण्यात हरवल्याची तक्रार दाखल केली होती. तक्रारीनंतर तत्काळ शोधमोहीम हाती घेण्यात आली.

## गोव्यात कौटुंबिक खर्चावरून कामगारांचे किमान वेतन ठरणार

**नव्या नियमांचा मसुदा जाहीर**

■ पणजी

**गोव्यातील** कामगारांचे किमान वेतन आता केवळ महागाई निर्देशांकावर नव्हे, तर कौटुंबिक खर्चाच्या आधारावर निश्चित करण्याबाबत हालचाली सुरू झाल्या आहेत. वाढत्या महागाईमुळे कामगार नेत्यांनी व कामगार वर्गाने सध्याच्या वेतनवाढीवर असंतोष व्यक्त केला होता. त्यानंतर हा निर्णय विचाराधीन आहे. सरकारने यासंदर्भातील नव्या नियमांचा मसुदा जाहीर करून त्यावर ४५ दिवसांत हरकती व सूचना मागविल्या आहेत.

कामगारांच्या गरजा, मुलांचे शिक्षण, आरोग्य आणि अन्नधान्याचा खर्च लक्षात घेऊन किमान वेतन ठरवण्याची मागणी जोर धरत आहे. त्याअनुषंगाने गोवा वेतन कायद्यानुसार प्रसिद्ध करण्यात आलेल्या मसुद्यात कामगाराच्या कुटुंबात पती-पत्नी आणि दोन मुले गृहित धरून खर्चाचा अंदाज बांधण्यात आला आहे. प्रस्तावित निकषांनुसार, एका व्यक्तीला दिवसाला २७०० कॅलरी अन्नाची आवश्यकता, वर्षाला ६६ मीटर कपडे, घरभाड्यासाठी वेतनाच्या १० टक्के रक्कम, वीज, पेट्रोल व इतर गरजांसाठी २० टक्के, तर आरोग्य, शिक्षण आणि मनोरंजनासाठी २५ टक्के रक्कम आवश्यक मानण्यात आली आहे. याच आधारावर किमान वेतन ठरवले जाणार आहे. त्यासाठी कुशल, अतिकुशल आणि अर्धकुशल कामगारांचे वर्गीकरण करण्यासाठी सरकार स्वतंत्र तांत्रिक समिती स्थापन करणार आहे.

## आपमधून भाजपात आलेल्या खासदारावर पंजाबात २ गुन्हे


■ चंडीगड

**खासदार** राघव चड्ढा यांच्यासह 'आप'मधून भाजपात दाखल झालेले खासदार संदीप पाठक यांच्यावर पंजाबमध्ये २ अजामीनपात्र गुन्हे दाखल झाले असून, अटकेची शक्यता निर्माण झाली आहे.

महिलांवरील अत्याचार आणि भ्रष्टाचाराच्या प्रकरणांमध्ये पंजाबमधील दोन वेगवेगळ्या जिल्ह्यांमध्ये हे गुन्हे दाखल करण्यात आले आहेत. त्यामुळे त्यांच्यावर अटकेची टांगती तलवार निर्माण झाली आहे. पंजाब पोलिसांच्या एका पथकाने संदीप पाठक यांच्या नवी दिल्लीतील निवासस्थानी भेट दिली होती. मात्र अधिकारी पोहोचण्यापूर्वीच ते तिथून निघून गेले होते. पंजाब पोलिसांनी राज्यसभा खासदार संदीप पाठक यांच्या विरोधात वेगवेगळ्या जिल्ह्यांमध्ये अजामीनपात्र कलमांखाली गुन्हे दाखल केले आहेत. महिलांवर अत्याचार आणि भ्रष्टाचाराचा आरोप ठेवत ही कारवाई करण्यात आली आहे. या कारवाईवरून राजकीय वाद निर्माण झाला आहे. भाजपा आणि शिरोमणी अकाली दलाकडून ही कारवाई राजकीय सूडबुद्धीने केल्याचा आरोप करण्यात आला आहे. पंजाबमध्ये कायदा सुव्यवस्था राहिलेली नाही आणि राजकीय हेतूने कारवाई केली जात असल्याचा दावा करण्यात आला आहे.

## 'साधे लग्न करा' म्हणणाऱ्या इंदुरीकरांच्या मुलीचा शाही विवाह सोहळा चर्चेत

■ संगमनेर



**कीर्तनकार** इंदुरीकर महाराज यांच्या कन्या ज्ञानेश्वरी यांचा संगमनेर तालुक्यामधील गुंजाळवाडी येथे उद्या शाही विवाहसोहळा पार पडणार आहे. तब्बल १०० एकर परिसरात या सोहळ्याची भव्य तयारी करण्यात आली असून, त्याची चर्चा होत आहे.

ज्ञानेश्वरी यांचा विवाह उद्योजक सुनील विष्णू चिलप यांचे सुपुत्र साहिल यांच्याशी होणार आहे. सायंकाळी ६.५० वाजता हा विवाहसोहळा होणार आहे. या सोहळ्याची सुरुवात गगनगिरी महाराज सप्ताहाच्या ध्वजारोहणाने होणार असून, त्यानंतर किर्तन आणि मुख्य विवाहसोहळा पार पडणार आहे. या भव्य विवाहासाठी मुख्यमंत्री, राजकीय दिग्गज तसेच संत-महंतांना निमंत्रण देण्यात आले आहे. सध्या संपूर्ण तयारी अंतिम टप्प्यात असून, मोठ्या प्रमाणात मंडप, व्यवस्था आणि जेवणाची सोय करण्यात आली आहे.

## बागेश्वर बाबांच्या गाडीत शिवाजी महाराजांची प्रतिमा उलटी

■ नागपूर

**छत्रपती** शिवाजी महाराज आणि रामदास स्वामी यांच्याबाबत आपल्या वादग्रस्त विधानांमुळे चर्चेत असलेले बागेश्वरधामचे धीरेंद्र कृष्ण शास्त्री उर्फ बागेश्वर बाबा पुन्हा एकदा वादाच्या भोवऱ्यात सापडण्याची शक्यता निर्माण झाली आहे. भंडारा जिल्ह्यातील मोहाडी येथे झालेल्या त्यांच्या कार्यक्रमादरम्यान एक फोटो सोशल मीडियावर व्हायरल झाला असून, त्यातून नवीन वादाला तोंड फुटले आहे.

सविस्तर वाचण्यासाठी व शेअर करण्यासाठी हा क्युआर कोड स्कॅन करा

बागेश्वर बाबा मोहाडी येथे सत्संग सोहळ्यासाठी आले होते. यावेळी त्यांच्या ताफ्यातील एका आलिशान गाडीचा फोटो समोर आला. या फोटोमध्ये गाडीच्या डॅशबोर्डवर छत्रपती शिवाजी महाराज यांची प्रतिमा उलट्या अवस्थेत ठेवलेली दिसत आहे. हा फोटो वेगाने व्हायरल झाला आणि त्यानंतर संतापाची लाट उसळली. या प्रकारामुळे शिवप्रेमींमध्ये तीव्र नाराजी व्यक्त होत आहे. अनेकांनी सोशल मीडियावर तीव्र प्रतिक्रिया दिल्या आहेत.

## हज यात्रेच्या विमानभाड्यात यंदा १० हजार रुपयांची वाढ

**असदुद्दीन ओवैसी यांचे सरकारवर टीकास्त्र**

■ मुंबई

**'हज** कमिटी ऑफ इंडिया' ने यंदाच्या हज यात्रेसाठी विमानभाड्यात १० हजार रुपयांची वाढ करण्याचा निर्णय घेतला आहे. या निर्णयामुळे देशभरात राजकीय वाद निर्माण झाला असून, विविध पक्षांकडून तीव्र प्रतिक्रिया उमटत आहेत. या वाढीवर आक्षेप घेत एमआयएम प्रमुख, खासदार असदुद्दीन ओवैसी यांनी सरकारवर सडकून टीका केली आहे.

खासदार ओवेसी यांनी हा निर्णय त्वरित मागे घेण्याची मागणी करत म्हटले की, मुंबईहून प्रस्थान करणाऱ्या यात्रेकरूंनी आधीच ९० हजार भरले आहेत. आता त्यांच्याकडून अतिरिक्त १० हजार ६०० मागितले जात आहेत. हज कमिटीला गरीब व्यक्तींनी हज करू नये असे वाटते का? सरकारने ही नफेखोरी थांबवावी आणि जमा केलेली अतिरिक्त रक्कम परत करावी. दरम्यान, या वादावर स्पष्टीकरण देताना अल्पसंख्याक व्यवहार मंत्री किरण रिजिजू यांनी सांगितले की, मध्य आशियातील तणावामुळे 'एव्हिएशन टर्बाइन फ्युएल' च्या किमतीमध्ये ३० ते ४० टक्क्यांनी वाढ झाली आहे. प्रत्यक्षात प्रत्येक यात्रेकरूमागे ३० हजार ते ४० हजार इतकी वाढ अपेक्षित होती. मात्र सरकारच्या हस्तक्षेपामुळे ही वाढ केवळ १० हजारपर्यंत मर्यादित



ठेवण्यात आली आहे. यामुळे प्रत्येक यात्रेकरूचे अंदाजे २०० ते ३०० डॉलर वाचले आहेत, असे त्यांनी स्पष्ट केले. काँग्रेसचे नेते इम्रान प्रतापगढी यांनीही या निर्णयाला विरोध केला आहे.

## कोळणींना मासे कापण्यास मनाई मुंबई महापालिकेची दंडेलशाही

■ मुंबई

**वाकोल्यातील** धोबीघाट येथे वर्षानुवर्षे मासळी विक्रीचा व्यवसाय करणाऱ्या कोळी महिलांना महापालिकेच्या अधिकाऱ्यांनी संतापजनक अट घातली आहे. ग्राहकांना मासे कापून व स्वच्छ करून देऊ नका, यामुळे जागा अस्वच्छ होते, असे निदर्शनास आल्यास कारवाई केली जाईल. पालिकेच्या या निर्णयामुळे मासे विक्रेत्या महिलांमध्ये संताप व्यक्त होत आहे.

पालिका अधिकाऱ्यांच्या म्हणण्यानुसार मासे कापल्यामुळे घाण होऊन दुर्गंधी पसरते. म्हणून मासे न कापता तसेच ग्राहकांना द्या. या मनाई हुकूमामुळे मासे विकत घेणाऱ्या ग्राहकांना मासे कापून आणि स्वच्छ करून न दिल्यास मासे न घेता अनेकजण माघारी जातात. यामुळे गेल्या महिन्यांपासून आमच्या व्यवसायावर परिणाम झाला आहे, असे सांगून कोळणी म्हणाल्या, थोड्याच अंतरावर जिवंत कोंबड्या कापून स्वच्छ केल्या जातात आणि त्यांच्या मटणाची विक्री केली जाते. अशा कोंबडी विक्रेत्यांना स्वच्छतेची अट का नाही? ते काय पालिकेचे जावई लागतात का?

## राज्य-केंद्र कर्मचारी भेदभाव नाही! कोर्टाने तृणमूलचा आक्षेप फेटाळला

■ नवी दिल्ली

**मतमोजणी** प्रक्रियेत केंद्रीय व राज्य सरकारी कर्मचाऱ्यांमध्ये भेदभाव करता येत नाही, असे स्पष्ट निरीक्षण सर्वोच्च न्यायालयाने नोंदवले. तृणमूल काँग्रेसने केंद्रीय व सार्वजनिक क्षेत्रातील उपक्रमांच्या कर्मचाऱ्यांना मतमोजणी पर्यवेक्षक म्हणून नियुक्त करण्याच्या निर्णयावर घेतलेल्या आक्षेपावर सुनावणी करताना न्यायालयाने राज्य व केंद्र सरकारचे कर्मचारी हे दोघेही सरकारी यंत्रणेचाच भाग असल्याचा मुद्दा अधोरेखित केला.

सर्वोच्च न्यायालयाने तृणमूल काँग्रेसला दिलासा न देता, मतमोजणीसाठी केंद्रीय सरकार व सार्वजनिक क्षेत्रातील



उपक्रमाच्या कर्मचाऱ्यांची नियुक्ती करण्याच्या निर्णयावरील आक्षेप फेटाळला. न्या. पी. एस. नरसिम्हा आणि न्या. जॉयमाल्या बागची यांच्या विशेष खंडपीठाने स्पष्ट केले की, ही नियुक्ती विद्यमान नियमांच्या चौकटीत बसणारी असून, त्यात कोणतीही बेकायदेशीर बाब आढळत नाही. त्यामुळे १३ एप्रिल २०२६ रोजी निवडणूक आयोगाने जारी केलेले परिपत्रक लागू राहील आणि त्यासाठी स्वतंत्र आदेश देण्याची आवश्यकता नाही. याचिकेद्वारे मांडलेल्या मुद्यांमध्ये कोणताही ठोस आधार नसल्याचेही न्यायालयाने सूचित केले. ज्येष्ठ वकील डी. एस. नायडू यांनी न्यायालयात मांडणी करताना सांगितले की, मतमोजणी प्रक्रियेची संपूर्ण जबाबदारी निवडणूक अधिकाऱ्यांकडे असते, जे राज्य शासन संवर्गातील अधिकारी असतात.



उन्हाचा कडाका वाढला असल्याने मरीन ड्राईव्ह समुद्र किनाऱ्यावर फिरायला आलेल्या लोकांनी झाडाखाली बसून विसावा घेतला. त्यासोबत पक्षांची तहान भागविण्यासाठी पक्षीप्रेमींनी झाडावर पाण्याची व्यवस्था केली आहे.

## मुंबई-नाशिक महामार्गावर टोल मनसेचा आंदोलनाचा इशारा

■ मुंबई

**नाशिक** महामार्गावरील माजिवडा ते वडपे या टप्प्याचे सुमारे ९० टक्के काम पूर्ण झाले असून, लवकरच या मार्गावर पुन्हा टोलवसुली सुरू करण्याचा निर्णय सरकारने घेतला आहे. या निर्णयाविरोधात महाराष्ट्र नवनिर्माण सेना (मनसे) आक्रमक झाली असून, आंदोलनाचा इशारा देण्यात आला आहे. मनसे नेते अविनाश जाधव यांनी या टोलवसुलीवर तीव्र नाराजी व्यक्त केली आहे. तब्बल नऊ वर्षांनंतर टोल आकारणी पुन्हा सुरू होत असल्याने वाहनचालकांच्या खिशावर अतिरिक्त आर्थिक भार पडणार आहे. खारेगाव येथे जुन्या टोलनाक्याच्या जागी अत्याधुनिक ३४ पदरी टोलनाका उभारण्याचे काम वेगाने सुरू आहे. या प्रकल्पामुळे भविष्यात वाहतूक कोंडी कमी होऊन प्रवास अधिक जलद आणि सुरळीत होण्याची अपेक्षा व्यक्त केली जात आहे. २०१७ साली या मार्गावरील टोलवसुली बंद करण्यात आली होती. आता रस्त्याचे उन्नतीकरण आणि पायाभूत सुविधा सुधारल्यानंतर पुन्हा टोल सुरू करण्याचा निर्णय घेण्यात आला आहे.

## सुत्रधार राज कुशवाह याला जामीन नाकारला

■ इंदूर

**राजा रघुवंशी हत्या प्रकरण**

**संपूर्ण** देशात चर्चिल्या गेलेल्या राजा रघुवंशी हत्या प्रकरणातील एक सुत्रधार राज कुशवाह याचा जामीन अर्ज शिलाँग सत्र न्यायालयाने फेटाळला. कुशवाह याच्या वकिलांनी याआधी केलेल्या जामिनाच्या अर्जांची माहिती सोबत जोडली नव्हती. त्या आधारावर न्यायालयाने कुशवाहचा अर्ज फेटाळला. या हत्याकांडातील मुख्य संशयित राजा रघुवंशीची पत्नी सोनम रघुवंशी हिला काल शिलाँग सत्र न्यायालयाने गेल्या सोमवारी जामीन मंजूर केला. त्यानंतर त्याच दिवशी कुशवाह याच्या वकिलांनी त्याच्या जामिनासाठी हा अर्ज केला होता. बुधवारी या अर्जावर सुनावणी झाली. बराच वेळ दोन्ही पक्षांचे युक्तिवाद चालले.

## ट्रम्प यांनी युरोपीयन वाहनांवर उगारला २५ टक्के टॅरीफचा बडगा

■ वॉशिंग्टन

**इराणविरूद्धच्या** लढाईत अमेरिकेची साथ देण्यास साफ नकार देणाऱ्या युरोपीय समुदायातील देशांना धडा शिकवण्याचा इशारा अमेरिकेचे राष्ट्राध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प यांनी वारंवार दिला होता. आता तो खरा करत युरोपीय समुदायातील देशांमधून अमेरिकेत निर्यात केल्या जाणाऱ्या कार आणि ट्रकवर आता २५ टक्के आयात शुल्क (टॅरीफ) लावण्याची घोषणा ट्रम्प यांनी केली आहे. युरोपीय समुदाय आधी झालेल्या व्यापार कराराचे पालन करत नाही. त्यामुळे हा निर्णय घ्यावा लागला, असे ट्रम्प यांचे म्हणणे आहे. ट्रम्प यांनी या वाढीव २५ टक्के टॅरीफपासून वाचण्यासाठी युरोपीय देशांनी अमेरिकेत वाहननिर्मिती करावी, असा प्रस्तावही दिला आहे. सध्या अमेरिकेत अनेक नवीन वाहननिर्मिती कंपन्या छोटी चारचाकी वाहने आणि मालवाहू ट्रक निर्मितीचे कारखाने उभारत आहेत. या क्षेत्रात सुमारे १०० अब्ज डॉलरपेक्षा जास्त गुंतवणूक होत आहे. या कारखान्यांमध्ये अमेरिकन तरुणांना रोजगार मिळेल.

**मध्य रेल्वे प्रशासन एकीकडे मुंबई-पुण्याहून महाराष्ट्रातील महत्त्वाच्या शहरांकडे जाणाऱ्या रेल्वे गाड्या रद्द करत आहे तर दुसरीकडे उत्तर प्रदेश आणि बिहारला जाणाऱ्या गाड्यांची संख्या वाढवत चालले आहे. महाराष्ट्रात आधीच उत्तर प्रदेश आणि बिहारी लोकांची संख्या प्रचंड वाढली आहे. त्यात या राज्यांसाठी रेल्वे गाड्या वाढवण्यात आल्याने अगदी दररोज हजारोंच्या संख्येने परप्रातियांचे लोंढे महाराष्ट्रात येऊन धडकत आहेत. नुकतीच मध्य रेल्वे प्रशासनाने पुण्यातील हडपसर येथून उत्तर प्रदेशच्या बनारसला दैनंदिन रेल्वे सेवा सुरू केली आहे. म्हणजे दररोज हजारो परप्रांतिय पुण्यात दाखल होणार आहेत.**

## परप्रांतियांसाठी रोज धावणार हडपसर ते बनारस रेल्वे

■ पुणे

**संतापजनक** बाब म्हणजे दादर-रत्नागिरी रेल्वे गाडी प्रशासनाने कोरोना महामारीच्या काळात बंद केली होती. कोरोनापश्चात ही गाडी पुन्हा सुरू झाली खरी. मात्र ती दादर-रत्नागिरीऐवजी दिवा-रत्नागिरी करण्यात आली. कोकणात जाणाऱ्या प्रवाशांसाठी अत्यंत सोयीची असलेली ही गाडी किती मागण्या करूनदेखील प्रशासनाने सुरू केलेली नाही. मात्र त्याचवेळी लांबच्या अंतरावरील महत्त्वाची शहरे एकमेकांना जोडण्याच्या नावाखाली प्रशासनाने हडपसर- बनारस अमृत भारत रेल्वे सेवेची घोषणा केली आहे. आजपासून ही रेल्वे सेवा सुरू



झाली आहे. आज सकाळी बनारस रेल्वे स्थानकावरून गाडी क्र.२२५८९ बनारस-हडपसर अमृत भारत एक्स्प्रेस बनारसहून हडपसरसाठी रवाना झाली. उद्या दुपारपर्यंत ती हडपसरला पोहोचेल.

गाडी क्रमांक २२५८९ ही गाडी दररोज सकाळी ७ वाजून ५० मिनिटांनी हडपसर स्थानकावरून सुटेल. दुसऱ्या दिवशी २ वाजून ३० वाजता ती बनारसला पोहोचेल.

त्याच दिवशी सायंकाळी ६ वाजून १५ मिनिटांनी गाडी क्र.२२५८९ बनारस रेल्वेस्थानकावरून सुटेल. तिसऱ्या दिवशी मध्यरात्री १२.१० मिनिटांनी हडपसरला पोहोचेल.